

महाराष्ट्राचे
शिल्पकार
कर्मवीर
मामासाहेब जगदाळे
व. न. इंगळे
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

# शिक्षणपंढरीचा वारकरी : कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे

अनुक्रमणिका

शिक्षणपंढरीचा वारकरी

# कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे

प्राचार्य व. न. इंगळे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती : जुलै, २००२
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ७

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : रु ४५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच, असे नाही.

## अनुक्रमणिका

*पृथ्वीच्या पाठीवरील*
*कष्टकरी,*
*दलित*
*आणि स्त्रिया*
*यांना...*

अनुक्रमणिका

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणतः शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती "महाराष्ट्राचे शिल्पकार" या योजनेअंतर्गत पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्र–ग्रंथमालेतील "शिक्षण पंढरीचा वारकरी : कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे" हा सातवा चरित्रग्रंथ आहे.

"महाराष्ट्राचे शिल्पकार" या चरित्रग्रंथमालेअंतर्गत कर्मवीर मामासाहेब जगदाळे हा चरित्रग्रंथ प्रसिद्ध करताना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अध्यक्ष या नात्याने मला विशेष आनंद होत आहे.

या आनंदाचं कारण काहीसं वेगळं आहे. या योजनेअंतर्गत ज्या महनीय व्यक्तींच्या जीवनावर व कार्यावर अद्याप फारसं लिहिलं गेलेलं नाही व त्यामुळे महाराष्ट्रातील विविध विभागातल्या व स्तरातल्या मराठी माणसाला ज्या व्यक्तीच्या जीवनकार्याची अद्याप पुरेशी ओळख झालेली नाही अशा व्यक्तींसंबंधीचे ग्रंथ प्राधान्यक्रमाने प्रसिद्ध करण्याचे धोरण मंडळाने स्वीकारले आहे. या धोरणाचाच एक भाग म्हणून कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्यावरील हा चरित्रग्रंथ प्रसिद्ध होत आहे.

खरं तर कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांचे जीवितकार्य-विशेषतः शैक्षणिक क्षेत्रातले कार्य-एका विशिष्ट प्रदेशापुरतं व परिसरापुरतं मर्यादित राहिलेलं आहे. तरीही त्याचं मोल कमी लेखता कामा नये. आज शिक्षणाची गंगा (?) दारोदारी पोहोचलेली आहे. पण ज्या काळात शिक्षण ही मूठभरांची मक्तेदारी होती त्याकाळात ही ज्ञानगंगा त्यांनी दारोदारी-शेतकरी, शेतमजुरांपर्यंत-पोहोचविली हे आपण विशेषत्वाने लक्षात घेतले पाहिजे. कोणत्याही कामाचं मूल्यमापन करताना केवळ विस्तार लक्षात घेऊन चालत नाही, तर त्या कामाची व्याप्ती, सखोलता व ज्या परिस्थितीत हे काम केले गेले आहे ती परिस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. अर्थात कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांचं जीवितकार्य हे केवळ शिक्षण क्षेत्रापुरतं मर्यादित नव्हतं हे हा चरित्रग्रंथ वाचल्यानंतर लक्षात येईल.

प्रा. व. न. इंगळे हे या चरित्रग्रंथाचे लेखक आहेत. कर्मवीरांनी त्या काळात खेड्यापाड्यातल्या शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांसाठी बोर्डिंग व शाळा काढल्या नसत्या तर कदाचित श्री. व. न. इंगळे हे शिक्षण घेऊ शकले नसते. त्यांनी केवळ कर्मवीरांनी सुरू केलेल्या शाळा, महाविद्यालयांमधून शिक्षण घेतलेलं आहे असे नाही तर प्राध्यापक व प्राचार्य म्हणूनही काम केलेलं आहे. ते स्वतः सिद्धहस्त मराठी लेखक आहेत. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या या चरित्रग्रंथाचे त्यांनी मनःपूर्वक लेखन केलेले आहे. त्यामुळेच हा चरित्रग्रंथ विशेष सरस उतरलेला आहे, असे मला वाटते.

**(रा.रं. बोराडे)**

मुंबई — अध्यक्ष,

दिनांक : ४ जुलै, २००२ — महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

# लेखकाचे हृद्‌गत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या ‘महाराष्ट्राचे शिल्पकार’ या योजनेअंतर्गत कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जीवनकार्यावरील ‘शिक्षणपंढरीचा वारकरी : कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे’ हा चरित्रग्रंथ प्रकाशित होत आहे, हे माझे सद्‌भाग्य आहे.

कर्मवीर मामांनी आपले सारे आयुष्य समाजाच्या हितासाठी कामी लावले, म्हणून त्यांची दरवर्षी ४ फेब्रुवारीला साजरी होणारी जयंती ही ‘समाजदिन’ म्हणून अनेकविध समाजोपयोगी योजनांनी साजरी होत असते. आज ४ फेब्रुवारी २००२. कर्मवीर मामांची ९९वी जयंती. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा प्रारंभ. या दिवशी या चरित्रग्रंथाचे लेखनकार्य पूर्ण झाले. हा चरित्रग्रंथ कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे जन्मशताब्दी वर्षात (२००२-२००३) प्रसिद्ध व्हावा, अशी साऱ्यांची अपेक्षा. ही अपेक्षा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक आणि शिक्षणतज्ज्ञ मा. प्राचार्य रा. रं. बोराडे पुरी करतील अशी आशा.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष मा. श्री. सुरेश द्वादशीवार हे अशाच कर्मवीर जयंती कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बार्शीला आले होते. कर्मवीर मामांचे शैक्षणिक आणि वैद्यकीय क्षेत्रातले प्रचंड कार्य पाहून तेही भारावून गेले होते. त्यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार योजनेत कर्मवीर मामांचा तात्काळ समावेश केला आणि मामांच्या जीवनकार्यावर चरित्रग्रंथ लिहून देण्याचे पत्र माझ्यासाठी लिहून ठेवले. ते पत्र सध्याचे अध्यक्ष मा. प्राचार्य रा.रं.बोराडे यांनी मजकडे मार्गस्थ केले. प्राचार्य बोराडे यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण बार्शीतच झाले असल्याने त्यांना कर्मवीर मामांच्या कार्याची माहिती आणि महती ठाऊक होतीच. त्यांनी माझ्यामागे प्रेमाचा तगादा लावून हे काम पूर्ण करून घेतले. याबद्दल या दोघा मान्यवर माजी आजी अध्यक्षांचे मी विनम्रपणे ऋण व्यक्त करतो. या चरित्रग्रंथाच्या लेखनांत माझे मित्र प्रा. डॉ. दत्ता भोसले यांनी मौलिक सूचना केल्या. त्याबद्दल त्यांचे आभार मानलेले त्यांना आवडणार नाही. आमची मैत्री आभारापलीकडची आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे प्रभारी सचीव श्री. उ. बा. सूर्यवंशी यांनी तत्परतेने पत्रव्यवहार करून हे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी सहकार्य केले. त्यांचेही हार्दिक आभार.

‘शिक्षणपंढरीचा वारकरी : कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे’ हा चरित्रग्रंथ महाराष्ट्रातील घराघरांतून वाचला जावा आणि त्यातून ग्रामीण शिक्षणाच्या मार्गाचे राजरस्त्यात रूपांतर व्हावे, ही अपेक्षा. जय कर्मवीर!

४ फेब्रुवारी २००२
कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे
जन्मशताब्दी प्रारंभ दिन.

प्राचार्य व. न. इंगळे(सेवानिवृत्त)
तपस्या, कर्मवीर नगर, बार्शी ४१३४११
(जिल्हा सोलापूर) महाराष्ट्र

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


निवेदन ........ ६

लेखकाचे हृद्‌गत ........ ७

१. कर्मवीर मामांची संस्था : एक स्वयंपूर्ण विद्यापीठच ........ ९

२. भक्तीचे उदरी जन्मले ज्ञान ........ १२

३. ज्ञानासाठी धडपड ........ १५

४. संसाराच्या नावे घालोनिया शून्य! ........ २०

५. वाढता पुण्यधर्म (सुरू) केला! ........ २४

६. समाजपरिवर्तन प्रयोगाची पहाट ........ २९

७. देवांची देवळे ज्ञानमंदिरे व्हावीत! ........ ३३

८. भगीरथ प्रयत्नाने ज्ञानगंगा दारोदारी! ........ ३६

९. विरोधातून विकासाकडे ........ ३९

१०. गर्जा जयजयकार क्रांतीचा ........ ४३

११. –लाथ मारू तेथे पाणी काढू॰ ........ ४६

१२. काहीच साकडे पडो ने दी। ........ ४८

१३. समाजसुधारक महात्मा फुले यांचे वारसदार ........ ५३

१४. बहुजन समाजाचे भाग्य बचावले! ........ ५८

१५. मामांना मारण्यासाठी मारेकरी आले; माफी मागून गेले! ........ ६१

१६. खेड्यातून वसतिगृहयुक्त विद्यालयाचे नवे पर्व! ........ ६३

१७. कळस झालेसे कार्य! ........ ६७

१८. उद्योगाचे घरी । रिद्धी सिद्धी पाणी भरी ॥ ........ ७०

१९. संस्थेत आदर्श शिक्षकांसोबत मजुरांचे,वीरपत्नींचे सत्कार! ........ ७३

२०. परित्राणाय साधुनाम्........ ७६

२१. शिवाजीमहाराजांचा अश्वारूढ भव्य पुतळा ........ ८०

२२. गोरगरिबांची आरोग्यसावली ........ ८२

२३. संस्थेच्या भवितव्याच्या चिंतेपोटी ........ ८६

२४. कर्मवीर मामा : एक चालतेबोलते लोकविद्यापीठ! ........ ८९

२५. मामांची मृत्यूशी झुंज आणि महानिर्वाण ........ ९५

## १. कर्मवीर मामांची संस्था : एक स्वयंपूर्ण विद्यापीठच

१९८० हे साल कर्मवीर मामांच्या संस्थेत दुःखाचा दर्द घेऊनच आले. बार्शीचे भूषण कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांना १९७२ साली मधुमेहाने गाठले. २१ जुलै १९७४ रोजी त्यांची केलेली सेवा, डॉक्टरांचे प्रयत्न आणि कर्मवीर मामांची इच्छाशक्ती यांनी त्यावर मात केली. पण २ जानेवारी १९८० रोजी झालेला रोगाचा हल्ला भयंकर होता. कर्मवीर मामा या हल्ल्याने बेशुद्ध झाले. पुन्हा शुद्ध आली पण त्यांची वाचाच बंद झाली. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचा परिसर काळजीच्या काजळीने काळवंडून गेला. कर्मवीर मामासाहेब जगदाळे भिष्माप्रमाणे शरपंजरी पडले. त्यांच्या तोंडून शब्द फुटेना. फक्त त्यांच्या डोळ्यांतून घळघळणारे अश्रूच खूप काही सांगून जात होते.

कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी प्रसिद्धिपराङ्मुख राहून शैक्षणिक, सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रांत गेली चार तपे त्याग आणि तपस्या करून विधायक कार्याचे डोंगर उभे केले होते. स्वतःच्या संसारावर लाथ मारून समाजातील लाखो गोरगरीब, दीनदलितांचे संसार नेटाने नेटके नटविले होते. त्यांना पाहाण्यासाठी लोकांची रीघ लागली होती. ते आजारातून बरे व्हावेत म्हणून डॉक्टर्स प्रयत्नाची पराकाष्ठा करीत होते. त्यांचे चाहते आणि शिष्यगण गटागटाने परमेश्वराची प्रार्थना करीत होते. लाख मरोत पण लाखांचा पोशिंदा जगो, ही एकच भावना साऱ्यांच्या अंतःकरणात होती.

अशा हृदयद्रावक पार्श्वभूमीवर एका आनंदाच्या बातमीने सर्वांना आपल्या दुःखावर मऊ मुलायम फुंकर घातल्यासारखे वाटले. भर दुपारी शरदऋतूचं चांदणं पडावं तसं झालं. कवी सी. बी. टिंगरे यांच्या मुखातून ‘ ऐकून वार्ता ज्ञानपीठाची, उन्हात भिजलो जलधारांनी ’ ही ओळ उत्स्फूर्तपणे बाहेर पडली.

ही वार्ता औरंगाबादची. तेथील मराठवाडा विद्यापीठाने कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना डी.लिट् ही शिक्षण क्षेत्रातील अत्युच्च मानाची पदवी देण्याचे जाहीर केले. त्यामुळे सोलापूर-उस्मानाबाद जिल्ह्यातील खेड्यापाड्यांतील लोकांच्या मनात चैतन्याचे चांदणे चमकून गेले. उशिरा का होईना कर्मवीर मामांच्या ऋषीतुल्य तपस्येला काव्यकत न्याय मिळाल्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहू लागला. मराठवाडा विद्यापीठाने मामांना डी. लिट पदवी देण्याचे जाहीर करून बहुजन समाजात शिक्षणाचे एक नवे भान निर्माण केले.

कर्मवीर मामासाहेब जगदाळे अर्धांगवायूने अंथरुणावर खिळून पडल्याने ते विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाला उपस्थित राहू शकत नव्हते. तेव्हा २४ फेब्रुवारी १९८० रोजी मराठवाडा विद्यापीठाचे त्या वेळेचे कुलगुरू डॉ.बी.आर.भोसले, विद्यापीठातील लॉ फॅकल्टीचे डीन व संस्थेचे माजी विद्यार्थी ॲड.सुखदेव शेळके, विद्यापीठ कार्यकारिणीचे मान्यवर सदस्य श्री.वसंतराव काळे, श्री.सुंदरराव गव्हाणे आणि क्रीडामहर्षी श्री. शिवाजीराव नलावडे (उस्मानाबाद) यांनी बार्शीला येऊन समारंभपूर्वक ही डी.लिट्.ची पदवी कर्मवीर जगदाळे मामांना सादर अर्पण केली.

बार्शीला झालेला हा पदवीदार समारंभ म्हणजे कर्मवीर मामांचा गौरवोत्सव तर बार्शीकरांचा आनंदोत्सव! बार्शी शहर आणि श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या इतिहासातील सोनेरी दिवस! मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे कुलगुरू डॉ.बी.आर.भोसले यांनी स्वहस्ते कर्मवीर मामांना डी.लिट्.ची

पदवी प्रदान केली. टाळ्यांचा कडकडाट झाला. धडामधूमचे आदल्या उडविल्याचे आवाज आले. आकाशात प्रकाशाची कारंजी उडाली. बार्शीत दुसरी दिवाळीच साजरी झाली.

या प्रसंगी कुलगुरू डॉ.बी.आर.भोसले म्हणाले, “पीएच.डी.ची पदवी स्वीकारताना मला जेवढा आनंद झाला होता, त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त आनंद मला या तपस्वी कर्मवीर मामासाहेबांना डी.लिट्.ची पदवी अर्पण करताना होत आहे. कर्मवीर मामासाहेब हे वाचावीर नसून कृतिवीर आहेत. कर्मवीर आहेत. महा-राष्ट्राच्या ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करून महाराष्ट्रात एक मोठे समाजपरिवर्तन करण्यात सिंहाचा वाटा जगदाळेमामांनी उचलला आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहूमहाराज, महर्षी वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मालिकेतील हे एक त्यागी व्यक्तिमत्व आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना पुणे विद्यापीठाने सिव्हिल हॉस्पिटल पुणे येथे जाऊन डी.लिट्.ची पदवी दिली होती; त्या प्रसंगाची येथे प्रकर्षाने आठवण होते. कर्मवीर मामांचा परिसर पाहून मी भारावून गेलोय. कर्मवीर मामांनी शून्यातून हे ज्ञानाचे विश्व निर्माण केले आहे. ही संस्था कसली? हे तर एक स्वयंपूर्ण विद्यापीठच आहे.”

मराठवाडा विद्यापीठाच्या पावलावर पाऊल ठेवून महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी (जि. अहमदनगर) या विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ.दत्ताजीराव साळुंखे यांनीही कर्मवीर डॉ. जगदाळेमामांना ‘डॉक्टर ऑफ सायन्स’ ही पदवी देण्याचे जाहीर केले. पण ती स्वीकारायला कर्मवीर डॉ. मामासाहेब दुर्दैवाने हयात राहिले नाहीत. तेव्हा सदर मरणोत्तर पदवी संस्थेचे अध्यक्ष श्री. टी. बी. जगदाळे यांनी स्वीकारली.

प्रत्येक माणसाचे जीवन संघर्षमयच असते पण कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे जीवन ‘रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग’ अशा संतवचनासारखे होते. सततच्या संघर्षातूनच ते विकसित झाले. शिवाजीमहाराजांचे ते मर्द मावळा होते. तुकयाचे ते सच्चे चेले होते. महात्मा फुल्यांचे ते कृतिवीर अनुयायी होते. त्यामुळेच त्यांना अनेक संघर्षांना तोंड द्यावे लागले. विरोधाने ते वाकले नाहीत, प्रवाहाविरुद्ध पोहतांना ते थकले नाहीत. जनसेवेचे हाती बांधलेले कंकण कधी पिचले नाही. त्यांची तपोराधना कधीही भंगली नाही. त्यांची समाजसेवा, त्यासाठी अथकपणे केलेला शिक्षणप्रसार, त्यांचा अभूतपूर्व त्याग, सततची श्रमाची पूजा आणि क्रियाशीलता कधीच शबलीत झाली नाही.

चारेसारख्या (ता. बार्शी) छोट्याशा खेड्यात वारकरी असलेल्या शेतकरी कुटुंबात ते जन्मले. शिक्षणा-साठी त्यांना धडपडावे लागले, भावकीशी त्यांना झगडावे लागले, गावगुंडांशी टक्कर द्यावी लागली. आतापर्यंत शिक्षणाची संधी न लाभलेल्या गोरगरीब बहुजन समाजाला ज्ञान मिळावे यासाठी त्यांना संग्राम करावा लागला. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांना लढावे लागले. तसेच वर्ण आणि जातीपातीच्या, व्यवस्थेच्या भिंती पाडण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी चाललेल्या चळवळीच्या पाठीमागे त्यांना खंबीरपणे उभे राहावे लागले. हे सारे करताना त्यांची क्रियाशीलता आणि तत्वनिष्ठा नेहमीच तेजाळून निघाली. त्यातूनच नवसर्जनाचे सूर उमटत राहिले. म्हणूनच केवळ मॅट्रीकपर्यंत शिक्षण घेतलेल्या आणि बार्शी नगरपालिकेत कारकून म्हणून काम करणाऱ्या सामान्य गणल्या जाणाऱ्या त्यांच्या असामान्य कर्तृत्वाला दोन विद्यापीठांनी मानाचे मुजरे केले. यातच त्यांच्या महानतेचे मर्म दडलेले आहे. ‘यः क्रियावान सः पंडितः’ जो क्रियाशील तोच खरा विद्वान हे संस्कृत वचन या पदव्यांनी सार्थ ठरविले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे हे संघर्षमय जीवन म्हणूनच भावी

अनुक्रमणिका

पिढ्यांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरणार आहे. त्यांचे जीवन म्हणजे संघर्षाची बखर आहे. ती जितकी नाट्यमय आणि जीवघेणी आहे तितकीच ती वाचकांना मनोरंजक आणि मार्गदर्शकही ठरणारी आहे.

[अनुक्रमणिका](#)

# २. भक्तीचे उदरी जन्मले ज्ञान

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हा. या जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील चारे हे खेडेगाव. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या वाडवडिलांचे गाव. बार्शीपासून वीसेक किलोमीटर दूर. आधुनिक सुधारणांपासून शेकडो किलोमीटर दूर. गाईगुरांसाठी भरपूर चारा उपलब्ध. त्यामुळे या गावाचे नाव 'चारे' असे पडले असावे. पूर्वी 'पाथरी'हून चाऱ्याला पायीच जावे लागे. आता बार्शी–चारे ही एस.टी. चालू झाली आहे. एस.टी.ने. बार्शी-आगळगांव-काटेगाव मार्गानेही चाऱ्याला जाण्याची सोय झाली आहे.

इंग्रजी अमदानीतील सांदीकोपऱ्यातील चारे हे गाव. शंभरेक उंबऱ्याचे. त्यातील बहुसंख्य घरे जग-दाळ्यांची. दगड-मातीच्या भेंड्यांनी बांधलेली. वर माळवद, पत्रे किंवा तुराट्या, तनस, उसाच्या पाचोळ्यांनी शाकारलेली. गावातील बहुसंख्य घरे मराठा समाजातील गोरगरीब शेतकऱ्यांची. या गावात धनिक घरे दोनच. एक जगदाळे पाटलांचे आणि दुसरे श्री .बळवंतराव जगदाळे यांचे! पाटलांच्या गढीच्या वाड्यालगतच बळवंत-रावांचा भलामोठा चौसोपी वाडा. या वाड्यातील ढाळजात बळवंतरावाची बैठक असायची. हे बळवंतराव जगदाळे म्हणजे कर्मवीर मामांचे आजोबा. त्यांच्याबद्दल जगदाळे घराण्यातील सर्वांना अपरंपार आदरभाव! त्यांची समाधी याच वाड्यात बांधलेली आहे.

बळवंतराव म्हणजे शेतात निढळाचा घाम गाळून मोत्याची कणसं पिकविणारे हाडाचे शेतकरी. स्वतःच्या कर्तृत्वाने सधन झालेले! एकशेऐंशी एकर जमीन, त्यात दोनतीन विहिरी. आंब्यांची पाचपन्नास झाडे. शेती व्यवसायाबरोबर गाई-म्हशी आणि शेळ्या-मेंढ्या पाळण्याचा धंदाही त्यांनी सुरू केलेला. दहा शेळ्यांपासून सुरुवात करून थोड्याच दिवसांत चार खंड्या शेळ्या-मेंढ्यांचा कळप त्यांनी सांभाळलेला. बळवंतराव वारकरी पंथाचे अनुयायी झाले. पंढरपूरची महिन्याची वारी नित्यनियमाने त्यांनी सुरू केली. रोज रात्री ढळजात टाळ-मृदंगाच्या तालात तुकारामांचे अभंग घुमायचे. परोपकार आणि दानधर्म करण्यातही ते सतत आघाडीवर असायचे. एकदा निवृत्ती ठकार महाराजांचे कीर्तन गावात झाले. बळवंतराव तात्काळ त्यांचे भक्त बनले. निवृत्तीमहाराजांचा उपदेश ऐकून त्यांनी शेळ्यामेढ्यांचा धंदा कायमचा बंद केला. गाई-म्हशींचं खिल्लार मात्र वाढतच रहिलं.

बळवंतरावांना चार मुलगे. थोरला 'बापुराव'. तो पुढे मरण पावला. त्यांचे दुसरे चिरंजीव 'गोविंदराव'. तिसरे आबासाहेब! एक मुलाला-पंढरीनाथाला-जन्म देऊन ते आणि त्यांची पत्नी अल्पकाळात देवाघरी गेले. सर्वात धाकटे 'नानासाहेब'. नानासाहेबांना फक्त दोन मुलीच! बळवंतरावांच्या निधनानंतर या एकत्र कुटुंबाचा भार गोविंदरावांवर पडला. ते साऱ्यांचे 'तात्या' झाले. हे गोविंदराव म्हणजे कर्मवीर मामांचे वडील!

गोविंदरावतात्या वडिलांचे रंग-रूप-अंगकाठी आणि गुण घेऊन जन्मलेले. वडिलांप्रमाणे उंचेपुरे, धडधाकट. वडिलांप्रमाणेच करारी, एककल्ली आणि तापट! खऱ्याने वागायचे. खोट्याची खरडपट्टी काढायचे. अडल्यानडलेल्या गोरगरिबांना मदतीचा हात द्यायचे. कोणाच्या इजित जायचे नाहीत. आपण भले आपले काम भले आणि हरीनाम भले, हा त्यांचा वागण्याचा सरळसोट खाक्या. त्यांनी कुणाच्या रागालोभाची पर्वा केली नाही. त्यामुळेच गावातील काही लोक आणि त्यांची भावकी त्यांच्या विरुद्ध झाली. वडिलांनी घालून दिलेला भगवद्भक्तीचा धडा, पंढरपूरची महिन्याची वारी आणि वाड्यातील ढाळजातील दररोज रात्रीचे भजन ही परंपरा त्यांनी चालू ठेवली.

अनुक्रमणिका

गोविंदरावतात्यांची पहिली पत्नी देवळालीच्या साठ्यांची. पहिल्याच बाळंतपणात तीन महिन्याच्या गोऱ्यागोमट्या गुटगुटीत सुभेद्रला मागे ठेवून ती वारली. या सुभद्रेवर तात्यांचा भारी जीव. तिची देखभाल करण्यासाठी गोविंदरावांना दुसरे लग्न करणे भाग पडले. वाशीजवळच्या भिकार सारोळे येथील चेड्यांच्या मुक्ताशी ते विवाहबद्ध झाले. ही सुभद्रेची सावत्र आई असल्याचे सांगूनही कुणाला खरं वाटत नसे. इतकी ती सुभद्राला तळहातावरच्या फोडासारखी जपायची. मुक्ताबाई सरळ, साधी आणि धर्मभोळी. शनिवार, सोमवार यासारखी व्रतवैकल्पे आणि दर पंधरवाड्याच्या एकादशीचे व्रत तिने आमरण सांभाळले. गावातील गोरगरिबांच्या ती नेहमी उपयोगी पडायची. शांत, सहनशील स्वभावाची. मायाळूपणा तर तिचा स्वभावधर्मच झाला होता.

या माउलीच्या पोटी आलेला पहिला मुलगा म्हणजे निवृत्ती ऊर्फ बाबुराव. त्याच्या पाठोपाठ मुलगी गया झाली आणि तिच्या पाठोपाठ जन्माला आले ज्ञानू, सोपान आणि धाकली सरू. गोविंदरावतात्याचं भावाभावाचं एकत्र कुटुंब. साऱ्यांच्या मुलाबाळांनी त्यांच्या घराचं गोकूळ झालेले. मुक्ताबाई साऱ्यांचे हवंनको ते बघायच्या. घरातील सारे पुरुष आणि स्त्रिया त्यांच्या मानूनच चालायच्या!

एका साली कार्तिकी एकादशी जवळ आलेली आणि मुक्ताबाई आजारी पडल्या. दुखणं वाढलं. पण घरातील पंढरीची वारी चुकवायला गोविंदराव तयार नव्हते. पुतण्या पंढरीनाथ त्यांच्याऐवजी जायला तयार झाला पण गोविंदतात्या म्हणाले, “मी येथे राहून काय तिला वाचविणार आहे? माणसाच्या हातात काय आहे? सर्वसाक्षी पांडुरंगाच्या इच्छेप्रमाणे सारं घडतं. तेव्हा वारी का चुकवायची?” असे म्हणून ते वारीला गेले आणि इकडे एकादशीच्या दिवशी मुक्ताबाई पांडुरंगात विलीन झाल्या. कार्तिकी एकादशीच्या दिवशी सवाष्ण मरण येणं हे भाग्यचं लक्षण. हे भाग्य मुक्ताबाईनं पदरी पाडून घेतले.

भावकीतील लोक गोविंदरावांना सरळ जगू देतील तर शपथ. भावकीने तात्यांच्या धाकल्या भावाच्या-नानासाहेबांच्या-डोक्यात वाटणीचं खूळ सोडून दिलं. नानांना फक्त दोन मुलीच. त्यांची लग्नं गोविंदतात्यांनीच धुमधडाक्यात करून दिली होती. या भोळ्या नानासाहेबांची जमीन हडप-गडप करायला भावकी हा वाटणीचा खेळ करू लागली. त्यांच्या हिश्शाची काळी आई आपल्याच कुटुंबात रहावी ही गोविंदरावतात्यांची इच्छा! या भावकीच्या करणीच्या विचारानं गोविंदरावांचं डोकं फुटून जायची स्थिती आली. त्यात भावकीने आणि गावातील विरोधकांनी डाव साधला.

१९४६ साल! त्या साली सरकारी रेशनिंग बसलेलं. प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या घरातील धान्यसाठ्याची लेखी माहिती देणं कायद्यानुसार बंधनकार झालं! गोविंदरावांनी शेतातील ज्वारी व्हडग्याने आणून पेवात टाकली. ती उपसून काढा, मोजा आणि धान्याचा स्टॉक द्या. पंढरीच्या वारीला जायच्या घाईत ही उठाठेव करण्यास सवडच नव्हती. तेव्हा त्यांनी वारीला जाताना धान्य न मोजताच धान्याचा साठा अंदाजाने पाटलांकडे दिला. तात्यांच्या हितशत्रूंना आयतीच संधी मिळाली. वरिष्ठांकडे तक्रार गेली. अधिकाऱ्यांनी येऊन पेवातील धान्य मोजले. ते दिलेल्या स्टॉकपेक्षा पोते-दीड पोते जास्त भरले. एवढे निमित्त करून गोविंदरावांवर खटला भरला. ही बातमी त्यांना पंढरपूरला कळली तेव्हा त्यांना धक्का बसला. बापजन्मी कधी कोर्टात आपली बेअब्रू झाली नाही. त्यातच स्टॉकपेक्षा अधिक धान्य ठेवल्याच्या गुन्ह्यावरून गावातील पाटलाला दंड आणि शिक्षा झाल्याचे ऐकून तर गोविंदरावांचे धाबेच दणाणले. ते वेड्यासारखे करू लागले.वेडात बडबडु लागले. त्यांची केस सोलापूरच्या कोर्टात चालत होती. तिथं त्यांची पहिल्या पत्नीपासून झालेली मुलगी सुभद्राअक्का राहत होती. तिच्या घरीही त्यांना वेडाचे झटके येऊ लागले.

अनुक्रमणिका

'पंढरीच्या वारीला जायचे' नाटक करून त्यांना दवाखान्यात दाखल केले. ते कोणालाच ओळखेनात. तेथे वेडामुळे अंगात बेसुमार ताप वाढला. तापात ते बडबडू लागले. "मी शेतात घाम गाळला. जवारीचं मोती पिकवलं. मी कुनाची चोरी केली? नाही! नाही! तरी बी म्हनं दंड आन् शिक्षा! आरं वारं इंग्रज सरकार. बरं न्याय देतंय की! बाई, माझी हडपी भर. मला वारीला जायचंय!." अशातच त्या खटल्याची हाय खाऊन ते १९४७ साली सोलापुरी वैकुंठवासी झाले!

असं हे गोविंदराव आणि मुक्ताबाईचं जगावेगळं जोडपं! खरंखुरं विठ्ठलभक्त! वारकरी पंथाची शुद्ध बीजं त्यांच्या भोळ्या भावात भिजली आणि हृदयात खोल खोल रुजली. अशा या विठ्ठलभक्त मायबापांच्या पोटी ४ फेब्रुवारी १९०३ रोजी एक रसाळ गोमटं फळ लागलं. बाळाचा जन्म झाला. या बाळाच्या जन्माची कथाही विलक्षण. या बाळाचं पुढलं कार्य-कर्तृत्वही आश्चर्य करण्यासारखं. या बाळाचं नाव निवृत्ती! हेच ते कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे!

अनुक्रमणिका

## ३. ज्ञानासाठी धडपड

मुक्ताबाई पहिल्या बाळंतपणासाठी माहेरी भिकार सारोळे येथे गेल्यापासून त्यांचा जीव टांगणीला लागला होता. बाळंतपणाचा घोर तर होताच पण त्याचवेळी दुर्दैवाने चारे गावाला प्लेगाने पछाडले होते. कोण कधी गचकेल याचा नेम नव्हता. चारेकरांनी गाव सोडून शेतात वस्त्या केल्या होत्या.

४ फेब्रुवारी १९०३ या दिवशी मुक्ताबाईंनी बाळरत्नाला जन्म दिला. एक मन सुखावलं पण दुसरं मन चाऱ्यातील प्लेगानं दुचक्यात अडकलं. मुलाच्या बारशाचा कार्यक्रम ठरला. त्याबाबत चाऱ्याला निरोपही पाठवला. थाटामाटाने बारसं साजरं झालं. बाळाचं नाव निवृत्ती ठेवलं पण बारशाला चाऱ्याहून कुणी आलं नाही. निरोपही आला नाही. त्यामुळं मुक्ताबाईंचं सारं लक्ष चाऱ्याकडून येणाऱ्या खुशालीच्या निरोपावर लागलेलं होतं.

बारसे होऊन एक आठवडा उलटून गेला. एके दिवशी अचानक गोविंदराव वारल्याची दुष्ट वार्ता आली. सारी पृथ्वी आपल्याभोवती गरागरा फिरतेय असा भास झाला. वाड्यात आयाबायांनी रडून एकच गोंधळ केला. तशाही परिस्थितीत मुक्ताबाईने 'मला चाऱ्याला घेऊन चला' असा भावाजवळ आग्रह धरला.

चाऱ्याला येण्यासाठी घोड्यावर खोगीर चढवले. मुक्ताबाई घोड्यावर बसल्या. त्यांच्या भावाने लहानग्या तीनेक आठवड्याच्या निवृत्तीला टोपल्यात ठेवले. बाळाच्या चारीबाजूला कपडे ठेवले. टोपले पातळ कपड्याने झाकले. ते टोपले डोक्यावर घेऊन तो घोड्याबरोबर चालू लागला. पतीनिधनाची कल्पनाच मुक्ताबाईंना सहन होत नव्हती. 'त्यांच्याऐवजी देवाने मला का नेले नाही? पांडुरंगा, माझ्या कपाळीचं कुंकू तुला पावाले कसे नाही?' या विचारात ते चारे गावात येऊन पोहोचले.

प्लेगमुळे गावातील उघडीबोडकी घरं माना टाकलेल्या पिकासारखी ओंगळ आणि उजाड झालेली. इतक्या लवकर ओली बाळंतीण कशी आली? याचं कोडं काही साळूकाकूला उमजेना. शेवटी मुक्ताच्या भावाने मिळालेली बातमी सांगताच साळूकाकू म्हणाली, "अगं मुक्ता, रडू नकूस. तुंजं कुंकू शाबूत हाय. गोविंदरावांना तर म्या सकाळच्यापारी बघितलंय. शेतात कणसं खुडाया बाया सांगत चाल्ले व्हते." मुक्ताबाईच्या चेहऱ्यावर 'पांडुरंग पावल्या'चे भाव उमटले. समाधान विलसले.

गोविंदरावांना ही सगळी हकिकत कळल्यावर हसू आलं. भावकीतील कुणीतरी ही खोडी केल्याचं त्यांच्या लक्षात आलं. टोपल्यात झोपलेल्या बाळ निवृत्तीला पाहून साऱ्यांना बाळकृष्णाच्या जन्माची आठवण झाली. श्रीकृष्णासारखं कर्तृत्व या बाळानं पुढं करावं, अशी स्वप्नं त्यांच्या मनात तरळून गेली.

सुभद्राअक्का तर बाळाला पाहून हरखून गेली. नुकत्याच फुटलेल्या गुलाबी पिंपळपानासारख्या बाळाच्या बोटांना हळुवार स्पर्श करून 'माझा बाबू आला' असा तिनं एकच गिल्ला केला. त्याला अलगदपणे उचलून मांडीवर घेऊन ती त्याला खेळविण्यात दंग झाली. तिनं बाळाचं नाव 'बाबू' ठेवलं. पुढे सारे बाळ निवृत्तीला 'बाबुराव' म्हणूनच हाक मारू लागले. त्या वेळेपासून या बहीणभावांची एक नवी दुनिया वाड्यात निर्माण झाली. बाळाच्या आगमनापासून सुभद्राचे सारे खेळ बंद झाले. बाबूसारखं हसरं खेळणं तिच्या हाती लागलं होतं.

अनुक्रमणिका

शेतकऱ्याच्या घरांत लहान मूल जसं वाढतं तसा बाळ बाबुराव वाढत होता. लहानपणी बाबू अल्लड, हेकेखोर आणि खेळाडू होता. पोहण्याचा तर त्याला विलक्षण छंद. आट्यापाट्या खेळात सुरगड्याचे काम करण्यात त्याचा हात कुणीच धरत नव्हते. तालमीत जाऊन जोरबैठका काढणे, कुस्त्या खेळणे हा त्याचा नित्यनेम झाला होता. या बाळलीलात गोविंदराव आणि मुक्ताबाई स्वर्गसुखाचा अनुभव घेऊ लागले. त्यामुळे आठ-नऊ वर्षे झाली तरी बाबूला ह्यांनी शाळेत घातले नव्हते. पण निवृत्तीचे खेळ फारच वाढायला लागल्यावर दहाव्या वर्षी त्याचे नाव शाळेत घातले.

शाळेत बाबुरावाची बुद्धी सामान्य मुलासारखीच होती. हुशार मुलगा म्हणून त्याने नाव कमावले नसले तरी ‘ढ’ विद्यार्थ्यांतही त्यांची गणना होत नव्हती. उलट घरी ढालजात दररोज होणाऱ्या भजनातील काही अभंग त्याचे पाठ झालेले होते. त्याच्या स्वभावातील स्वप्नाळूपण, आदर्शाचे वेड, धाडस, जिद्द आणि चिकाटी या गुणांमुळे तो गुरुजींचा आवडता विद्यार्थी बनला होता. इतिहासाच्या पुस्तकातील शिवाजीमहाराजांचे धैर्य, शौर्य त्याला आवाहन करीत असे. त्यामुळे शिवाजीप्रमाणे घोड्यावर बसणे, तो वेगाने हाकणे, यात तो शिवाजी बनून जायचा. घोड्याचा पाठीवर उभा राहून तो पळविण्यात त्याला शूरपणा वाटायचा. त्याची ही घोड्यावर बसण्याची आवड आणि जिद्द पाहून कीर्तनकार निवृत्ती ठकारमहाराजांनी त्याला आपले शिंगरू बक्षीस दिले होते. त्या शिंगराला चांगलंचुंगलं गवत आणून खाऊ घालणं, त्याचा खरारा करणं, त्याची लीद काढणं ही श्रीकृष्णासारखी सारी कामं तो आनंदानं करायचा. शिवाजीमहाराज तर त्याचे दैवतच बनले. त्याचबरोबर रात्रीच्या भजनात ऐकलेल्या संततुकोबारायांच्या अभंगाचीही मोहिनी त्याच्यावर पडली. ‘जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले॥ तोचि साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा॥’ हा अभंग तर त्याचा मुखोद्‌गत झाला होता.

हां हां म्हणता बाबुराव तिसरी पास झाला. गावात फक्त तिसरीपर्यंतच शाळा. गोविंदरावांना आपल्या मुलाला पुढं शिकवण्याची गरज वाटत नव्हती. पोथीपुराणं आणि अभंग म्हणता येईपर्यंतचे शिक्षण म्हणजे त्यांना डोक्यावरून पाणी गेल्यासारखं वाटलं. त्याउलट बाबुरावला पुढं शिकावं असं वाटायचं. पण तात्यांना कसं पटवायचं? बाबुरावानं बार्शीत शिकायला जायचा आईपुढं हट्ट धरला. त्यासाठी जेवणावरही बहिष्कार टाकला. तेव्हा मुक्ताईनं नवऱ्याची विनवणी करून बाबुरावच्या शिक्षणाची सोय बार्शीला पाहुण्याकडे करण्यासाठी मान्यता मिळवली.

सतरा वर्षांच्या थोराड निवृत्तीचं नाव बार्शी नगरपालिकेच्या मराठी मुलांची शाळा नंबर १ मध्ये चवथीच्या वर्गात घातले. पायात तोडा, कमरेला धोतर, अंगात गावठी कापडाची पैरण, कानात सोन्याची कुंडलं आणि डोकीला फेटा असं ध्यान असलेल्या बाबुरावनं वर्गात प्रवेश केला तेव्हा या खेडवळाकडे शहरी विद्यार्थी कुतूहल आणि हेटाळणीच्या नजरेने पाहू लागले. पण निवृत्तीने हळूहळू शहरी वातावरणानुसार वागण्यात सुधारणा केली. त्यामुळे तो शहरी विद्यार्थ्यांतही मिळून मिसळून गेला. तो बार्शीचे पाहुणे श्री. भाऊराव पाटील यांच्या कसबा पेठेतील घरी जेऊ लागला. शाळेत जाऊन शिकू लागला.

गोविंदतात्या एकत्र कुटुंबाचे प्रमुख. त्यांची आपल्या पुतण्याला-पंढरीनाथला-बार्शीच्या या भाऊराव पाटलांची मुलगी केली होती. तिला बाबुरावच्या घरचे भाबी म्हणायचे. या लग्नाच्या हुंड्याचे पैसे गोविंदरावांनी रोख घेतले नव्हते. त्या पैशात पोराचे शिक्षण व्हावं हा त्यांचा व्यवहारी विचार असा फलद्रूप झाला. भाऊराव पाटलांच्या घरी आठवड्यातून दोन-तीन वेळेला बोकड कापलेलं असायचं, तर बाबुराव पडला वारकरी कुटुंबातलं शाकाहारी. टांगलेलं बकरं सोलताना पाहून त्याची अन्नावरची वासनाच उडून

गेली. त्यात पाहुणे दारू पिऊन तर्रर्र होऊन झोकांड्या खात घरी यायचे. पण ते बाबुरावला मायेने वागवायचे. बाबुरावाच्या भाबीची आई त्याच्यासाठी वेगळं शाकाहारी जेवण बनवायची. आग्रह करून खाऊ घालायची पण जेवताना बाबुरावला कसेसेच वाटायचे. तेव्हा पाहुण्याकडून येणारा डबा तो आपला वर्गमित्र संभाजी बारंगुळे याच्या घरी त्याच्याबरोबर खायचा. त्याच्याबरोबरच अभ्यास करायचा. विहिरीवर पोहायला, तालमीत जोर, बैठका काढायला जायचा. कुस्त्या खेळायचा. त्यामुळे संभाजी हा त्याचा जिवलग मित्र बनला.

बाबुराव-संभाजी या मित्रांची जोडी मन लावून अभ्यास करायची. दरवर्षी पास व्हायची. बघता बघता ते सातवीत गेले. सातवीची व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा तशी कठीण समजली जायची. त्यांनी झटून अभ्यास केला. सोलापुरी जाऊन परीक्षा दिली. १९२२-२३ साली सातवीच्या परीक्षेच्या निकाल लागला. बार्शीच्या सतरा मुलांपैकी फक्त पाच मुले पास झाली. त्या पाचातील हे दोघे बाबुराव आणि संभाजी.

मुलगा सातवी पास झाला. गोविंदरावांना गंगेत घोडे न्हायल्याचा आनंद झाला. मुलाला पुढं इंग्रजी शिकवायची त्यांची बिलकूल इच्छा नव्हती. मुलाने आता शेतीवाडी बघावी, लग्न करून संसार करावा आणि संसार करता करता परमार्थ साधावा हा त्यांचा विचार. त्यामुळे शिक्षणावर होणारा खर्च वाचणार होता. या उलट बाबुरावला इंग्रजी शिकायची ओढ लागली. पोरगं इंग्रजी शिकणार म्हटल्यावर गोविंदतात्यांच्या मनात एक भीती घर करून बसली. इंग्रजी शिकून पोरगं ख्रिस्ती झालं तर धर्म बुडायचा. इंग्रजी शिकण्यापेक्षा वाटल्यास पोरानं आळंदीला जाऊन भजन कीर्तन शिकावं असा निरोपही त्यांनी मुक्ताबाईमार्फत बाबुरावान दिला पण बाबुरावचा इंग्रजी शिकण्याचा निश्चय तिळभरही कमी झाला नाही. त्यामुळे बापलेकात अंतर पडलं. तेढ वाढली.

अखेर शाळा सुरू होण्याच्या वेळी वडिलांना न विचारताच बाबुराव बार्शीत आला. म्युनिसिपल इंग्लिश स्कूल (हल्लीचे सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल) या हायस्कूलमध्ये त्याने आपले नाव दाखल केले. पोरगा शिक्षणासाठी पैसा मागत नाही हे एका परीने बरे असे गोविंदरावांना वाटले. पण इंग्रजी शिकून पोरगं ख्रिस्ती होईल या कल्पनेचं भूत काही त्यांच्या डोक्यातून जात नव्हते. तेव्हा पोराचं शिक्षण बंद पाडण्यासाठी त्यांनी निराळीच युक्ती वापरली.

शिवाजीमहाराज आणि संत तुकाराम ही बाबुरावची दोन दैवतं. त्यात तिसऱ्या दैवताची भर पडली. हायस्कूलमध्ये शिकताना त्याला महात्मा फुल्यांबद्दल शिक्षकांकडून माहिती मिळाली. 'विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली, नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले'. शिक्षकाने सांगितलेल्या या वचनाची मोहिनी त्याच्यावर पडली. बहुजन समाजाला शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही हे त्याला पटले.

इंग्रजी पाचवीला असताना बाबुरावने विसाव्या वर्षात पदार्पण केले होते. त्यामुळे त्याच्या मनात लग्नाचे विचार घोळत होतेच. पण त्याला आपल्या ध्येयवादाशी जुळवून घेणारी, शिकायला तयार असणारी पत्नी हवी होती. तशी मुलगीही त्यांच्या पाहण्यात नुकतीच आली होती. तो नेहमीप्रमाणे भाऊराव पाटलांच्या घरी जेवायला जायचा. त्याचा भाबीच्या आईच त्याला नेहमी जेवण वाढायच्या. पण एके दिवशी त्यांच्याऐवजी त्यांची दुसरी मुलगी सुभद्रा म्हणजे भाबीची धाकटी बहीण जेवायला वाढू लागली.

अनुक्रमणिका

तिच्यातील नम्रता आणि धिटाई बाबरावला आवडली. त्याहीपेक्षा "मला पण शिकायचं होतं पण नानांनी शाळेतून काढून घरी बसवलं!" ही तिने व्यक्त केलेली खंत बाबुरावच्या हृदयाला फुंकर घालून गेली. सुदैवाने ही आपली पत्नी झाली तर तिला शिकवता येईल. महात्मा फुल्यांनी सावित्रीला शिकवले तसे! याच स्वप्नात बाबुराव बुडून गेला.

पोरांच इंग्रजी शिक्षण थांबविण्यासाठी गोविंदरावांनी बाबुरावला लग्नाच्या बेडीत अडकवयाचं ठरविलं. बार्शीचे भाऊराव पाटील चाऱ्याला पाहुणे म्हणून जाऊन आल्याचे आणि बाबुरावाचे लग्न पक्कं केल्याचं ऐकून बाबुराव सुखावला. भाऊराव पाटील स्वतःच्या मुलीचे सुभद्राचे लग्न जमवायला गेले असणार ही बाबुरावाचा समज. पण सुभद्राऐवजी कृष्णात पाटलाची भाची मानेगावाच्या देशमुखाची मुलगी पार्वती हिच्याशी आपलं लग्नं जमल्याचं कळताच बाबुरावांच्या स्वप्नांच्या चिधंड्या उडाल्या. कारण ही मुलगी धड ना शहाणी ना वेडी अशी असल्याचे त्याला ठाऊक होते. तेव्हा बाबुरावाने लग्नाला विरोध करून पाहिला. पण एककल्ली आणि हट्टी गोविंदरावांनी बाबुरावचे लग्न चारे येथे पार पाडले. बाबुरावची आशा-आकांक्षा आणि भावी स्वप्नं लग्न होमात जळून राख झाली.

लग्नाच्या तिसऱ्या दिवशी बाबुरावने लग्नाचे नवे कपडे काढून टाकले. नेहमीचे कपडे घालून तडक तो बार्शीला आला. हायस्कूलमध्ये शिकू लागला. तो इंग्रजी सहावी पास झाला आणि दुसऱ्या वर्षी इंग्रजी सातवीत म्हणजे मॅट्रीकमध्ये त्याने प्रवेशही घेतला. पाहुण्याकडे जेवण करून एवढे वर्ष पदरात पाडून घ्यायचे. मॅट्रिक झाल्यावर पुढचं पुढे पाहू या विचाराने तो अभ्यासाला लागला. ज्ञानासाठीच्या बाबुरावच्या या धडपडीला खीळ बसली. त्याच सालात एकाएकी बार्शीत कॉलऱ्याची साथ सुरू झाली. त्या साथीत कृष्णा पाटलांची पत्नी बळी पडली. साताठ वर्षांच्या पोराला-अंबादासला पोरंक करून गेली. पोरासाठी कुणीतरी बाई माणूस जवळं हवं होतं. नुकतंच बाबुरावशी लग्न झालेल्या लक्ष्मीला (माहेरचं नाव पार्वती) बार्शीला आणलं. लग्नामुळे रुष्ट झालेल्या बाबुरावचा आणि लक्ष्मीचा जम ही बसेल, असाही साऱ्यांचा कयास. पण या वार्तेने बाबुरावची मॅट्रिकच्या अभ्यासाची घडीच पार विसकटून गेली. बाबुराव आपल्या पत्नीचं तोंड पहायलाही तयार नव्हता. वडिलांबद्दल राग तर त्यांच्या अंतःकरणात लाव्हारसाप्रमाणे धगधगत होता. आता बार्शीत राहायचे नाही, असा पक्का विचार करून बाबुरावने आळंदीचा मार्ग धरला.

आळंदीला बाबुरावचे बरे चालले होते. एकदा चाऱ्याचे काहीजण आळंदीच्या वारीला आले. आपल्या धाकट्या भावाचं लग्नं आपल्या भाबीच्या धाकट्या बहिणीबरोबर-सुभद्रा बरोबर-होणार या बातमीने तो हतबुद्ध झाला. त्या लग्नाला बाबुराव जाणे शक्यच नव्हते. नियतीच्या क्रूर अगम्य खेळाने तो उदास झाला. भजन-पूजन आणि संत वाङ्मयाच्या अध्ययनात त्यानं स्वतःला बुडवून घेतलं. आळंदीत श्रीमारुती गुरव यांच्या हाताखाली तो भजन-कीर्तनाचे धडे गिरवू लागला. पखवाज शिकू लागला. श्री. शंकर स्वामी आणि प्रा. सोनोपंत दांडेकर यांच्या सत्संगात राहू लागला. ज्ञानेश्वरी दासबोध आणि तुकाराम गाथेची पारायणे करू लागला. ज्ञानेश्वरीचा अकरावा अध्याय मुखोद्‌गत झाला. संत वाङ्मयाची गोडी वाढली. संसाराबद्दल अनासक्तीही वाढली. वैराग्याकडं मन झुकू लागलं. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' या संतविचाराची मनात ठिणगी पडली.'

वडिलांचा निरोप मिळूनही सख्ख्या धाकल्या भावाच्या लग्नाला बाबुराव गेला नव्हता. पण सुभद्राअक्काच्या मुलीच्या लग्नाचं आमंत्रण चुकवणे त्याला अशक्य होतं. अंगात भगवे कपडे घालून

अनुक्रमणिका

बाबुरावची स्वारी अक्काच्या मुलीच्या लग्नमंडपात दत्त म्हणून हजर झाली. हा अवतार पाहून आक्काच्या काळजाचं पाणी झालं. लग्नसमारंभ आटोपल्यावर सुभद्राआक्काने बाबुरावला मॅट्रिक होण्याची गळ घातली. त्यासाठी आर्थिक मदत करण्याची तयारी दाखवली. ती बाबुरावांनी मानली आणि त्यानं सोलापूरच्या नॉर्थकोट हायस्कूलमध्ये मॅट्रीकच्या वर्गात नाव दाखल केलं. झटून अभ्यास केला. १९३० साली धारवाड केंद्रातून मॅट्रीकची परीक्षा दिली. त्यात तो उत्तीर्णही झाला. कॉलेज शिक्षण घेण्याची मनात खूप इच्छा होती पण परिस्थितीपुढे त्यांचे काही चालले नाही. मॅट्रीक झाल्यानंतर ‘पुढे काय?’ हा मोठा प्रश्न त्याच्यापुढे आ वासून उभा राहिला.

अनुक्रमणिका

# ४. संसाराच्या नावे घालोनिया शून्य!

‘मॅट्रीक तर पास झालो. आता काय करायचे? आपल्या इच्छेविरुद्ध वडिलांनी लग्नं केलं. हे करून बापाने आपल्याशी उभा दावा मांडला. लग्नासारख्या महत्त्वाच्या गोष्टीत मुलामुलींची आवडनिवड त्यांनी बघायला नको होती का? मुलंमुली म्हणजे बापाला मालकी हक्काच्या वस्तू वाटतात. असल्याकसल्या ह्या सामाजिक रूढी आणि परंपरा! महात्मा फुले यांच्या शिकवणीनुसार त्या मोडूनतोडून फेकून दिल्या पाहिजेत. आता बापाकडे पैसा मागायचा नाही. बार्शीतील मित्रांना तरी किती दिवस त्रास द्यायचा? त्यापेक्षा कॉलेजच्या शिक्षणाकडे पाठ फिरवणं सोईचं! स्वतःच्या पायावर उभं राहणं अधिक चांगलं! त्यासाठी नोकरी केली पाहिजे’ असा विचार बाबुराव करीत होता. बार्शीला नोकरी मिळाली तर ती त्याला हवीच होती. पण बार्शीत नोकरी मिळेना. तेव्हा त्याने सोलापूर, कोल्हापूर, पुणे इत्यादी ठिकाणी नोकरी शोधण्यासाठी पायपीट केली. अखेर १९३१ साली त्याला एकदाची नोकरी मिळाली. सोलापूर को-ऑपरोटिव्ह सुपरवायझिंग युनियनचा सुपरवायझर म्हणून तो नोकरीवर रुजू झाला. पण ती नोकरी कायमची नव्हती. पूर्वीचा एक सुपरवायझर काही महिन्यासाठी रजेवर गेला होता. त्याच्या रजेच्या काळातील ती तात्पुरती नोकरी होती.

ही नोकरी करीत असताना बाबुरावांपुढे एक नवीनच ताट वाढून ठेवले. अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी वडिलांनी त्याला तातडीने चाऱ्याला येण्याचा निरोप दिला होता. बापाचे तोंड पहावेसे वाटत नव्हते. पण मित्रांनी गळ घातली म्हणून बाबुराव गावी गेला.

नानासाहेब जगदाळे-बाबुरावांचे चुलते-हे अगदी साधे-सरळ स्वभावाचे पण तितकेच भोळसटही. त्यांना मुलगा नव्हता. तेव्हा त्यांच्या वाटणीच्या शेतीवर भावकीतील काहींच डोळा होता. त्यासाठी ते नानासाहेबांना घरी जेवायला बोलवू लागले. चांगलं-चुंगलं खाऊ घालू लागले. त्याबरोबरच त्यांच्या कानात वाटणीची मागणी करण्याचे विष पेरू लागले. ‘म्हातारपणी तुम्हाला कोण सांभाळणार? त्यासाठी दत्तक घ्या.’ हा भावकीचा विचार त्यांना पटला. त्यांनी गोविंदरावतात्यांकडे आपल्या हिश्शाचा जमीनजुमला वाटून मागायला सुरुवात केली. गोविंदतात्यांना धक्का बसला. या मागे भावकीतील कावेबाज कावळे असल्याचे त्यांच्या ध्यानात आले. बाबुरावलाच दत्तक देण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठीच बाबुरावला त्यांनी निरोप पाठविला होता.

गोविंदरावतात्यांनी योजल्याप्रमाणे श्री. नरसिंगराव पाटील यांच्या ढाळजात गुप्त बैठक भरली. त्या बैठकीत फक्त नरसिंगराव, गोविंदराव, नानासाहेब आणि बाबुराव एवढेच होते. नरसिंगरावांनी भावकीच्या कपटकारस्थानाची माहिती नानासाहेबांना दिली. भावकी स्वार्थासाठी गोड बोलते पण त्यांच्या हृदयात विष भरलेले असल्याची कल्पना सांगितली. नानासाहेबांचे शेत हडप करू पाहणारे ते ढोंगी बगळे असल्याचेही पटवून दिले आणि नानासाहेबांना बाबुरावानाच दत्तक घेण्याबद्दल सूचना केली. नानासाहेबांचा बाबूवर लहान-पणापासूनच लळा होताच. नानासाहेबांनी या योजनेस होकार दिला. दत्तकविधान बार्शीला जाऊन करायचेही ठरले.

४ फेब्रुवारी १९३१ रोजी बाबुरावचा अठ्ठाविसावा वाढदिवस. त्याच दिवशी दत्तकविधान करण्यासंबंधी वकिलाबरोबर चर्चा झाली. नानासाहेब भोळसट असल्याने त्यांच्या वाटणीची शेती कुणी त्यांना फसवून घेऊ नये, यासाठी दत्तकविधान करायचे हा विचार ऐकून वकील म्हणाले,

अनुक्रमणिका

“दत्तकविधानापेक्षा नानासाहेबांनी आपल्या हिश्शाच्या जमिनीचे बाबुरावांना बक्षीसपत्र करून दिले तर नानासाहेबांना फसवून कुणीही जमीन खरेदी करू शकणार नाही. दत्तकविधान केल्यावरही नानासाहेबांची निम्मी जमीन भावकीतील लोक घेऊ शकतात.” हा वकिलाचा विचार नानासाहेबांसह सर्वांनाच पटला आणि त्याच दिवशी बाबुरावांच्या नावाने बक्षीसपत्र करून दिले गेले. बाबुरावला वाढदिवसानिमित्त जणू एक अपूर्व भेटच मिळाली. दुसऱ्या दिवशी बाबुरावने चुलत्यास करारपत्र लिहून दिले. त्या करारान्वये दरवर्षी चैत्र महिन्यात बाबुरावने चुलत्यास दोनशे पंचेवीस रुपये देण्याचे ठरले.

दुसऱ्या दिवशी बक्षीसपत्राची बातमी साऱ्या चारे गावात पसरली. भावकीच्या लोकांचे पित्त खवळले. ‘बाबुराव शिक्षण घेण्याच्या हट्टापायी जन्मदात्या बापाला जुमानत नाही. तो तुम्हाला काय सांभाळणार? कराराप्रमाणं ठरलेली रक्कमही तो देईल याचा काय भरवसा? दत्तकविधान केले असते तर निदान निम्मी जमीन तरी तुम्हाक विकता आली असती. आता म्हातारपणी गावात भीक मागूनच तुम्हाला जगावे लागणार.’ भावकीने घातलेल्या या भीतीबरोबर त्यांचे बक्षीसपत्र रद्द करण्याचाही नानासाहेबांना कानमंत्र दिला. ही गोष्ट बाबुरावला कळली. नानासाहेबांची समजूत घालण्यासाठी ते गावी गेले. नानासाहेबांना समजावून सांगू लागले. पण नानासाहेबांनी भावकीने शिकवल्याप्रमाणे हातात धोंडा घेऊन तो स्वतःच्या कपाळावर हाणून घेतला. कपाळाला खोक पडली. भळभळा रक्त वाहू लागले. बाबुराव एकदम ती जखम बांधायला सरसावले पण दुसऱ्या क्षणी भावकीच्या कपटकारस्थानाची कल्पना त्यांना आली. क्षणात त्यांनी निर्णय घेतला. तबेल्यातील घोडा सोडून त्यावर टाच मारून त्यांनी चारे गाव सोडले आणि ते थेट वडाळ्यात जाऊन पोहोचले. वडाळा येथील को-ऑपरेटिव्ह सोसायटीची तपासणी करून शेरेबुकात शेरा लिहून सही केली. चाऱ्याला गेल्याचा पुरावाच त्यामुळे नष्ट झाला.

इकडे चाऱ्यात भावकीतील स्वार्थी लोकांनी नानासाहेबास भरीस घातले. नानासाहेबांच्या कपाळावर बाबुरावने खोक पाडल्याची खोटी फिर्याद नानासाहेबांना करायला लावली. ही केस पाथरी, दुर्गादेवी इत्यादी ठिकाणी प्रांतासमोर चालली. पण ज्या दिवशी नानासाहेबांच्या कपाळावर खोक पडली त्या दिवशी बाबुराव चारे गावला आल्याचे त्यांना सिद्ध करता आले नाही. १५ जून १९३१ रोजी या केसमधून बाबुराव निर्दोष ठरला.

रजेवर गेलेला सुपरवायझर परत कामावर आल्याने बाबुरावची ती नोकरीही सुटली. बार्शीतच कोठेतरी नोकरी मिळविण्याचे त्याचे प्रयत्न सुरू झाले. त्या काळात त्यांचे जुने जिवलग मित्र श्री. संभाजी बारंगुळे संसार थाटून मुलाबाळात रमले होते. ढाण्या वाघ असलेला व्यंका देवकरही बाप बनलेला! तुळजाराम जगदाळे चाऱ्याचे! तेही बार्शीला येऊन संसारी बनलेले! ते सर्वजण बाबुरावला घर करून पत्नीला आणून संसार करायला सांगू लागले. बाबुरावलाही आपण संसार थाटावा, असे वाटू लागले. ‘लग्न आपल्या इच्छेविरुद्ध झाले त्यात चूक वडिलांची. आपली किंवा बायकोची त्यात काय चूक? ती धड वेडी ना शहाणी पण तिला शहाणीसुर्ती आपणच करायला नको का? आपण तिला लिहायला वाचायला शिकवलं तर! आपल्या स्वभावाशी आणि ध्येयवादाशी ती जुळते घेईल का?’ या विचारात बाबुराव नेहमी गुरफटून गेलेलेला असायचा.

एके दिवशी त्याचे वडील बार्शीला येऊन त्याला भेटले. ते मायेनं मऊ आवाजात समजुतीच्या गोष्टी सांगू लागले, “बाबूराव, मी काय वैरी न्हाई. आपल्या मुलाचं वाईट व्हावं, असं कुणातरी बापाला कधीतरी वाटतं का? माझ्या राजा, काय मोठ्या सुकात हाईस का? ऐन तरुनपनात एकलं ऱ्हांन मंजी लई आवघड

हाय. कोन्चीबी भूक भागविली न्हाई तर मानसाची लई घसरन व्हती. बाबा, एकडाव लक्ष्मीला ठिवून बघ. घर कर. सुखी व्हा.” असं म्हणून डोळे पुसत तात्या चाऱ्याला निघून गेले.

बाबुरावानं आपल्या जीवाभावाच्या मित्राचा सल्ला घेतला. पत्नीला—लक्ष्मीला—बार्शीला आणले. श्री. विठ्ठल गोरे यांच्या वाड्यात घर केले. एकदाची बाबुरावाच्या नव्या संसाराची सुरुवात झाली.

बाबुरावाला अजून बार्शीत नोकरी लागली नव्हती. नवा संसार थाटल्यापासून तो नव्या जोमाने कामाला लागला. गाई-म्हशी पाळून दुधाचा धंदा करण्याचा त्याने निश्चय केला. चाऱ्याला बापाकडून एक कपर्दीकही घ्यायची नाही, हे त्यानं पूर्वीच ठरविलेलं. त्याने आपला मित्र श्री. व्यंका देवकरला या धंद्याची योजना सांगितली. ती व्यंकाला पटली. भांडवल उभे करण्यासाठी त्याची पत्नी स्वतःचे दागिने द्यायला तयार झाली. त्याचप्रमाणे आपल्या पत्नीनेही आपले दागिने द्यावेत ही बाबुरावची इच्छा. तशी लक्ष्मीकडे त्याने मागणीही केली. व्यंकाच्या पत्नीचे उदाहरणही पुढे ठेवले. पण लक्ष्मीने दागिने देण्यास चक्क नकार दिला. ती म्हणाली, “लगीन झाल्यापास्नं तुमी एक बी डाग केला न्हाई. आन वर माझ्या बानं केलेलं डाग बी मागाया लागलंव. मला दागिनं घालून मिरवायला बरं वाटतं. अंगावरचं दागिनं बगून आयाबाया मला नावासारखी खरी लक्ष्मी हाय म्हणत्यात. पन मी म्हन्ते आपल्याला आसला गवळ्याचा धंदा कशाला? त्यापरीस तुमाला नौकरी लागोस्तोर मी आपली चाऱ्यालाच ऱ्हाईन.” बाबुराव निराश झाला.

एवढ्यावरच थांबले असते तरी बाबुराव-लक्ष्मीचा संसार फुलला असता पण लक्ष्मीला बाबुरावचं मन, त्याची धडाडी, जिद्द आणि स्वप्नं समजलीच नाहीत. साध्या साध्या प्रसंगातून त्यांच्यात खटके उडू लागले. गाई-म्हशींच्या दुधाचा धंदा, नव्याने सुरू केलेला सरपणाचा अड्डा यांची कामे करून बाबुरावने दमूनभागून घरी यावे तरी न्याहरीचा स्वयंपाकदेखील तयार नसे. बाबुरावाला उपाशीपोटीच कामाला जावे लागे. सायंकाळच्या स्वयंपाकाचीही तयारीही ते आल्यावर सुरू व्हायची. “लवकर स्वयंपाक करायला काय होते?” असे विचारले तर “मी काय झोपा काढते का?” हे लक्ष्मीचे ठरावीक साच्याचे उत्तर ठरलेले. बरे उशिरा का होईना केलेला स्वयंपाक तरी नीट केला जात होता का? कधी भाजीत मीठच नसे. तसे सांगितले तर दुसऱ्या वेळी भाजी खारटगोट केली जायची. शेजाऱ्याच्या घरी लक्ष्मी तासन्‌तास गप्पा मारीत बसायची. ही बाबही बाबुरावला आवडत नव्हती. त्याबद्दल तो लक्ष्मीला सांगू लागला तर “बाई मानसाशी खिनभर बोलत बसलं तर काय बिघडलं?” असा तिचा उलट प्रश्न अंगावर येऊन आदळे.

लक्ष्मी ही अशिक्षित, अर्धवट. देशमुखी थाटात वाढलेली. हट्टीपणा, हेकटपणा आणि नटण्या-मुरड-ण्यात मुरलेली. बाबुरावाला या वागण्याचा त्रास होऊ लागला. मुळातच तो तापट. तो तिला रागावे. धमकावे. पण सारे पालथ्या घड्यावर पाणी! बाबुरावला नको हा संसार असे झाले. शेवटी ‘नोकरी लागेपर्यंत चाऱ्याला राहते’ या शब्दाला धरून बाबुरावने लक्ष्मीला चाऱ्याऐवजी तिच्या माहेरी पाठवून दिले आणि सुटकेचा श्वास सोडला.

ही गोष्ट सुभद्राआक्काला कळाली. तिने बाबुरावची भेट घेतली. चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या “एक डाव तिला आणा. मीही तिला समजावून सांगते. पण काही झाले तरी माहेरी पाठवू नका. सुदैवाने तुम्हाला नगरपालिकेत नोकरी लागली आहेच.” सुभद्राआक्काचा मान राखण्यासाठी बाबुरावने पुन्हा लक्ष्मीला बार्शीला आणले. पण लक्ष्मीचा अडेलहट्टीपणा काही कमी होईना. तेव्हा तिला लिहिणं-वाचणं शिकवावं म्हणजे तरी तिच्यात काही सुधारणा होईल, यासाठी बाबुरावने पाटी, पेन्सील आणि अंकलिपीचे

पुस्तक आणले. तर "घरात काय बारकं प्वार हाय काय म्हणून पाटी-पेन्सील आणली!" अशी तिची प्रतिक्रिया. "पोराआधी आईलाच शहाणी करावी म्हणून पाटी-पेन्सील आणली." असं बाबुराव गमतीने म्हणाले. तर "मी काय येडी हाय कां?" असा लक्ष्मीचा प्रतिप्रश्न! "अगं पोथी वाचायापुरतं तरी शीक" अस म्हणताच लक्ष्मी तात्काळ म्हणाली, "आमाला बामनावानी पोथी बी वाचायची न्हाई. पाटी-पेन्सीलपरीस आयन्याची चोळी तरी आनायची!" या उत्तराने बाबुरावचे पत्नीला शिकवण्याचे स्वप्नही संपले. ते हताश, निराश झाले.

एकदा बाबुराव दिवसभर काम करून भुकेजून घरी आले. तर नेहमीप्रमाणे स्वयंपाक तयार नव्हता. त्यावरून दोघांत भांडण लागले. "मला तुज्या हातचे काहीच खायचे नाही," असे म्हणून बाबुराव उपाशीपोटीच घराबाहेरील वखारीत सोडलेल्या छकड्यात तळमळत पडले. मध्यान रात्री लक्ष्मी तिथेही जाऊन त्याला उठवू लागली. तेव्हा त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. "तू घरात जाऊन झोप." असे म्हणून तो बाहेर पडला. असल्या जगण्यापेक्षा मेलेलं बरं! या विचारतंद्रीत चालताना वाटेवरून एक साप सळसळ करीत असलेला दिसला. या सापाने आपणास दंश केला तर सारेच प्रश्न संपतील, म्हणून त्याने आपला हात सापाच्या तोंडापुढे नेला. पण साप चपळाईने बिळात घुसला. बाबुरावने आपला हात बिळात घातला. पण नागोबा त्याला प्रसन्न झाला नाही.

बाबुरावने रात्रभर विचार केला. संसार म्हणजे मृगजळ. त्यामागे धावण्यात काय हशील? त्याला आळंदीत घालवलेल्या दिवसांची आठवण झाली. "संसाराच्या नावे, घालूनिया शून्य! वाढता हा पुण्यधर्म केला।" हा संत तुकारामांचा अभंग आठवला. 'परमेश्वराने सापापासून मला कशाला वाचवले? काही पुण्यधर्म करण्याचे आपल्या भाग्यात असेल कां?' असा विचार करून सकाळी तो घरी आला. लक्ष्मीला चारे येथील आपल्या वडिलांच्या घरी पाठवून दिले. त्यानंतर त्याने पत्नीला बार्शीला आणून असार संसाराचा खटाटोप केला नाही. एवढेच नाही तर गाई-म्हशीचा दुधाचा धंदा आणि सरपणाच्या वखारीच्या धंद्यातूनही त्याने अंग काढून घेतले. पुरे हा संसार. त्यापेक्षा कुठला तरी पुण्यधर्माचा मार्ग शोधावा. त्यात झोकून द्यावे. या विचारात त्याने घरसंसार मोडला. श्री. करंदीकरांची खाणावळ लावली. खाणावळीत पोटपूजा करायची आणि नगरपालिकेत नोकरीची धावपळ करताना पुण्यधर्माच्या विचाराने तो पुरता पछाडून गेला.

अनुक्रमणिका

# ५. वाढता पुण्यधर्म (सुरू) केला!

अखेर बाबुरावांना बार्शी नगरपालिकेत कलेक्शन इन्स्पेक्टरची नोकरी लागली. १३ जून १९३२ रोजी ते कामावर रुजू झाले. सचोटीने नोकरी करावी आणि वाढत्या पुण्यधर्माचा एखादा मार्ग चोखाळावा, असे त्यांनी ठरविले. पण नोकरीत तरी त्यांचे गाडे सरळ कुठे होते? नगरपालिकेतील जीवघेण्या आणि नाट्यमय घटनांमुळे बाबुरावांच्या जीवनाला एक आगळी आणि वेगळी कलाटणी मिळाली, हे मात्र खरे!

नगरपालिकेत नोकरी करताना बाबुरावांचा मित्रपरिवार वाढू लागला. सर्वश्री संभाजी बारंगुळे, रावसाहेब काळे, श्री. लाटकर हे नगरपालिकेत नोकरी करणारे त्यांचे जिवलग मित्र झाले. बाबुरावांनी श्री. कृष्णात राऊत यांच्या साहाय्याने श्री. टी. बी. जगदाळे यांनाही नगरपालिकेत नोकरीला लावले. या मित्रपरिवारात नगरपालिकेतील सभासद श्री. बाबुराव भगवंत कुदळे, श्री. कृष्णात राऊत आणि श्री. भ. र. कांबळे यांची भर पडली. एकमेकांची सुखदुःखं, अडीअडचणी आणि आशा-आकांक्षांची देवघेव करणाऱ्या या साऱ्यांचं मित्रमंडळ तयार झालं.

सारे नेकीनं कामाला लागले. पण त्या वेळी बार्शी नगरपालिकेत एक अव्वल कारकून होता. त्याचं नाव मोनोरुद्दीन. हा मोनोरुद्दीन नगरपालिकेच्या अध्यक्षांना आणि कौन्सिलर्सना धरून चाले. त्यामुळे तो इतरांशी अरेरावीने वागे. त्याने नवीन कामावर रुजू झालेल्या बाबुरावांकडे कलेक्शन इन्स्पेक्टरचे काम तर दिलेच पण त्याबरोबर दुसऱ्या एका घरपट्टी आकारणी कारकुनाचेही काम लादले. आणि त्या घरपट्टी आकारणी कारकुनाला—आपल्या जातभाईला—त्याने रेकॉर्ड किपर म्हणून नेमले. तो रेकॉर्ड तपासणी कामात लाच घेऊन लोकांची कामे करायचा. हे समजल्यावर बाबुरावांच्या रागाला पारावार उरला नाही. तरीही तो राग गिळून त्यांनी कामाला सुरुवात केली.

हे दुहेरी काम करतांना बाबुरावांना घरपट्टी आकारणी कारकुनाच्या कामात सारा सावळागोंधळ असल्याचे दिसून आले. त्याने त्याचे काम निष्काळजीपणाने केले होते. बाबुरावांनी त्या कारकुनाने केलेल्या चुकीच्या कामाचा अहवाल तयार केला आणि तो थेट चेअरमनकडे पाठवून दिला. चेअरमनने चीफ ऑफिसरचा सल्ला घेतला आणि पूर्वीच्या घरपट्टी आकारणी कारकुनाला कामावरून काढून टाकले. जनतेवरील अन्याय कमी झाल्याचे समाधान बाबुरावांना मिळाले. ते समाधान अल्पकाळच टिकले. या घटनेने मोनोरुद्दीनचा जळफळाट झाला पण चेअरमनने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध तो काहीच करू शकत नव्हता. तेव्हा तो बाबुरावांच्या मागे हात धुवून लागला.

मोनोरुद्दीन हा बाबुरावांना हेतुपुरस्सर त्रास देऊ लागला. क्षुल्लक कामासाठी तो दररोज लेखी मेमो देऊ लागला. अशा मेमोचे एक भले मोठे पुडकेच तयार झाले. स्वाभिमानी वृत्तीच्या बाबुरावांना इतका मानसिक ताप आणि त्रास होऊ लागला की ते नोकरीलाच कंटाळले. त्या मनःस्थितीतल्या तिरीमिरीत त्यांनी तडकाफडकी नोकरीचा राजीनामाच देऊन टाकला. ही बातमी त्यांच्या मित्रमंडळींना समजली. त्या वेळचे म्युनिसिपल कौन्सिलर श्री. बाबुराव भ. कुदळे ही एक वजनदार असामी. त्यांनी बाबुरावांना राजीनामा परत घ्यायची विनंती केली. पण 'त्या नालायक अव्वल कारकुनाच्या हाताखाली मला काम करायचे नाही.' असा निश्चय बाबुरावांनी व्यक्त केला. तेव्हा रावसाहेब काळे यांनी त्यातून एक नवा प्रस्ताव पुढे ठेवला. श्री. काळे हे त्या वेळी सब कमिटीवर काम करीत होते. तेथे मोनोरुद्दीचा काहीच संबंध येत

नव्हता. त्या जागेवर बाबुरावांनी काम करावे आणि काळे स्वतः बाबुरावांच्या जाग्यावर काम करण्यास तयार झाले. हा खांदेपालट बाबुरावांनी मान्य केला आणि दिलेला राजीनामा परत घेतला.

मोनोरुद्दीने तरीही बाबुरावांच्या मित्रमंडळींना त्रास देण्याचे चालूच ठेवले. तेव्हा त्याची खोडकी कायमची जिरवण्यासाठी बाबुरावांनी त्याच्या पूर्वीच्या नोकरीची खडान्खडा माहिती मिळविली. तो माढ्याला मामलेदार कचेरीत असताना त्याने लाच घेऊन मामलेदाराच्या सहीसारखी हुबेहूब सही करून एकाला रॉकेलचे परमीट दिले होते. ही गोष्ट उघडकीस आल्यावर त्याला तेथून बडतर्फ केले होते. याबद्दलच्या कागदपत्राच्या नकला बाबुरावांनी मिळवल्या. त्या नगरपालिकेच्या बोर्डावर ठेवल्या. त्यामुळे मोनोरुद्दीनचे धाबे दणाणले. त्या वेळेपासून तो सुतासारखा मऊ आणि सरळ झाला. बाबुरावांच्या मित्रमंडळींचा होणारा त्रास कायमचा थांबला.

नगरपालिकेतील अन्यायाविरुद्ध बाबुराव जिद्दीने लढत असत. अशा संघर्षातून त्यांना पुढचा पुण्यधर्म दिसला. श्री. रावसाहेब काळे यांच्या जागेवर सब-कमिटी कारकून म्हणून काम करताना ते निरनिराळ्या सब-कमिट्यांचे पास झालेले ठराव लिहिण्याचे काम करू लागले. त्याबरोबर पूर्वी पास झालेले ठरावही वाचू लागले. त्यातून मिळालेल्या माहितीनेच त्यांना बार्शीत गोरगरिबांच्या विद्यार्थ्यांसाठी बोर्डिंग काढण्याची प्रेरणा मिळाली. बार्शी शहरात त्या वेळी विविध जातीजमातींची वेगवेगळी बोर्डिंग्ज चालत होती. अनाथ विद्यार्थी वसतिगृह, हरीजन बोर्डिंग, जैन बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग आणि लिंगायत बोर्डिंग. त्यांपैकी लिंगायत बोर्डिंग चांगले चालत होते. बार्शी नगरपालिकेत लिंगायत समाजाचे वर्चस्व असल्याने लिंगायत बोर्डिंगला नगरपालिकेतर्फे वार्षिक अनुदानाचे झुकते माप मिळत असे. इतर बोर्डिंग्जनाही थातूरमातूर अनुदान मिळत असे. या गोष्टीवर बाबुराव मूलगामी विचार करू लागले.

कोल्हापुरात राजर्षी शाहूमहाराजांनी विविध जातींतील गोरगरिबांच्या मुलांची शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी हरेक जातींनी बोर्डिंग्ज सुरू केलेली. बाबुरावांचे मित्र टी. बी. जगदाळे अशा मराठा बोर्डिंगमध्ये राहून वैदिक शिक्षण घेऊन आलेले. बार्शीत विविध जातींच्या मुलांसाठी बोर्डिंग्ज चालत होती. पण गरीब मराठा शेतकऱ्यांच्या मुलांसाठी मात्र बार्शीत बोर्डिंग नसावे, याची खंत बाबुरावांना बोचू लागली. नगरपालिका कराच्या रूपाने शेतकरी, कामकरी आणि गरीब जनतेकडून पैसा जमा करते. पण त्या पैशाचा फायदा मात्र बहुजन समाजाच्या मुलांना मिळत नाही, ही बाब त्यांना चांगलीच खटकली. शेतकरी मराठा समाजाच्या मुलांसाठी बोर्डिंग सुरू केले पाहिजे. नगरपालिकेच्या मदतीचा ओघ बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे वळविला पाहिजे, या विचाराने ते उत्तेजित झाले.

बाबुराव हा विचार करीत असतानाच योगायोगाची एक क्षुल्लक वाटणारी घटना घडली. खेडेगावातील एका गरीब शेतकऱ्याचा सहावी पास झालेला विद्यार्थी त्यांना भेटला. पुढील शिक्षण घेण्याची त्याची जबरदस्त इच्छा पण आर्थिक परिस्थितीमुळे त्याला शिक्षण घेता येत नव्हते. बाबुरावांच्या ओळखीच्या काही घरात वार लावून देण्याची विनंती त्याने केली. त्या मुलाच्या चिकाटीबद्दल त्यांना अभिमान वाटला. शेतकऱ्यासारखा दाता नाही. पण त्यांच्या मुलांनी मात्र 'भिक्षापात्र अवलंबणे' हे बाबुरावांना बिलकूल मान्य नव्हते. एका मुलाला वार लावून देण्याने हा प्रश्न संपणार नव्हता. खेड्यातील अशी कितीतरी मुले शिक्षणाअभावी गुरे राखीत वा हॉटेलात कपबशा विसळीत असतील! त्यांच्यासाठी कसल्याही परिस्थितीत बोर्डिंग सुरू करायचा बाबुरावांनी निश्चय केला. ते त्या मुलाला म्हणाले, "काही दिवस तू माझ्याकडेच जेव.

खाणावळीतून माझा डबा येतो. तो आपण दोघे खात जाऊ." मुलास काय बोलावे हे सुचले नाही. त्याचे डोळे मात्र आनंदाने डबडबून आले.

बाबुरावांनी ही बोर्डिंग सुरू करण्याची कल्पना आपल्या मित्रमंडळींसमोर बोलून दाखविली. सर्वांना ती आवडली. लगेच दिनांक ५ ऑगस्ट १९३४ रोजी बाबुरावांनी मराठा समाजातील एकेवीस प्रतिष्ठित वजनदार सद्गृहस्थांची बैठक श्री. कृष्णत राऊत यांच्या आडत दुकानी आयोजित केली. पुण्यश्लोक श्री शिवाजी महाराजांच्या नावाने बोर्डिंग सुरु करण्याचे त्या बैठकीत ठरले. 'श्री शिवाजी मराठा बोर्डिंग' हे नाव कायम केले. श्री. कृष्णा राऊत आणि श्री. नरसिंग तात्या देशमुख मास्तर हे या बोर्डिंगचे अनुक्रमे अध्यक्ष आणि सेक्रेटरी झाले. बोर्डिंग चालविण्याची सारी जबाबदारी बाबुरावांनी स्वीकारली.

बाबुरावांनी आपल्या प्रपंचाचे पाश तर कायमचे तोडलेले! 'आता या बोर्डिंगमधील मुलाबाळांना स्वतःची मुले मानून त्यांचा संसार करायचा. खेडोपाड्यांतील गोरगरीब शेतकरी, कामकरी आणि दलितांच्या मुलांची बार्शीच्या बोर्डिंगमध्ये राहण्या-जेवण्याची सोय करायची. शहरातील शाळांमधून त्यांची नावे घालायची, त्यांचा अभ्यास पहायचा. त्यांच्यावर सुसंस्कार करून मोठे करायचे.' या विचारानुसार त्यांनी कार्यवाही सुरू केली.

श्री शिवाजी मराठा बोर्डिंगची स्थापना झाली. काही दिवस खाणावळीतून येणाऱ्या स्वतःच्या पुढ्यातलं जेवण ज्याला खाऊ घातलं तो मुलगा, त्याच्याबरोबर श्री. टी. जी. शिंदे आणि श्री. करपे यांना बोर्डिंगमध्ये मोफत प्रवेश दिला गेला. श्री. भगवंतराव गोणेकरांनी विद्यार्थ्यांना राहण्यासाठी आपली जागा काही दिवस मोफत दिली. चाऱ्याच्या शेतातील बाबुरावांना वाटून आलेल्या ज्वारीपैकी पत्नी लक्ष्मीला लागणारी ज्वारी तेथे ठेवून उरलेली ज्वारी त्यांनी बोर्डिंगमध्ये आणून टाकली. श्री. करपे या मुलाची आई बोर्डिंगच्या मुलांसाठी स्वयंपाक करू लागली. श्री जनार्धन मारुती गुंड यांनी स्वयंपाकासाठी लागणारी वीसेक भांडी देणगीदाखल दिली. कसबे-तडवळ्याचे मेजर शंकरराव निबांळकर यांनी आपल्या पिठाच्या चक्कीतून ज्वारी मोफत दळून देण्याचे मान्य केले. श्री. टी. बी. जगदाळे आणि लाकडाच्या इतर दोघा-तिघां व्यापाऱ्यांनी भुसा आणि सरपण बोर्डिंगमध्ये आणून टाकले. मीठ, मिरची, भाजीपाला यांसाठी भाजी मार्केटमधल्या भाजी-विक्रेत्यांकडून थोड्या थोड्या भाज्या बोर्डिंगच्या मुलांच्या झोळीत पडू लागल्या. सरपण विकायला आणणाऱ्या शेतकऱ्यांनी आपल्या सरपणाच्या गाड्यातून चार-पाच चार-पाच लाकडे बोर्डिंगसाठी द्यायला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी रजिस्टर, जमाखर्चाच्या वह्या, पावती पुस्तके आणि इतर स्टेशनरी श्री. धोंडोपंत गाडेकरांनी आपल्या 'वसंत बुक डेपो'मधून पाठवून दिली. अशा तऱ्हेने बोर्डिंगची गंगा वाहू लागली.

बाबुरावांनी गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी बोर्डिंग सुरू केल्याचे कळताच रावसाहेब श्री. भ. र. कांबळे यांनी स्वतःकडे शिक्षणासाठी ठेवून घेतलेली धनगरांची आणि मागासवर्गातील काही मुले बाबुरावांनी सुरू केलेल्या बोर्डिंगमध्ये दाखल केली.

श्री शिवाजी मराठा बोर्डिंग स्थापन होऊन त्याचे कार्य चांगल्या तऱ्हेने चालत असल्याचे बाबुरावांनी बार्शी नगरपालिकेच्या अध्यक्षांना कळविले. पहिल्या वर्षी नगरपालिकेकडून बोर्डिंगला तीनशे रुपयाचे अनुदान मिळाले. बाबुरावांचा उत्साह वाढला. ते दिवसभर नगरपालिकेत मान मोडून काम करायचे. तेथून सुटका झाल्यानंतर ते बोर्डिंगचे काम पहायचे. नंतर ते तडक सायकलीवर टांग मारायचे. बार्शीच्या

आसपासच्या खेड्यापाड्यांतून जायचे. तेथील शेतकऱ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यायचे. बोर्डिंगसाठी शेतकऱ्यांकडून मिळेल त्या धान्याचे गठुडे सायकलीवरून आणायचे. असा त्यांचा दिनक्रम चालला होता. खेड्यापाड्यांतील अज्ञानी लोक अंधश्रद्धेत रुतलेले. इंग्रजी शिक्षणाने धर्म बुडतो, या भ्रामक समजुतीत अडकलेले. 'लिव्हनं ह्ये बामनांची कामं. शिकून काय पाटीलकी वाया जातेय? शिकून का आपली पोरं मामलेदार व्हनार हाईत का? या न्यूनगंडाने पछाडलेले. त्यामुळे बोर्डिंगमध्ये मुले पाठविण्यास फारसा प्रतिसाद मिळेना. समाजपरिवर्तन मुंगीच्या पावलाने होत असते, हेही त्यांना कळत होते.

बाबुराव उस्मानाबादला गेले. तेथे त्यांची बहीण सुभद्राआक्का आणि मेहुणे बळंवतराव इर्लेकर वकील राहत. त्यांची चार मुलं शाळेत होती. वकिलाच्या व्यापामुळे मेहुण्यांना आपल्या मुलांकडे म्हणावे तेवढे लक्ष देता येत नव्हते. तेव्हा त्यांची काही मुले बोर्डिंगात आणावीत हा हेतू. तशी आपली इच्छा सुभद्राआक्कापुढे व्यक्त केली. सुभद्राआक्कानं पतीचा विरोध असतानाही दरवर्षी एक याप्रमाणे आपली चारही मुले-कोंडेराव, यशवंत, जयवंत आणि प्रभाकर-बार्शीला बोर्डिंगमध्ये पाठवली. बाबुरावांचे हे भाचे त्यांना 'मामा! मामा!' म्हणू लागले. ते ऐकून बोर्डिंगमधील इतर मुलेही बाबुरावांना 'मामा' म्हणू लागली. ते बोर्डिंगमधील मुलांचे मामा बनले. त्यानंतर बार्शीतील त्यांचे मित्रही 'मामा' म्हणून हाका मारु लागले. बार्शी शहरात आणि खेड्यापाड्यांतून त्यांचे बाबुराव हे नाव मागे पडले. सारेच त्यांना 'मामा' म्हणून ओळखू लागले. तर बार्शीचे बोर्डिंग जगदाळेमामांचं बोर्डिंग म्हणून प्रसिद्ध झाले.

या बोर्डिंगमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती पाहून भोजनबिलाच्या दराची आकारणी केली जायची. ज्या विद्यार्थ्यांची घरची स्थिती उत्तम असे त्यांना दरमहा पाच रुपये आणि ज्यांची कुवत मध्यम दर्जाची त्यांना दरमहा तीन रुपये दर ठरवून बोर्डिंगमध्ये प्रवेश दिला जाई. ज्या विद्यार्थ्यांच्या घरची गरिबी असे, त्यांना बोर्डिंगमध्ये मोफत प्रवेश दिला जात असे. पहिल्या वर्षी दहा विद्यार्थ्यां-पैकी आठ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला होता. फीचे दर आर्थिक परिस्थितीनुसार कमी जास्त असले तरी सर्व विद्यार्थ्यांना सारखीच वागणूक मिळत असे.

हळूहळू बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. श्री. गोणेकरांनी दिलेली जागा अपुरी पडू लागली. तेव्हा जगदाळेमामांनी काही जागा अल्पभाड्याने वा मोफत मिळविल्या. रायचूरकरांच्या चाळीतील दोन खोल्या, माळे गल्लीतील 'पानवाल्याची माडी' म्हणून ओळखली जाणारी आप्पारावांची माडी, देवणेगल्ली-तील श्री. पंडितराव पाटलंचा वाडा आणि घोडेगल्लीतील श्री. के. बी. माने यांची अशा जागा त्यांनी मिळविल्या. या जागांपैकी माने यांची जागा भुताची जागा म्हणून प्रसिद्ध होती. इतर जागेत विद्यार्थी राहू लागले पण माने यांच्या भुताची जागा समजल्या जाणाऱ्या जागेत राहायला विद्यार्थी का-कू करू लागले तेव्हा जगदाळेमामांनी काही विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन ती जागा झाडून, सारवून स्वच्छ केली. तरी विद्यार्थी तेथे राहायला धजेनात. तेव्हा ते मुलांना म्हणाले, "भूत ही एक खोटी कल्पना आहे. ती अघोरी अंधश्रद्धा आहे. तुम्ही भ्याल तर मात्र त्या भुताऐवजी ती भीतीच तुमच्या मानगुटीवर बसेल. म्हणून तर 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस' ही म्हण प्रचारात आली आहे." एवढे बोलल्यावर श्री. अंबादास पाटील, श्री. गटकळ, श्री. लक्ष्मण देवरे, दळवी आणि गवळी त्या जागेत रहायला तयार झाले. तेथे त्यांना पुढे कधीच ना भूत दिसले, ना भुताचा त्रास जाणवला.

अशा तऱ्हेने वेगवेगळ्या जागेत विद्यार्थी राहू लागले. त्यांना पहाटे उठविणे, अभ्यासाला बसविणे, व्यायामाला लावणे इत्यादी गोष्टी जगदाळे मामा भल्या पहाटे उठून करत असत. त्याचा त्यांना त्रासही होऊ

अनुक्रमणिका

लागला. स्वतःला होणाऱ्या त्रासाची त्यांना पर्वा नव्हती पण बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांची एकाच ठिकाणी राहण्या-जेवणाची व्यवस्था झाली तर त्यांच्यावर सुसंस्कार करणे सोपे होणार होते. त्यासाठी बोर्डिंगला स्वतंत्र जागा हवी. त्या जागेवर टुमदार इमारत बांधावी. हे जगदाळेमामांचे स्वप्न! जागा घेण्यासाठी ते प्रयत्न करू लागले. काटकसर करून पै-पैसा साठवू लागले. बोर्डिंगचे उत्पन्न वाढावे, म्हणून निरनिराळे मार्ग धुंडाळू लागले. नगरपालिकेतून जास्तीतजास्त अनुदान मिळावे म्हणून प्रसंगी होणाऱ्या विरोधाला टक्कर देऊ लागले. त्यातून त्यांना अनेक शत्रू निर्माण झाले. त्या शत्रूंनी जगदाळेमामांच्या पवित्र शिक्षणकार्याच्या वाटेत काटे पसरायला सुरवात केली.

अनुक्रमणिका

# ६. समाजपरिवर्तन प्रयोगाची पहाट

जगदाळेमामा खेड्यातच लहानचे मोठे झाले. खेड्यातील शिक्षणाबद्दलची बेफिकिरी, अज्ञान, आळस आणि अंधश्रद्धा. त्याचबरोबर भावकीतील हेवेदावे, द्वेषमत्सर, व्यसनाधिनता आणि भांडणे! 'सोलापूर को-ऑपरेटिव्ह युनियन'ची सुपरवायझरची नोकरी करताना त्यांना खेड्यापाड्यांत फिरावे लागले. तेव्हा हे चित्र सर्वत्र दिसून आले. खेड्यातील शेतकरी, कामकरी आणि दलित समाजाला मुठभर प्रस्थापित पराकोटीचे पिळत होते. त्यामुळे हा बहुजन समाज जिवंत कसा राहतो, अशी परिस्थिती. हे पाहून जगदाळेमामांचे हृदय पिळवटून जात असे. धर्माच्या नावावर चाललेला अधर्म पाहून त्यांचे मन बंड करून उठत असे. अंधारात चाचपडणाऱ्या समाजाला महात्मा जोतीबा फुलांच्या विचारांची ज्योत दाखवावी; राजर्षी शाहूमहाराजांच्या समाजपरिवर्तनाचा वसा द्यावा; कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याप्रमाणे मरणोन्मुख समाजाला ज्ञानाची संजीवनी द्यावी. या समाजसुधारकांच्या परंपरेतील कार्य चालू करून समाजपरिवर्तनाचा प्रयोग आपणही चालू करावा यासाठी त्यांनी श्री शिवाजी मराठा बोर्डिंगची सुरुवात केली.

आपले हे बोर्डिंग समाजपरिवर्तनाचे केंद्र व्हावे; जातीपातीचे तट उद्ध्वस्त व्हावेत; खऱ्या धर्माची जाण निर्माण करावी; अंधश्रद्धा गाडून टाकावी; सामाजिक जाणिवा निर्माण कराव्यात; सामाजिक जबाबदाऱ्यांचे भान लोकात यावे आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणारा विद्यार्थी त्यातून घडवावा हे त्यांचे स्वप्न बनले. बोर्डिंगमधील विद्यार्थी मन, मनगट आणि मेंदूने धट्टाकट्टा बनवावा त्यांच्यात बुद्धिवाद आणि नैतिकता रुजवावी; तो सभ्य, सरळ, सुजाण, नागरिक बनावा; त्यांच्यबरोबर त्यांनी केवळ पुस्तकी पंडित होण्यापेक्षा त्यांच्या ज्ञानाला व्यवहाराची जोड मिळावी, समाजाचे ऋण फेडण्याची वृत्ती वाढावी आणि त्यांनी समाजपरिवर्तनात झोकून द्यावे, यासाठी बोर्डिंगच्या माध्यमाचा जगदाळेमामांची कौशल्याने वापर करायला सुरुवात केली. त्यानुसार बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांवर आईच्या ममतेने आणि पित्याच्या कर्तव्यकठोर वृत्तीने सुसंस्कार ते करू लागले.

बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांचा दिनक्रम मामांनी आखीवरेखीव बनवला. तो विद्यार्थी पाळतात की नाही हे ते डोळ्यांत तेल घालून पाहू लागले. त्यासाठी ते स्वतः पहाटे पाचपूर्वी उठत. निरनिराळ्या जागेमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना झोपेतून उठवत. त्यांना घेऊन एखाद्या विहिरीवर आंघोळीला जात. पोहण्याचा व्यायाम सर्वांग-सुंदर! ज्याला पोहायला येत नसे, त्याला ते पोहायला शिकवत. काही विद्यार्थी जोरबैठका काढीत तर काही मैल दोन मैल पळून येत. व्यायामानंतर 'ऐ मातृभूमी तेरे चरणो में सिर नमाऊं।' ही सामुदायिक प्रार्थना म्हणत. 'जिस मे सुपूत उपजे श्रीराम-कृष्ण जैसे... गोरे रहेन कले तुमकोही एक पाऊ। सेवा में तेरे सारे भेदों को भूल जाऊं... मन और देह तुझपर बलिदान मै चढाऊं।' या गीतगायनाने वातावरण भारून जाई!

प्रार्थनेनंतर सर्वजण मांडी घालून बसत. लायब्ररी सेक्रेटरी त्यांच्यापुढे उभा राहून वर्तमानपत्रातील जगदाळेमामांनी अधोरेखित केलेल्या बातम्या वाचून दाखवी. मुलांच्या सामान्यज्ञानात आपोआप भर पडे. वर्तमानपत्र वाचन श्रवणानंतर जगदाळेमामा उपदेश करीत. 'शरीरमाद्यम खलु धर्म साधन!' प्रत्येकाने आपले शरीर निरोगी आणि सदृढ केले पाहिजे. त्यासाठी सकाळी व्यायाम आणि सायंकाळी खेळ खेळले पाहिजेत. निरोगी शरीरातच निरोगी मन आणि बुद्धी वास करीत असते. देवपूजा करण्यापेक्षा ही बलपूजा महत्त्वाची आहे. तीच तुम्हाला जीवनात यशस्वी व्हायात उपयोगी पडेल!" अशा प्रकारचा उपदेश

केल्यानंतर मुलांच्या न्याहरीची वेळ होई. स्वयंपाकाच्या बायांनी नाश्ता तयार करून ठेवलेला असे. कधी गव्हाची गूळ घालून केलेली कांजी, तर कधी रात्री भिजत ठेवलेली हरभऱ्याची गूळ घातलेली डाळ तर कधी रात्रीच्या शिल्लक भाकरीच्या तुकड्यांचा चिवडा न्याहरीला मिळे. व्यायाम न करणाऱ्यांना न्याहरी मिळत नसल्याने कोणी सहसा व्यायाम चुकवीत नसत.

न्याहरीनंतर विद्यार्थी आपापल्या खोलीत जाऊन अभ्यासाला बसत. अभ्यासात चुकारपणा केलेला मामांना खपत नसे. अभ्यासाव्यतिरिक्त फालतू गप्पा मारणाऱ्यांना जगदाळेमामांची बोलणी खावी लागत. प्रसंगी काहींना मारही खावा लागे. उद्या परीक्षा आहे असं समजून अभ्यास करायला ते त्यांना बजावत. मामा केवळ विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरच देखरेख करत असे नाही. स्वयंपाकघरात जाऊन स्वयंपाक करणाऱ्या बायांना चांगला स्वयंपाक करायला सांगत. स्वयंपाकासाठी लागणाऱ्या वस्तू आणून देत.

बरोबर दहा वाजता जेवणाची पंगत बसे. भोजन सेक्रेटरी जेवणाची व्यवस्था पाही. पंक्तीला वाढण्याचे काम आळीपाळीने सर्वांनाच करावे लागे. सर्व जातीधर्माचे विद्यार्थी एकाच ओळीत आपापल्या ताट-वाट्या घेऊन बसत. अशा तऱ्हेने जातिपातीचे भेद संपून जात. 'वदनीकवळ' हे गीत गाऊन जेवणास प्रारंभ होई. जगदाळेमामा पंक्तीत फिरून "लागेल तेवढेच घ्या. जेवण प्रसन्न मनाने चावून खा. उष्टे टाकू नका. अन्नाची नासाडी करू नका. अन्न पिकविण्यासाठी शेतकऱ्याला उन्हा-पावसात राबावे लागते. भुकेपेक्षा एखाद दुसरा घास कमी खा म्हणजे शाळेत गुंगी यायची नाही. ज्ञानार्जनात अडथळा नको." असे सांगत.

विद्यार्थ्यांची जेवणे झाल्यावर ते शाळेला जात. जगदाळेमामा विद्यार्थी खात तेच जेवण घेत. एखादेवेळी तेल तवंगाची भाजी कुणी ताटात वाढून आणली तर ते ताट आणणाऱ्यावर रागावत. 'जे अन्न मुलं खातात. तेच मला आणता जा' असे बजावत. एवढेच नाही तर स्वतःच्या कष्टाची ज्वारी आणि बोर्डिंगमधील जेवणाची फी ते दरमहा बोर्डिंगात जमा करीत. राहण्याच्या भाड्यापोटीची रक्कमही बोर्डिंगात भरून पावती घेत. जेवण आटोपल्यावर नगर पालिकेत कामाला जात. [त्यासाठी गावात फिरतांना ते नगर पालिकेत कामाला जात.] त्यासाठी गावात फिरतांना ते एखाद्या शाळेजवळ आले तर शाळेत जाऊन मुख्याध्यापक, शिक्षकांना भेटत. बोर्डिंगच्या मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्याची त्यांना विनंती करत.

सकाळी साडेअकरा ते साडेपाच शाळा! शाळा सुटल्यानंतर ते बोर्डिंगच्या मुलांना घेऊन कुठल्यातरी मैदानावर जात. तेथे मुले आट्यापाट्या, हुतुतू आदी खेळ खेळत. अनेकदा मामा त्यांच्या खेळात सहभागी होत. त्यांच्या गैरहजेरीत गेम सेक्रेटरी मुलांच्या खेळावर आणि शिस्तीवर देखरेख करीत असे. त्यानंतर कधी निवडक मुलांना घेऊन ते मंगळवार तालिमीत वा समर्थ व्यायाम शाळेत जात. विद्यार्थ्यांच्या कुस्त्या लावत. त्यांना कुस्त्यांचे डाव शिकवीत. पोराटोरांच्या कुस्त्यां झाल्यावर ते आपले मित्र श्री. रावसाहेब काळे यांच्याबरोबर कुस्ती खेळत. रोज सायंकाळी खेळल्याशिवाय किंवा कुस्ती केल्याशिवाय विद्यार्थ्यांना रात्रीचे जेवण मिळत नसे. तालमीत कुस्त्या खेळायच्या त्या पहिलवान बनवण्यासाठी नसून आरोग्य उत्तम राखण्यासाठी. ही त्याची निकोप दृष्टी!

संध्याकाळी सामुदायिक जेवणही 'वदनी कवळ घेता' या प्रार्थनेनंतर होई. जेवणानंतर सारे अभ्यासाला बसत. त्या काळी विजेच्या दिव्यांची सोय नव्हती. मुले रॉकेलच्या चिमण्या, कंदील लावून अभ्यास करीत. जगदाळेमामांची पाहणीफेरी चुकत नसे. दहा वाजेपर्यंत अभ्यास करणे विद्यार्थ्यांना

बंधनकारक असे. दहाच्या सुमारास पुन्हा मामांची पाहणीफेरी खोल्याखोल्यांतून असे. दहा वाजल्यानंतर मामा साऱ्यांना झोपायला सांगत, दहा वाजल्यानंतर काही मुलं उशाला जळती चिमणी तशीच ठेवून झोपी जायचे. मामा ती चिमणी विझवायचे. काही मुलांच्या अंगावर पांघरूण नसायचे. मामा ते त्यांच्या अंगावर नीट पसरायचे. बोर्डिंगमध्ये पहिली-दुसरीची लहान मुलं असायची. त्यांना झोपण्यापूर्वी लघवीला व शौचास बसवून आणायचे. झोपवायचे. 'तोंडावरून पांघरुण घ्यायचे. नाक मात्र उघडे ठेवायचे' अशा सूचना करून आपल्या खोलीत परतायचे. सर्व मुले झोपली तरी हा योगी जागा असायचा. बोर्डिंगचा जमाखर्च पूर्ण करेपर्यंत कधी कधी बाराही वाजून गेलेले असायचे. त्यानंतर ते आपली घोंगडी अंथरायचे. संत ज्ञानेश्वर किंवा संत तुकारामाचा एखादा अभंग गुणगुणत ते अंथरुणावर आडवे व्हायचे. सगळ्यांच्या शेवटी मामा झोपायचे ते दुसऱ्या दिवशी सर्वांच्या अगोदर उठून त्यांना जागे करण्यासाठीच!

जगदाळेमामांच्या मार्गदर्शनाखाली बोर्डिंगची मुलं स्वावलंबनाचा धडा गिरवू लागली. स्वतःचे कपडे स्वतः धुवू लागली. मामांनी दिलेल्या इस्त्रीने कपड्याला इस्त्री करू लागली. स्वतःच्या ताटवाट्या घासू लागली. जेवणासाठी लागणारा भाजीपाला, मीठ, मिरची-मसाला खरेदी करू लागली. बोर्डिंगचा जमाखर्च लिहिण्याचेही शिकू लागली. बार्शीत स्वावलंबनाची पहाट हसत उगवू लागली.

बोर्डिंगमध्ये दर रविवारी विद्यार्थ्यांची सभा भरे. त्या सभेत प्रत्येक विद्यार्थ्याने बोललेच पाहिजे, हा मामांचा दंडक. पुढच्या रविवारच्या सभेतील विषय अगोदर ठरे. त्या विषयांच्या शीर्षकांकडे नजर टाकली तरी मामांची समाजसुधारणेची कळकळ दिसून येते. 'समाजातील रूढी आणि जुन्या चालीरिती', 'समाजसेवा हीच खरी ईश्वरी सेवा', 'अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील एक कलंक', 'स्त्रीशिक्षणाचे महत्त्व', 'महात्मा फुले आणि त्यांचे कार्य', 'बुवाबाजी समाजातून नष्ट झाली पाहिजे'. 'अंधश्रद्धांनी येणारं पांगुळपण' इत्यादी विषयावर मुले आपल्या मोडक्यातोडक्या शब्दांत बोलत. शेवटी मामा मार्गदर्शन करीत. त्या काळी 'किर्लोस्कर' मासिकातून बुवाबाजी विरुद्ध प्रसिद्ध झालेले लेखही ते विद्यार्थ्यांना वाचून दाखवीत.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी. त्यांना व्याख्यानाची तयारी करता यावी म्हणून मामांनी बोर्डिंगमध्ये एक ग्रंथालयाही सुरु केले. विद्यार्थ्यांनी आठवड्याला एक तरी पुस्तक वाचावे ही मामांची इच्छा! मामा विद्यार्थ्यांना चढाओढीने अभ्यास करायला लावीत. बक्षिसाचे गाजर दाखवत. गरीब मुलांना कागद, पेन्सील, टाक, दऊत, वह्या पुस्तके पुरवीत. विद्यार्थ्यांपुढे आदर्श ठेवण्यासाठी ते पदवीधर झालेल्यांचे बोर्डिंगमध्ये सत्कार घडवून आणीत. श्री सूर्यवंशी, श्री. व्ही. के. पाटील वकील आणि श्री. उबाळे वकील आदीचे सत्कार त्यांनी मुलांपुढे केले. अशा सत्कारातून मुलांना पुढे शिकून पदवीधर होण्याची प्रेरणा मिळावी हा त्यांचा एकमेव हेतू असे.

बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांच्या शाळेतील प्रगतीबद्दल मामा फारच जागरूक आणि चोखंदळ असत. गरीब विद्यार्थ्यांना नापास होण्याचा मुळीच अधिकार नाही. विद्यार्थी नापास झाला तर त्यांच्या पालकांनी पोटाला चिमटा घेऊन केलेल्या खर्चाचे मुसळ केरात जाते. त्यांना एक जादा वर्षाच्या खर्चाचा भूर्दंड पडू नये, ही त्यांची भावना. खऱ्या अर्थाने जगदाळेमामा हे बोर्डिंगच्या मुलांचे पालक झाले. मुलांच्या प्रगतिपुस्तकावर पालक म्हणून सही करताना ते मुलांना अनेक प्रश्न विचारीत. कमी मार्कस् मिळविण्याऱ्याला ते रागवत. पास होणाऱ्यांना पहिला नंबर मिळवायला सांगत. त्यामुळे मुलं मानेवर खडा ठेवून अभ्यास करीत. वार्षिक परीक्षेत त्यामुळे सहसा कुणी नापास होत नसे. गुणवंत मुलांचं कौतुक आणि कमी गुणी मिळविणाऱ्यांना कडक शासन या गोष्टी मुलांस आपली प्रगती करण्यात उपयोगी पडत.

अनुक्रमणिका

सौ. सुभद्राआक्का आणि तिचे पती श्री. बळवंतराव इर्लेकर वकील आपल्या मुलांची प्रगती पाहण्यासाठी अधूनमधून बार्शीला येत. बळवंतरावांचे आणि मामांचे सूत काही जमत नसे. पण सुभद्राआक्काशी मात्र मामा मोकळेपणानं बोलत. त्यांनी दिलेला सल्ला मानीत. असेच एकदा ते पतीपत्नी आपल्या मुलांना भेटायला बोर्डिंगमध्ये आले. रविवारचा दिवस. बोर्डिंगमध्ये फिस्ट. फिस्टचा मेनू मुलेच ठरवीत. सामान खरेदी करीत. स्वयंपाकात मदत करीत. आनंदाने एकत्र जेवण करीत आणि तिसऱ्या प्रहरी सभेत भाषणे ठोकीत. बोर्डिंगमधला नागनाथ बारसकर हा विद्यार्थी खूप हुशार. सभेतही चांगला बोलायचा. वर्गातही त्याचा सतत पहिला नंबर. पण तो अधूनमधून आजारी पडायचा. त्याच्यावर मामांनी बरेच डॉक्टरी उपाय केले. पण त्यात त्यांना यश आले नाही. त्याची खंत ते येणाऱ्याजवळ बोलून दाखवत आणि इतर मुलांच्या यशाचा पाढा वाचीत. तसा त्यांनी सुभद्राआक्कापुढेही वाचून दाखवला. खेळ, निबंधलेखन, वक्तृत्व या स्पर्धांत जिंकलेल्या बक्षिसात बोर्डिंगच्या मुलांचा सिंहाचा वाटा असे. त्याचा मामांना खूप अभिमान वाटत असे.

सौ. सुभद्राआक्कानं सारं बोर्डिंग फिरून पाहिलं. इतर मुलांबरोबर आपल्या मुलांची प्रगती सुधारल्याचं पाहून त्यांना समाधान वाटलं. आपल्या मुलांना बोर्डिंगमध्ये ठेवायला प्रथम विरोध करणारे त्यांचे मेहुणे श्री. बळवंतरावही मुलांची प्रगतिपुस्तके पाहून सुखावले. सुभद्राआक्कानं सारं बोर्डिंग फिरून पाहिलं. मामांनी पाहायला दिलेला बोर्डिंगचा त्रैवार्षिक अहवालही त्यांनी वाचला. त्यात आठ आणे आणि त्यापेक्षा जास्त रकमेच्या देणग्या देणाऱ्यांची आणि किमान एक पायली ज्वारी देणगी देणाऱ्यांचीही नावे छापलेली होती. एका शेतकऱ्याने ज्वारीऐवजी दोन मण कांदे बोर्डिंगला देणगी दिल्याचेही अहवालात नमूद केलेले! हिशेब चोख ठेवलेला. जमाखर्चही ऑडिटरच्या शेऱ्यासहित त्यात छापलेला! हा सचोटीचा कारभार पाहून सुभद्राआक्काला आपल्या ध्येयवादी भावाचा अभिमान वाटला. त्या म्हणाल्या, “बोर्डिंगमध्ये मुले वाढताहेत. आता बोर्डिंगला स्वतःची जागा हवी. प्रशस्त मोकळी जागा घ्या. आणि ती बांधा आपल्या सोईनं हवी तशी! स्वतःची जागा झाल्यावर खरी भरभराट होईल बघ बोर्डिंगची. केवढी पुण्याई वाटून घेतलीस तू अडाणी आणि गरीब पालकांची!”

“तोच विचार चाललाय आक्का! बार्शी शहराच्या पश्चिमेला कुर्डवाडी रोडला रेल्वे रुळाजवळची जागा पाहून ठेवलीय. बोलणी चाललीत. थोड्याच दिवसात ती जमीन खरेदी करतोय!”

“तिथं बोर्डिंग उभं राहिलं म्हणजे बार्शीच्या पश्चिमेला ज्ञानाचा सूर्य उगवल्यासारखं होईल!” आक्का आनंदानं उद्‌गारल्या.

त्या जागेवर बोर्डिंगच्या इमारतीचे स्वप्न गोंजारत जगदाळेमामा आपल्याच विचारात गढून गेले.

अनुक्रमणिका

# ७. देवांची देवळे ज्ञानमंदिरे व्हावीत!

'देव तर सर्वव्यापी! त्याला राहण्यासाठी घराची म्हणजे मंदिराची काय गरज? मंदिरे बांधून माणूस स्वतःच्या स्वार्थासाठी देवाला मंदिरात बंदीवान करतो. लोकसेवा हीच ईश्वरसेवा या न्यायाने देवासाठी मंदिरे बांधण्याऐवजी गोरगरीब लोकांसाठी घरे बांधून देणे हीच खरी ईश्वरसेवा. हीच त्याची खरी पूजा. पण समाजात असे घडत नाही. लोकही भारी भोळे आणि खुळे! आपल्या पोटच्या पोरांना दूध, दही, पोळी, तूप, मध, फळे खाऊ घालत नाहीत. पण ह्या साऱ्या वस्तू देवळातील दगडी मूर्तीच्या आंघोळीसाठी आणि नैवद्यासाठी वापरतात. दगडाच्या देवापेक्षा मुलाबाळांचा त्या वस्तूवर अधिक अधिकार आहे. म्हणूनच देवाची मंदिरे बांधण्यापेक्षा सारी देवळे खरीखुरी ज्ञानमंदिरे झाली पाहिजेत.' राजर्षी शाहूमहाराज यांच्या विचाराने भारून गेलेले जगदाळेमामा वरील विचार करीत बसले होते. कारण नुकत्याच सुरू केलेल्या श्री शिवाजी मराठा बोर्डिंगसाठी भविष्यात बांधावयाच्या इमारतीचे विचार त्यांच्या मनात घोळत होते. त्याच वेळी बोर्डिंगचे उपाध्यक्ष आणि त्यांचे स्नेही श्री. भगवंतराव रघुनाथ कांबळे त्यांना भेटायला बोर्डिंगमध्ये आले.

श्री. भ. र. कांबळे हे नगरपालिकेचे कौन्सिलर आणि ऑनररी ब्रँच मॅजिस्ट्रेट होते. सरळ, सेवाभावी सज्जन गृहस्थ. मागासलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे, यासाठी ते साहाय्य करायचे. म्हणूनच सरकारने त्यांना रावसाहेब ही पदवी दिलेली. आल्याबरोबर ते जगदाळेमामांना म्हणाले, "मामा, गेली रात्रभर माझ्या डोक्यात शुभ विचाराचे वारे वहात आहेत. सूर्योदयाला निर्णय घेतला आणि ती आनंदाची शुभवार्ता तुम्हाला सांगायला आलोय."

"आनंदाची कोणती बातमी घेऊन आलात?"

"कसब्यात संकेश्वराचे देऊळ आहे. रस्त्याला लागून. सिटी सर्व्हे नंबर ९३५ मधले. हे देऊळ मूळचे श्री. धोंडिबा नलावडे यांच्या खाजगी मालकीचे. धोंडिबाच्या मृत्यूनंतर ते वारसाहक्काने त्यांचा दत्तक पुत्र श्री. मार्तंड नलावडे यांच्या मालकीचे झाले. त्यांनी ते देऊळ एखाद्या चांगल्या सार्वजनिक कार्यासाठी वापर करण्यासाठी माझ्या नावावर १९२५ सालीच बक्षीसपत्र करून दिलेले आहे."

"हाँऽऽ त्या अंधाऱ्या देवळाचा वापर गांजेखस आणि दारूबाज चांगलाच करत आहेत की." जगदाळे-मामा बोलू लागले, "दिवसा तेथे गाढवे आणि कुत्री यांचा वावर असतो. त्या देवळाची का आहे आनंदाची बातमी?"

"तीच सांगायला मी आलोय. हे संकेश्वराचे देऊळ आपल्या बोर्डिंगसाठी बक्षीसपत्र करून देण्याचा मी निर्णय घेतलाय!"

"खरोखरच ही आनंदाची बातमी आहे. आपल्या बोर्डिंगच्या भावी भरभराटीचे हे लक्षण मानायला हरकत नाही. योगायोगावर माझा विश्वास नाही. पण हा चांगला योगायोग घडतोय खरा. देवळांची ज्ञानमंदिरे व्हावीत, याचाच मीही विचार करीत होतो. देवळाभोवतीच्या मोकळ्या जागेत इमारत बांधून तेथे शाळाही सुरू करता येईल. त्या अर्थाने देवळाचे विद्यामंदिर होईल, यात शंका नाही."

अनुक्रमणिका

श्री. भ. र. कांबळे यांनी त्या आठवड्यात संकेश्वर देवळाचे संस्थेला बक्षीसपत्र करून दिले. पण या संकेश्वर देवळामुळे जगदाळेमामांना अनेकांच्या विरोधाला तोंड द्यावे लागले.

संकेश्वर देऊळ बक्षीसपत्राने बोर्डिंगला मिळाल्यानंतर पहिली नऊ वर्षे कुणीही या बक्षीसपत्राविरुद्ध तक्रार केली नव्हती. जगदाळेमामांनी बोर्डिंगतर्फे या देवळाचे नगरपालिकेचे सर्व कर भरले होते. तसेच नगरपालिकेकडून आलेल्या नोटिसीनुसार दगड काढणे, तेथे एक नवीन खोली बांधणे, मुतारी बांधणे इत्यादी कामे नगरपालिकेची परवानगी घेऊन केली होती. त्या देवळाची सारी व्यवस्था संस्थाच पहात होती. काही विद्यार्थीही तेथे रहायचे. या देवळाची स्वच्छता ठेवण्याचे काम संस्थेचा गडी करत असे, तर देवळातील दररोजची दिवाबत्ती बोर्डिंगमधील विद्यार्थी आळीपाळीने करीत असत. देवळात बसून ते अभ्यासही करीत असत.

महाशिवरात्रीच्या दिवशी श्रावण सोमवारी हिंदू भाविक या देवळातील देवाच्या दर्शनाला येत. देवापुढे धर्मादाय पेटी ठेवलेली. देवाला ओवाळायचे पैसे लोक त्यात टाकीत. ते पैसे संस्थेकडे जमा होत. देवालय पूर्वापार खाजगी मालकीचे असल्याने कुणा गुरवाला अथवा ब्राह्मणाला या देवळातील पूजेचे हक्क वगैरे नव्हता. तरी पण वर्षातून एखादे वेळी लोक ब्राह्मणाकडून देवाला अभिषेक करीत. तोही संस्थेची परवानगी घेऊन. अभिषेक संपल्यानंतर ते धर्मादाय पेटीत एक रुपया दान टाकीत.

लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरू केलेले. शिवाजीमहाराज तर जगदाळेमामांचे दैवत! तेव्हा जगदाळेमामांनी बार्शीत शिवजयंती महोत्सव साजरा करण्याचे निश्चित केले. शिवाजीमहाराज हे खरेखुरे रयतेचे राजे. त्यांचा गोरगरिबांविषयीचा कळवळा,त्यांची सामाजिक न्याय-प्रस्थापनेची जाण आणि कृती, त्यांची उच्च दर्जाची नैतिकता या गोष्टी महाराष्ट्रालाच नव्हे तर साऱ्या भारताला आदर्शवत आणि अनुकरणीय. तरुणांना त्यांच्यापासून प्रेरणा मिळावी, म्हणून जगदाळेमामांनी हा शिवाजी जन्मोत्सव बार्शीत सुरू केला. हा उत्सव संस्थेचे कार्यकर्ते, विद्यार्थी आणि कसबा पेठेतील लोक दरवर्षी एकदिलाने साजरा करीत. या निमित्ताने बार्शी शहरातून जंगी मिरवणूक निघे. शिवाजीमहाराजांच्या जयजयकाराने अवघी भगवंत नगरी दुमदुमून जाई. त्या दिवशी बोर्डिंगमध्ये सणाचे वातावरण असे. त्या दिवशी जगदाळेमामा स्वखर्चाने गावातल्या गोरगरिबांना खिरीचे जेवण देत असत.

या शिवजयंती समारंभाच्या निमित्ताने जगदाळेमामा देशभक्तीपर गीते, पोवाडे इत्यादी करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करत. त्याचबरोबर कुस्त्या, विविध खेळांच्या स्पर्धा आणि निबंधलेखन, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धाही आयोजित करीत. यशस्वी स्पर्धकांना समारंभपूर्वक बक्षिसेही वाटत. या बक्षीस समारंभासाठी ते अभ्यासू वक्त्यांना आमंत्रित करीत. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे कुलगुरू झालेले इतिहासाचे गाढे अभ्यासक डॉ. आप्पासाहेब पवार यांना त्यांनी एका वर्षी या कार्यक्रमाला बोलाविले होते. हे सारे कार्यक्रम मोठ्या जोषात, जल्लोषात आणि शिवाजीमहाराजांच्या जयजयकारात साजरे होत होते. हे कार्यक्रम संकश्वेर देवळात होत. इतरांना असे कार्यक्रम तेथे करायचे असतील तर त्यांना संस्थेची रीतसर परवानगी घ्यावी लागे.

दरवर्षी होणाऱ्या या शिवजन्मोत्सवात साऱ्या जातिधर्मांचे लोक भाग घेत. या महोत्सवामुळे बहुजन समाज जागृत होऊ लागला. जगदाळेमामांच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊ लागला. हे पाहून काही मतलबी

लोकांनी धर्माच्या नावावर जगदाळेमामांच्या आणि त्यांच्या बोर्डिंगच्या विरुद्ध रान उठवायला सुरुवात केली. जगदाळेमामा अस्पृश्य मुलांकडून देवळात दिवाबत्ती करतात म्हणजे धर्म बुडवतात, हा त्यांचा आरोप! त्यांना लिंगायत समाजातील काहींनी टेकू दिला आणि १९४५ साली वेगळा शिवजयंती उत्सव संकेश्वर देवळात आणि तोही बोर्डिंगची म्हणजे जगदाळेमामांची परवानगी न घेता करायचे त्यांनी ठरविले. हे देऊळ सार्वजनिक असल्याचा त्यांचा दावा. ही गोष्ट सिद्ध करण्यासाठी कोर्टात जाण्याचीही ते भाषा बोलू लागले. पण तत्पूर्वी या लोकांनी बहुजन समाजातील लोकांनाच पुढे करून भांडणे आणि कुरापती काढायला सुरुवात केली.

संकेश्वर देवळात बोर्डिंगची मुलं अभ्यासाला येत. त्यांना दारुडे आणि गांजेखस लोक त्रास देऊ लागले. तेव्हा अशा लोकांना जगदाळेमामांनी देवळाबाहेर हाकलून लावले. ते चिडले. त्यांनी मामांचे नातेवाईक श्री. दत्तू पाटील यांना चिथावले. बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांनी देवळात अंड्यांची टरफले टाकली या बातमीची शहानिशा न करता श्री. दत्तू पाटील यांनी तर्रर्र होऊन देवळातल्या मुलांना शिवीगाळ सुरू केली. गर्दी जमली. प्रकरण हातघाईवर आले तेव्हा श्री. व्यंका देवकर आणि विद्यार्थी खवळले. त्यांनी विरोधकांना बेदम चोप देऊन पळवून लावले. तेव्हा लोकांनी नंतर श्री. सखाराम जगदाळे यांना पुढे करून स्वतंत्ररीत्या शिवजयंती जगदाळेमामांची परवानगी न घेता करण्याचे ठरविले.

ही कुणकुण श्री जगदाळे मामांना अगोदरच लागली होती. शिवजयंतीचा कार्यक्रम १३ मे १९४५ ला होता. तेव्हा मामांची ९ एप्रिल आणि २९ एप्रिल १९४५ या रोजी कलेक्टरना दोन पत्रे लिहून श्री सखाराम जगदाळे यांचे संस्थेची परवानगी न घेताच उत्सवाचे पत्रे संकेश्वराच्या देवळाच्या भिंतीवर टाकायचा प्रयत्न चालविला. श्री जगदाळे मामा आणि बोर्डिंगच्या विद्यार्थी वानरसेनेचे/ने त्याला विरोध केला. प्रकरण हातघाईवर येण्याची चिन्हे दिसू लागली. श्री सखाराम जगदाळे याने श्री जगदाळे मामांच्या गचुरीला धरण्याचाही प्रयत्न केला. पण बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांनी त्याला आल्हाद वर उचलला. इतक्यात पूर्वसूचनेनुसार पोलीस आले. त्यांनी श्री सखाराम जगदाळे यांच्यावर खटला भरला. प्रकरण कोर्टात गेले. पुढे कोर्टात श्री सखाराम जगदाळे यांनी संस्थेच्या देवळाच्या वहिवाटीस हरकत करणार नाही, असे लिहून दिले. पण प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही.

विरोधकांनी वर्गणी गोळा करून पैसा जमविला आणि संकेश्वर देऊळ हे सार्वजनिक असल्याचे सिद्ध करण्यासाठी कोर्टात केस दाखल केली. हे देऊळ संस्थेच्या खाजगी मालकीचे असल्याचे सिद्ध करणारे पुरावे कोर्टात दाखल केले गेले. त्यामुळे बार्शी आणि सोलापूरच्या कोर्टात संस्थेच्या बाजूने निकाल लागला. शेवटी विरोधकांनी मुंबईच्या हायकोर्टात दावा दाखल केला. पण हायकोर्टानेही संस्थेच्या बाजूने निर्णय दिला तेव्हा कुठे विरोधक गप्पगार पडले. या कामी संस्थेचे हितचिंतक, मुंबई राज्याचे त्या वेळचे अबकारी मंत्री ना. ल. मा. पाटील यांचे संस्थेला बहुमोल मार्गदर्शन मिळाले.

सध्या संकेश्वर देवळात दुमजली इमारत बांधून पूर्ण झाली असून त्या इमारतीमध्ये ‘महात्मा फुले विद्यामंदिर’ ही प्राथमिक शाळा सुरु आहे. जगदाळेमामांचे ‘देवांची देवळे ही ज्ञानमंदिरं व्हावीत’ हे स्वप्न साकार झाले आहे.

अनुक्रमणिका

# ८. भगीरथ प्रयत्नाने ज्ञानगंगा दारोदारी!

श्री शिवाजी बोर्डिंगमध्ये मुले पाठवायला खेड्यातील लोक प्रथम तयार नसायचे. पण जगदाळेमामांनी नगरपालिकेत नोकरी करीत करीत बार्शी तालुक्यातील गावांना भेटी दिल्या. बोर्डिंगसाठी ज्वारी जमा करण्याचा त्यांचा उद्देश पण त्याहीपेक्षा शिक्षणाचे महत्त्व लोकांच्या गळी उतरवणे त्यांना महत्त्वाचे वाटे. त्यात त्यांचे भाचे बोर्डिंगमध्ये आहेत हे समजल्यावर पालक हळूहळू आपली मुले बोर्डिंगात पाठवू लागले. महादेवाच्या पिंडीवर गळतीचा एकेक थेंब पडत असतो. शंकराला प्रसन्न करण्यासाठी. त्याप्रमाणे जगदाळेमामा चिकाटीने, सातत्याने गोरगरीब शेतकऱ्यांना शिक्षणाचे महत्त्व समजाऊन सांगायाचे. ह्या शेतकऱ्याला शिक्षणाचे महत्त्व समजल्यावर त्यांचा तिसरा ज्ञानाचा डोळा उघडेल आणि त्यांचे कोटकल्याण होईल, ही त्यांची दृढ धारणा. त्याचेच फळ म्हणजे बोर्डिंगमध्ये विद्यार्थीसंख्या वाढू लागली. ती १९४०-४१ या शैक्षणिक वर्षात एकशे बारापर्यंत गेली. जागा अपुरी म्हणून प्रवेश बंद केल्याचे सांगणेही त्यांच्या जीवावर येत होते. हा मुलांचा ओघ कमी करण्यासाठी त्यांना प्राथमिक शिक्षणाची गंगा लोकदारी नेण्याची गरज वाटू लागली. पर्वत महंमदाकडे येत नाही म्हणून महंमदाने पर्वताकडे गेले पाहिजे.

बार्शी तालुक्यातील अठ्ठ्याऐंशी गावांना जगदाळेमामांनी भेटी दिल्या. त्यांपैकी निम्या गावात स्कूलबोर्डाच्या प्राथमिक शाळा होत्या. त्या गावातील मुले तिसरी-चवथी पर्यंतचे शिक्षण घेऊन पुढल्या शिक्षणासाठी बार्शीला बोर्डिंगमध्ये यायची. पण ज्या गावची लोकसंख्या हजारपेक्षा कमी होती त्या गावातील छोट्या बालकांना पहिली ते चवथी शिक्षण घेण्यासाठी बार्शीला बोर्डिंगमध्ये यावे लागायचे. अशा गावात प्राथमिक शाळा सुरू केल्या तर लहान मुले आणि मुख्यतः मुली आईबापांच्या मायेच्या छत्रात राहून विनाखर्च शिकू शकतील. कारण एक मुलगी शिकली तर एक कुटुंब शिकल्यासारखं होते. म्हणून ज्या गावी प्राथमिक शाळाच नाहीत तेथे कर्मवीर भाऊराव पाटलांनी व्हालंटरी शिक्षणाचे जाळेच उभे केल्याची त्यांना माहिती होती. अशा गावोगावी सुरू करायच्या व्हालंटरी शाळेत आपल्याच बोर्डिंगमधून सातवी वा मॅट्रीक झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षक म्हणून नेमता येईल हाही त्यांनी विचार केला. गावोगावी सुरू करावयाच्या व्हालंटरी शाळेचा हा विचार जगदाळेमामांनी आपल्या मित्रमंडळींना सांगितला. सर्वांना तो पटला. १९४० साली 'साक्षरता प्रसारक मंडळ' ही संस्था स्थापन झाली. या संस्थेच्या कार्यकारी मंडळावर ते पहिल्यापासून कार्यरत होते. या संस्थेने १९४० पासून १९५५ पर्यंत बार्शी तालुक्यातील सुमारे ५५ खेड्यापाड्यांतून व्हालंटरी शाळा काढून इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या शिक्षणाचा जोरदार प्रसार केला. या संस्थेचे अध्यक्ष म्हणून श्री. काकासाहेब झाडबुके तर सेक्रेटरी म्हणून श्री. गाडेकर मास्तर काम पाहत होते. जगदाळेमामांचा या कार्यात सिंहाचा वाट होता. त्यांना त्यांचे मित्र श्री. टी. बी. जगदाळे, श्री. संभाजी बारंगुळे, देशमुख मास्तर, श्री. अंबादास पाटील, श्री. एस. के. रेवडकर, श्री. रा. गे. शिंदे गुरुजी, श्रीधर पाटील आदींचे सहकार्य लाभले. भगिरथ प्रयत्नाने ज्ञानगंगा खेड्यापाडयांतील दारोदारी जाऊन पोहोचली. ही संस्था कायद्याप्रमाणे ८ फेब्रुवारी १९४३ रोजी रजिस्टरही झाली होती.

या व्हॉलंटरी शाळा चालवतानाही जगदाळेमामा आणि त्यांच्या सहकाऱ्यांना अनेक अडीअडचणींना तोंड द्यावे लागले. हा इतिहासही लक्षणीय आहे. साक्षरता प्रसारक मंडळाच्या कार्यकारणीच्या बैठकीत जगदाळेमामा शाळेच्या अडचणीही सांगत होते आणि त्यावर उपायही सुचवत होते. व्हॉलंटरी शाळांना मिळणारे तुटपुंजे अनुदान शिक्षकांच्या पगारासाठीही पुरत नसे. प्रत्येक शिक्षकाना दरमहा कसेबसे तेवीसचोवीस रुपये मिळत. हा पगार लोकलबोर्डाच्या शिक्षकांना मिळणाऱ्या पगाराच्या निम्माही नसे.

जगदाळेमामा म्हणाले, “शिक्षकांनाही पोट असतं. मुलाबाळांचा संसार असतो. निम्म्या पगारात त्यांचे कसे भागणार? शिक्षक आर्थिक विवंचनेत राहिले तर मुलांना मन लावून शिकवणे त्यांना मानसिकदृष्ट्या अशक्य होते. त्यांना पूर्ण पगार द्यायचा तर संस्थेला वर्षाला सहासात हजारांची तूट येते. ती कशीही करून भरून काढली पाहिजे.”

“ती कशी भरून काढायची?” श्री. नि. रं. सावळेने प्रश्न केला.

“ती कशी भरून काढायची? त्यासाठी आपण काय करावे ते सांगा मामा. म्हणजे त्या कामाला आपण लागू.” श्री. रा. गे. शिंदे यांनी मामांना विनंती केली.

“तेच सांगायला सुरुवात करतो.” जगदाळेमामा बोलू लागले. “प्रथम शासनाकडे आणि जिल्हा लोकलबोर्डाकडे अनुदान मिळण्यासाठी विनंतीवजा ठराव करून पाठवू.” या सूचनेप्रमाणे दोन ठराव पास झाले. पहिला असा : “सरकारने सुचविलेल्या स्केलप्रमाणे (शिक्षकांना) पगार देण्यास संस्थेला मिळणाऱ्या ग्रँटशिवाय जी जादा रक्कम लागेल, ती सरकारने संस्थेस द्यावी. अथवा शिक्षणाप्रीत्यर्थ घेतल्या जाणाऱ्या लोकलफंडाच्या रकमेतून डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाकडून (मदत म्हणून) देववावी.”

दुसरा ठराव मोठा आणि सविस्तर होता. तो मामांनी सेक्रेटरींना डिक्टेक केला. ते बोलत होते. श्री. गाडेकर मास्तर लिहून घेत होते. “सोलापूर जिल्ह्यातील शिक्षणाचे कार्य डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड हे लोकलफंडातून चालविते. या लोकलफंड रकमेत ज्या ज्या गावी संस्थेच्या व्हॉलंटरी शाळा आहेत, त्या त्या गावच्या लोकांचाही पैसा आहेच. त्या गावच्या शिक्षण कार्याकरिता डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डास काहीएक खर्च येत नाही. कारण संस्थेच्या व्हॉ. शाळा ज्या ठिकाणी डि. लो. बोर्डाच्या शाळा नाहीत, अशाच ठिकाणी आहेत. अशा गावच्या शिक्षणाचे कार्य संस्था करीत आहे आणि या कार्यासाठी संस्थेस प्रतीवर्षी मोठी तूट सोसावी लागली आहे. यापुढेही (व्हॉ. शिक्षकांचा पगारस्केल देण्याच्या) नवीन योजनेप्रमाणे संस्थेस सुमारे सहासात हजार रुपये वार्षिक तूट येणार आहे. अशा स्थितीत संस्थेस नाइलाजास्तव बऱ्याचशा शाळा बंद करणे भाग पडेल आणि त्यामुळे चालू असलेले शिक्षणकार्य बंद होईल. म्हणून त्या त्या गावच्या वसूल होणाऱ्या लोकलफंडाच्या रकमेतून (डि. लो. बोर्ड ८ पै. प्रमाणे शिक्षणासाठी खर्च करीत आहे त्याप्रमाणे) ८ पै. प्रमाणे ग्रँट डि. लो. बोर्डाने (या) संस्थेस द्यावी.” (साक्षरता प्रसार मंडळाचे दि. ६-७-१९४७ चे ठराव.)

“लोकलबोर्ड कधी ग्रँट देणार? त्यापेक्षा लोकांकडून देणग्या मिळवून तूट भरून काढावी.” श्री शाहू पवार मधेच म्हणाले. “लोक देणग्या तरी किती वेळा आणि कुणाकुणाला देणार?” मामा बोलू लागले, “देणग्या मागण्यापेक्षा आपण कायमस्वरूपी एखादा उद्योग चालवून त्यातून होणाऱ्या नफ्यातून तूट भरून काढलेली बरी!”

चर्चेअंती रेशनिंग दुकान सुरू करण्याचे ठरले. प्राथमिक स्वरूपाचे भांडवल पुरवण्याची जबाबदारी श्री. गाडेकर मास्तरांनी स्वीकारली. श्रीधर पाटील, विष्णू वाघमारे यांनी अनुक्रमे मापाडी आणि शॉप मॅनेजरचे काम करायची तयारी दर्शविली. श्री. केरू मोरे यांची क्लार्क म्हणून नेमणूक झाली तर सोलापूरहून धान्य आणून देण्याची जबाबदारी अंबादास पाटील यांनी स्वीकारली. जगदाळेमामांनी गुळओळ रस्त्यावरची आपली इमारत दुकानासाठी मोफत दिली. दुकान सुरू झाले. त्याची दररोजची देखरेख जगदाळेमामा करू लागले. या उद्योगात मिळणाऱ्या नफ्यातून तोटा भरून निघू लागला.

अनुक्रमणिका

शिक्षकांना योग्य पगार मिळू लागला. पण पुढे रेशन उठल्याने सदर उद्योगधंदा बंद करावा लागला आणि पुन्हा संस्थेच्या तुटीचा प्रश्न भेडसावू लागला.

साक्षरता प्रसारक मंडळाची पुन्हा बैठक भरली. साधकबाधक चर्चा झाल्यावर या व्हॉलंटरी शाळा बंद करण्याचा निर्णय झाला. शिक्षकांचे नुकसान होऊ न देण्याची जबाबदारी श्री. टी. बी. जगदाळे यांनी स्वीकारली. सर्व शिक्षकांनी टी. बी. आबांच्या सल्ल्याप्रमाणे त्यांना कमी करण्याच्या नोटिसा स्वीकारल्या पण या व्हॉलंटरी शाळा शासन ताब्यात घेईपर्यंत चालू ठेवण्याचे मान्य केले. शासनाने शाळा ताब्यात घेईपर्यंत पगार मिळाला नाही तरी मुलांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शिक्षक शाळा चालविण्यास तयार झाले.

अनुक्रमणिका

# ९. विरोधातून विकासाकडे

समाजात सत्कार्याला प्रथम विरोध होतोच. जगदाळेमामांनी कुठलेही विधायक काम हाती घेऊ द्या, त्याला विरोध ठरलेला. बोर्डिंग सुरू केले तेव्हा बार्शीतील प्रतिष्ठित आणि गावोगावचे पाटील-देशमुख, कुलकर्णी-देशपांडे ही मंडळी त्यांच्यावर रुष्ट झाली. खेड्यातील पोरं शिकल्यावर त्यांची गाईगुरं राखायला कोण? यामुळेच जगदाळेमामांना त्यांचा विरोध. बार्शी नगरपालिकेत लिंगायत बोर्डिंगच्या बरोबरीने अनुदान मिळविण्याची मामांची मागणीही त्यांना विरोधक निर्माण होण्यातच झालेली. पहिल्या वर्षी बोर्डिंगला तीनशे रुपये नगरपालिकेकडून मिळाले. लिंगायत बोर्डिंगपेक्षा कितीतरी कमी. तसे दुसऱ्या वर्षी होऊ नये. म्हणून मामांनी रान बांधायला सुरुवात केली.

जगदाळेमामांनी दुसऱ्या वर्षारंभीच आपले मित्र श्री. बाबुराव कुदळे आदी नगरपालिका सदस्य मित्रांची भेट घेतली. श्री शिवाजी मराठा बोर्डिंगला लिंगायत बोर्डिंगइतकेच म्हणजे सातशे रुपये अनुदान मिळाले पाहिजे, असा त्यांनी न्याय्य हट्ट धरला. सब-कमिटीच्या बैठकीत कुठल्या बोर्डिंगला किती रक्कम मंजूर करायची, हे नगरपालिकेचे अध्यक्ष खाजगीत अगोदर ठरवायचे. त्याप्रमाणे सबकमिटीचे चेअरमन श्री शिवाजी मराठा बोर्डिंगला पाचशे रुपये मंजूर करणार होते पण ऐन बैठकीत जगदाळेमामांनी श्री. कुदळे यांना चिठ्ठी लिहून ती त्यांच्याकडे हस्तांतरित केली. श्री. कुंदळ्यांनी सातशे रुपयांच्या मदतीचा ठराव मांडला. कुणीतरी अनुमोदनही दिले. ठराव पास झाला. नगरपालिकेचे अध्यक्ष लिंगायत समाजातले. जगदाळेमामांनी आपल्या बोर्डिंगला मदत मंजूर करून घेताना लिंगायत बोर्डिंगशी केलेल्या बरोबरीने त्यांचा जळफळाट झाला. पण एवढ्यावरच हा जळफळाट कमी झाला नाही. जगदाळेमामांच्या विरोधात प्यादी हलू लागली.

पुढील बैठक ही नगरपालिकेमार्फत बार्शीतील शाळा-हायस्कूलमधील हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या मंजूर करण्यासाठी भरणार होती. हुशार मुलांच्या याद्या मुख्याध्यापकांकडून येत. त्यात नगरपालिकेचे अध्यक्ष सांगतील त्या विद्यार्थ्यांची नावेही घुसडली जाण्याची शक्यता असे. म्हणजे हुशार मुलांऐवजी इतर वशिल्यांच्या विद्यार्थ्यांना-त्यांना शिष्यवृत्तीची गरज नसतानाही-शिष्यवृत्त्या मंजूर होण्याची शक्यता होती. तसे होऊ नये म्हणून जगदाळेमामांनी पद्धतशीरपणे रान बांधायला सुरुवात केली.

खेडोपाड्यांतील हुशार, होतकरू आणि गरीब विद्यार्थ्यांना शोधून आणून जगदाळेमामा त्यांना आपल्या बोर्डिंगमध्ये मोफत प्रवेश द्यायचे. अशा गरजू आणि हुशार मुलांना नगरपालिकेची शिष्यवृत्ती मिळवून देणं हे पालक म्हणून त्यांचे कर्तव्यच होते. १९३९-४० या शैक्षणिक वर्षात बोर्डिंगमधील हुशार विद्यार्थ्यांना नगरपालिकेच्या शिष्यवृत्त्या मिळाव्यात, ही विनंती करण्यासाठी म्युनिसिपल इंग्लिश हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. नाडकर यांना भेटून त्यांना विनंती केली. त्यांनी मामांची विनंती मान्य केली. मुख्याध्यापकांनी जगदाळेमामांच्या साहाय्याने हुशार मुलांची यादी केली आणि त्यांना नगरपालिकेच्या शिष्यवृत्त्या मिळाव्यात अशी शिफारस करून ती यादी नगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या सब-कमिटीकडे आणि अध्यक्षांकडे पाठविली. अशा शिष्यवृत्त्या बैठकीत ठराव पास झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मिळत असत.

बैठकीचा दिवस उगवला. वेळेप्रमाणे सभासद जमले. बैठकीची ठरलेली वेळ टळून गेली तरी नेहमीप्रमाणे अध्यक्ष मिटिंगला आले नाहीत. जगदाळेमामांच्या कौन्सिलर्स मित्रांपैकी एकाला नियमाप्रमाणे बैठकीचे अध्यक्ष म्हणून निवडून दिले. हायस्कूलच्या मुख्याध्यापकांनी शिफारस करून नावे पाठविलेल्या

सर्व विद्यार्थ्यांना एकमताने शिष्यवृत्त्या मंजूर झाल्या. ठराव पास झाला. बैठक बरखास्त झाली. एकेक सभासद बाहेर पडत असताना नगरपालिकेचे अध्यक्ष मिटिंगहॉलच्या पायऱ्या चढू लागले. त्यांना मिटिंग संपल्याचे ऐकून आश्चर्य वाटले. अध्यक्षांशिवाय मिटिंग कशी झाली? असा प्रश्न त्यांच्याबरोबर येत असलेल्या एकाने विचारला. तेव्हा 'अध्यक्ष महाराज परगावी गेल्याचे कळल्याने नियमाप्रमाणे हजर सभासदातून एकाची अध्यक्ष म्हणून निवड करून मिटिंग झाली' असे कुणीतरी उत्तर दिले. अध्यक्ष रागाने लालबुंद झाले. 'बरे बरे! बघून घेऊ!' असे पुटपुटत पाय आपटीत ते पायऱ्या उतरून निघून गेले. यामागे कारकून जगदाळेमामांचा हात असल्याचे कुणीतरी अध्यक्षांचे कान भरले. तेव्हा अध्यक्षांनी मामांना आपला हात दाखविण्याचा निश्चय केला.

बोर्डिंगमधील विद्यार्थीसंख्या तर वाढत होती. भाड्याने जागा घेऊन त्यांच्या राहण्याची सोय करणे दिवसेंदिवस अवघड होऊ लागले. संस्थेला स्वतःची जागा आणि इमारत यांची गरज भासू लागली. तेव्हा जगदाळेमामांनी बोर्डिंगसाठी श्री. बी. जी. मोहिते यांच्या साहाय्याने शहराच्या पश्चिमेला रेल्वे रुळालगतची सर्व्हे नं. ३०१ पैकी एक एकर तीस गुंठे जागा खरेदी केली. त्या जागेलगतची दोन एकर जागा बार्शीतील धनिक, दानशूर श्री. काकासाहेब सुलाखे यांनी संस्थेला बक्षीसपत्र करून दिली. अशा तऱ्हेने जगदाळेमामांच्या संस्थेला एक नवीन स्थान निर्माण झाले.

या दोनही जागा म्हणजे उजाड माळरान. मामलेदार कचेरीच्यापुढे रात्रीअपरात्री जायला लोक घाबरायचे. पण जंगलाचे मंगल करण्याची जगदाळेमामांची जिद्द आणि चिकाटी. बोर्डिंगसाठी नवीन जागा झाल्याने बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांत चैतन्याचे वारं सळसळलं. शाळा सुटल्यावर ते त्या जागेवर कामाला लागले. झाडेझुडपे उपटली. दगडधोंडे बाजूला केले. उंचवटे सपाट झाले. खळगे बुजून गेले. झाडाच्या फांद्यांचे झाडू झाले. ते जागा साफ करू लागले. त्यावर मुले खेळूबागडू लागली आणि त्या जागेवर इमारत बांधण्याचे स्वप्न जगदाळेमामांच्या मनात तरळू लागलं.

सदर जागेवर नव्या इमारतीची कोनशिला ८ जानेवारी १९३९ रोजी प्रमुख पाहुणे मे. बी. के. दळवीसाहेब, डिस्ट्रिक्ट तज्ञ, सोलापूर यांच्या शुभहस्ते बसली. त्या वेळी खुद्द पाहुण्यांनी बोर्डिंगला पाचशे रुपयाची देणगी दिली. त्याचवेळी काही दानशूरांनी नव्या इमारतीच्या बांधकामासाठी सुमारे एक हजार रुपये देण्याची आश्वासने दिली. काहींनी प्रत्येकी एक्कावन्न रुपये रोख मदतही केली. पुढे ४ मार्च १९३९ रोजी बार्शी येथील म्युनिसिपल हॉस्पिटलसमोर श्रीछत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ अक्कलकोटचे राजे श्रीमंत विजयसिंह फत्तेसिंह भोसले यांचे शुभहस्ते संपन्न झाला. त्यांनी जगदाळेमामांच्या बोर्डिंगला भेट देऊन आणि बोर्डिंगची प्रगती पाहून दोनशे रुपयांची देणगी दिली.

जगदाळेमामांनी पहिल्या इमारतीच्या बांधकामाचे बजेट मंजूर करून घेऊन नकाशाप्रमाणे इमारतीचा पाया खणायला सुरुवात केली. कुदळी जमिनीत घुसू लागल्या. खोरे-पाट्या माती बाहेर काढू लागल्या. पायातील खडकाचा मुरूम पाट्यात भरू लागला. मुलांच्या डोक्यावरून पाट्या दिसू लागल्या. मुलांच्या चेहऱ्या-अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. गळ्यातल्या हारापेक्षा त्या अधिकच शोभू लागल्या. जगदाळेमामा स्वतः पायातील मुरूम पाट्यांत भरून देऊ लागले. खोऱ्याने पाटी भरताना अचानक खोऱ्या पाटीच्या कडाला आपटून त्यांच्या नडगीवर आदळला. जीवघेणी कळ आली. त्याचवेळी त्यांच्याकडे आलेल्या सद्‍गृहस्थांनी त्यांना सांगितलेली बातमी नडगीला खोऱ्या लागून झालेल्या वेदनेपेक्षा अधिक तीव्र होती.

अनुक्रमणिका

ती बातमी होतीच तशी काळजी करण्यासारखी. नगरपालिकेत सबकमिटीची कामे कमी असल्याचा आणि काटकसरीच्या नावाखाली सब-कमिटी कारकून जगदाळेमामांना नोकरीतून कमी करण्याचा ठराव नगरपालिकेच्या अध्यक्षांनी मांडायचा ठरविले होते. मामा प्रथम सुन्न झाले. येणाऱ्या संघर्षास तोंड देण्याची त्यांनी क्षणातच तयारी केली. त्यांच्यावर होऊ घातलेल्या अन्यायाविरुद्ध लढायलाही ते तयार आहे.

दिनांक २३ जानेवारी १९४० रोजी नगरपालिकेची बैठक भरली. मामांना नोकरीतून कमी करण्याचा ठराव मांडला गेला. सदर ठराव बेकायदेशीर व अन्यायकारक असल्याची उपसूचना काही सदस्यांनी सादर केली. त्या सभासदांनी आपली बाजू पटवून देण्याचा प्रयत्न केला. 'काटकसरीच्या सबबीखाली एखाद्या नोकरास कमी करायचे असेल तर सर्वात ज्युनिअर नोकरास कमी करावे लागते. अशी दोन ज्युनिअर माणसे एकाच जागेवर काम करीत आहेत. तेव्हा त्यापैकी एकास नोकरीवरून कमी केले पाहिजे.' अशी चर्चा रंगली. अखेर मूळ ठराव अध्यक्षांनी बहुमताच्या जोरावर पास करून घेतला. जगदाळेमामांना नोकरीतून कमी करण्याचा ठराव पास करून त्यांनी मामांवर अशा तऱ्हेने सूड घेतला.

जगदाळेमामांना ठरावाप्रमाणे कमी करण्यासाठी चीफ ऑफिसरने अध्यक्षांकडे दि. १२ मार्च १९४० रोजी परवानगी मागितली. त्याचवेळी व्हाईस प्रेसिडेंट श्री. जी. डी. देशपांडे यांनी जगदाळेमामांचे प्रकरण व त्यावरील ठराव कायदेशीर सल्लागार श्री. जी. एच. शहा यांच्याकडे पाठवला. 'कमिशनरच्या परवानगीशिवाय अध्यक्षांना कोणत्याही कारकुनास कामावरून कमी करता येत नाही' असे त्यांनी आपले मत नोंदविले. पण हा कायदेशीर सल्लाही अध्यक्षांनी धुडकावून दिला. तेव्हा चिफ ऑफिसरने हे प्रकरण कलेक्टरकडे पाठविले. कलेक्टरांनी आपल्या ९ एप्रिल १९४० च्या पत्रात कायदेशीर सल्लागाराचे मत उचलून धरले.

मा. कलेक्टर यांच्या पत्रावर विचार करण्यासाठी नगरपालिकेची बैठक १३ एप्रिल १९४० रोजी भरली. अध्यक्षांनी बहुमताच्या जोरावर कलेक्टरच्या पत्रालाही केराची टोपली दाखवली. मूळ ठराव पुन्हा एकदा पास झाला. त्यामुळे चिफ ऑफिसरने १५ एप्रिल १९४० रोजी जगदाळेमामांना नोकरीवरून कमी करण्यासाठी एक महिन्याची नोटीस बजावली. या ठरावाविरुद्ध आणि नोटिसीविरुद्ध आपले सविस्तर म्हणणे जगदाळेमामांनी पत्राने कलेक्टरला कळविले. कलेक्टरचे नगरपालिकेला खरमरीत पत्र आले. जगदाळेमामा अध्यक्षांच्या नाकावर टिच्चून नोकरीवर राहिले. त्यामुळे अध्यक्ष आणि त्यांच्या बाजूचे सभासद हात चोळीत राहिले.

जगदाळेमामांचे शिक्षणप्रसाराचे काम दुप्पट वेगाने सुरू झाले. बहुजन समाज जागा होऊ लागला. बार्शीतील विशिष्ट वर्गाची वर्चस्वाची मिरासदारी-मक्तेदारी मरणोन्मुख होऊ लागली. त्यामुळे जगदाळेमामांचे कार्य त्यांच्या डोळ्यात सलू लागले. त्यांच्या विधायक शैक्षणिक कार्याला ते प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष विरोध करू लागले. पुढे श्री शिवाजी मराठा बोर्डिंगचा व्याप खूपच वाढला. बोर्डिंगचे काम पूर्ण वेळेचे झाले. ज्वारीच्या हंगामात बोर्डिंगसाठी ज्वारी गोळा करण्यासाठी जगदाळेमामांनी ३० एप्रिल १९४८ रोजी नगरपालिकेतील आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. आपल्या जागेवर नोकरी करण्यासाठी रेवडकर यांचा अर्ज त्यांनी बोर्डापुढे ठेवला. 'माझ्या जागेवर माझा माणूस घ्या आणि माझा राजीनामा मंजूर करा' अशी त्यांनी सर्वांना विनंती केली. ती मंजूर झाली. सोळा वर्षे नगरपालिकेत नोकरी करून ते एकदाचे मुक्त झाले आणि संस्थेच्या विकासासाठी परिश्रम घेऊ लागले. तरी विरोधकांचा विरोध काही पूर्णपणाने

शमला नाही. त्या विरोधावर मात करीत जगदाळेमामांनी शैक्षणिक कार्य जोमाने करण्यासाठी जगदाळेमामांचा दमदार प्रवास सुरू केला.

अनुक्रमणिका

## १०. गर्जा जयजयकार क्रांतीचा ...

जगदाळेमामा हे छत्रपती शिवाजीमहाराजांचे निःसीम भक्त! म्हणूनच त्यांनी शिक्षण कार्याची सुरुवात शिवाजीमहाराजांच्या नावाने बोर्डिंग काढून केली! शिवाजीमहाराज भारत वर्षाची महान दौलत. महाराष्ट्राचे प्रेरणास्त्रोत. म्हणून त्यांच्या चरित्राच्या कार्याचा आदर्श जगदाळेमामा आपल्या बोर्डिंगच्या मुलांपुढे सतत ठेवत.

हिंदुस्थान त्या वेळी पारतंत्र्यात होता. स्वातंत्र्याची चळवळ जोमात होती. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर महात्मा गांधींच्या रूपानं एक सर्वसमावेशक नेतृत्व स्वातंत्र्यसंग्रामाला लाभलं होतं. स्वातंत्र्याची प्रेरणा खऱ्या अर्थानं शिवचरित्रातून मिळू शकते, यावर जगदाळेमामांचा दृढ विश्वास होता. स्वातंत्र्याची महत्त्वाकांक्षा आणि राष्ट्रप्रेम विद्यार्थ्यांमध्ये वाढीला लागावे, म्हणून त्यांची १९३५ पासून आपल्या बोर्डिंगमध्ये शिवजयंती उत्सव मोठ्या धुमधडाक्याने आणि विविध विधायक कार्याने साजरा करण्यास सुरुवात केली होती. त्यासाठी त्यांनी बार्शीत 'शिवाजी जन्मोत्सव मंडळ'ही स्थापन केले होते.

१९३९ साली बोर्डिंगच्या पहिल्या नव्या इमारतीची कोनशिला बसविली होती. इमारतीचे काम विद्यार्थी वानर सेनेने स्वावलंबनाची कास धरून श्रमदानाने सुरू केले होते. हे काम करून ते जगदाळेमामांच्या मार्ग-दर्शनाखाली राष्ट्रसेवा दलात सामील झाले होते. दररोज सकाळी 'ए मातृभूमि तेरे चरणों में सीर नमाऊं.।' हे गीत गात होते. राष्ट्रसेवा दलात ' आता उठवू सारे रान। आता पेटवू सारे रान। शेतकऱ्यांच्या राज्यासाठी। लावू पणाला प्राण।', 'नहीं रखनी, नहीं रखनी। जालीम सरकार नहीं रखनी।', 'कदम कदम बढायेजा। खुशी के गीत गायेजा!' इत्यादी गीते तारस्वराने म्हणत होते. देशप्रेमाने ते भारून गेले होते.

सौ. जानकीबाई आपटे यांनी १९४५ साली संस्थेला भेट दिली त्या वेळी बोर्डिंगमधील सैनिकी शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील देशभक्तीचे भाव आणि तेज पाहून त्या आनंदल्या होत्या. 'चालकांचे (जगदाळेमामांचे) आदर्श उदाहरण पाहून हे विद्यार्थी राष्ट्राचे शूरसैनिक बनून भारत स्वतंत्र करण्यासाठी सर्वस्व पणाला लावतील, अशी आकांक्षा त्यांनी व्यक्त केली होती. पण त्या अगोदरच म्हणजे १९४२ सालीच संस्थेचे विद्यार्थी राष्ट्राचे शूर शिपाई बनले होते. महात्मा गांधीजींच्या 'चले जाव' च्या घोषणेने ते पेटून उठले होते.

१९४२ साल. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक तेजस्वी साल. महात्मा गांधी भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर सूर्यासारखे तळपत होते. ७ ऑगस्टला 'चलेजाव'ची महात्मा गांधीजींची सिंहगर्जना आसमंतात घुमली. ८ ऑगस्ट रोजी सारा देश पेटून उठला. बापूजींच्या आदेशानुसार जनतेने स्वयंस्फूर्तपणे ब्रिटिश सरकारशी स्वातंत्र्याचा अखेरचा लढा पुकारला. हजारो नवयुवक शाळा, कॉलेजेस् सोडून सत्याग्रहात सहभागी झाले. तुरुंगाची कोठारे भरून गेली. त्या वेळी जगदाळेमामांचे वर्गमित्र, संस्थेचे पहिल्यापासूनचे विश्वस्त, सोलापूरचे देशभक्त श्री. तुळशीदास सुभानराव जाधव काँग्रेसचे शूर शिपाई म्हणून प्रसिद्धीला आलेले. त्यांच्या धैर्याच्या आठवणी चर्चिल्या जायच्या. ते तिरंगी झेंडा हाती घेऊन सोलापुरी सज्ञ झाले होते. डोक्यावर पांढरीशुभ्र गांधी टोपी. 'गांधी टोपी काढ. नाहीतर गोळी झाडतो.' असे पिस्तूल रोखून गोऱ्या सोल्जरने तुळशीदासदादांना बजावले तेव्हा ते तात्काळ 'चलाव तेरी गोली' असे म्हणून ताठ उभे राहिले. केवढे हे धैर्य! या धैर्याची स्तुती जगदाळेमामांच्या तोंडून बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांसमोर

होऊ लागली. शिरीषकुमारसारखी कोवळी मुले तिरंगी झेंड्यासाठी छातीवर गोळ्या झेलू लागली. बाबू गेनूसारखी मोटारीखाली चिरडून घेऊ लागली. या व अशा बातम्या भक्तिभावाने वाचल्या जाऊ लागल्या. सोलापूरच्या शिंदे-सारडा, कुर्बान हुसेन, धनशेट्टी या हुतात्म्यांपासून स्फूर्ती घेऊ लागली. श्री शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. बोर्डिंगमध्ये प्रत्येक विद्यार्थी टकळ्यावर सूत कातू लागला. खादी वापरू लागला. राष्ट्रीय वृत्ती वाढवू लागला. स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेण्यास सज्ज होऊ लागला.

ऑगस्ट १९४२ मधील ११ तारीख. बोर्डिंगचे काही विद्यार्थी श्री. गोविंदराव भाऊराव बुरगुटे यांच्या नेतृत्वाखाली एकत्र जमले. बार्शी शहरातून मिरवणूक काढण्याचे त्यांनी ठरवले. त्यांनी जगदाळेमामांचा आशीर्वाद घेतला. श्री. गोविंदराव बुरगुटे (पुढे ते आमदारही झाले), श्री. सुंदर नलावडे, श्री. रंगनाथ गवळी, श्री. दत्तात्रय पाटील, श्री. केशव घुटे यांनी तिरंगी झेंडे हाती घेतले. बोर्डिंगचा एक नोकर श्री. संभाजी नवले हाही त्यांच्यात येऊन मिसळला. ते सारे पांडे चौकात आले. पांडे चौकातून मिरवणूक काढण्याचे ठरलेले! त्या वेळी जारी केलेली भाषणबंदी, प्रचारबंदी आणि मिरवणूकबंदी हुकूम मोडायचे ठरवले होते. तिरंगी झेंडे हाती घेऊन जमलेला विद्यार्थ्यांचा घोळका पाहून लोक भिऊन दूर निघून गेले. विद्यार्थ्यांनी हातातले झेंडे आकाशात उंचावून 'भारत माता की जय', 'महात्मा गांधी की जय', 'इंग्रजांनो चालते व्हा!' या घोषणांनी पांडे चौक दणाणून टाकला. क्षणार्धात पोलीस व्हॅन आली. पोलिसांनी घोषणा देणाऱ्यांना पकडून व्हॅनमध्ये ढकलले. व्हॅन तुरुंगाकडे सुसाट धावू लागली. भारतमातेच्या आणि महात्मा गांधींच्या जयजयकाराचे ध्वनी मागे ऐकू येत होते. या सर्व विद्यार्थ्यांना विजापूरच्या जेलमध्ये नेऊन कोंडण्यात आले. प्रत्येकाला तीन तीन महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. श्री. संभाजी नवले हा नोकर असल्याने त्याला तर सहा महिन्यांची शिक्षा झाली.

बोर्डिंगमधील एक विद्यार्थी श्री. अंबादास पाटील. त्यांची वयाच्या आठव्या वर्षी आई तर अकराव्या वर्षी वडील वारलेले. ते जगदाळेमामांच्या नात्यातले. पोरके झाल्याने जगदाळेमामांनी त्यांना बोर्डिंगमध्ये घेतले होते. ते मॅट्रीक झाले. पुढील कॉलेजच्या शिक्षणासाठी बडोद्याला गेले. त्या वेळी महाराष्ट्रातल्या कुठल्याही मराठी भाषिक विद्यार्थ्याला बडोद्यातील राजर्षी सयाजीराव गायकवाडमहाराज मोफत शिक्षण देत असत. तेथे श्री. पाटील यांनी बेचाळीसच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांचे सर्व सामान जप्त झाले होते. म्हणून ते बार्शीला परतले आणि सोलापूरच्या दयानंद कॉलेजमध्ये इंटरआर्टस्च्या वर्गात शिकू लागले. हरीभाई देवकरण हाय-स्कूलच्या मागील बाजूस असलेल्या मराठा मंदिरमध्ये ते राहत होते. तेथेही ते स्वातंत्र्य चळवळीतील पत्रके वाटणे, गुप्त निरोप पोहोचता करणे इत्यादी लहानमोठी कामे करायचे. मराठा मंदिरामधील विद्यार्थ्यांवर पोलिसांची करडी नजर असायची. एवढेच नाही तर तेथील विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनवर दररोज हजेरी द्यावी लागायची! हेच अंबादास पाटील पुढे जगदाळेमामांचे सहकारी म्हणून बोर्डिंगमध्ये काम करू लागले.

श्री शिवाजी मराठा बोर्डिंग हे जगदाळेमामांचे सर्वस्व बनले. बोर्डिंगच्या विकासासाठी त्यांनी प्रत्यक्षपणे स्वातंत्र्य चळवळीत काम केले नाही पण चळवळीत भाग घेण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. मदत केली. स्वातंत्र्य चळवळीत भूमिगत राहून काम करणाऱ्यांचे जगदाळेमामा आणि त्यांचे बोर्डिंग हे आधार, आश्रयस्थान बनले. कित्येक भूमिगत कार्यकर्ते प्रसंगी बोर्डिंगमध्ये येऊन राहत. त्यांची राहण्या-जेवणाची आणि पोलिसांना त्यांचा सुगावा लागू न देण्याची खबरदारी जगदाळेमामा डोळ्यांत तेल घालून करीत. त्यांचे हे बोर्डिंग राष्ट्रीय संस्कार करणारे केंद्रच बनले होते.

बेचाळीसच्या चळवळीत भाग घेतल्याने तुरुंगात गेलेले विद्यार्थी शिक्षा भोगून परत आले. त्यांनी जगदाळेमामांच्या पावलांना स्पर्श केला तेव्हा मामांचा ऊर अभिमानाने भरून आला. डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. कानात मात्र 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' या गीताचे बोल घुमत होते.

अनुक्रमणिका

# ११. 'लाथ मारू तेथे पाणी काढू'

अंधारातून प्रकाशाकडे मामांची वाटचाल चाललेली. विरोध तर त्यांच्या पाचवीला पुजलेला. त्या विरोधातूनही ते विकासाकडे ऊर फुटेपर्यंत धावत असलेले. कधी विरोधकाला वळसा घालून तर कधी विरोधकावर मात करून. संस्थेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीचे बांधकाम १९४२ साली पूर्ण झालेले. तेव्हा गावात भाड्याने घेतलेल्या जागा सोडून देऊन सर्व विद्यार्थी शहराबाहेरील मोकळ्या हवेतील इमारतीत नोव्हेंबर १९४२ मध्ये राहायला आले. जगदाळेमामांनी आखून दिलेला दिनक्रम एकसंधपणे घंटेच्या ठोक्यावर चालू लागला.

जगदाळेमामांनी बोर्डिंगसाठी नगरपालिकेचा पाण्याचा नळ घेतला होता. रीतसर पाणीपट्टी भरली जात होती. पण नगरपालिकेतील मामांचे विरोधक भरपूर पाणी सोडण्यात अडथळा करू लागले. बोर्डिंग जातीयवादी असल्याचा कांगावा होऊ लागला. एवढेच नाही तर बोर्डिंगला दरवर्षी नगरपालिकेची मिळत असणारी मदतही बंद करण्यात आली. नगरपालिकेच्या नळाला फारच कमी पाणी येत असे. बोर्डिंगमधील वाढत्या विद्यार्थीसंख्येला ते पिण्यासही पुरत नसे. मग आंघोळीचे नाव काढणे तर अशक्यच. बोर्डिंगचे विद्यार्थी आंघोळीसाठी जवळपासच्या शेतातील श्री. शेटे आणि श्री. वाघमारे यांच्या विहिरीवर जात. पण विहिरीचे मालक आपल्या विहिरीत विद्यार्थ्यांना आंघोळ करायला मना करू लागले. बऱ्याचवेळा ते विद्यार्थ्यांचे कपडे गोळा करून नेत. काही वेळेला तर विहिरीत आंघोळ करीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या अंगावर काठावर उभे राहून शेणमाती टाकीत. विद्यार्थी त्रस्त झाले. कंटाळून गेले. तेव्हा जगदाळेमामांनी जवळच्याच शेतातील वाघमारेबाईंच्या विहिरीत विद्यार्थ्यांची आंघोळीची काही दिवसापुरती सोय व्हावी अशी विनंती केली. त्या बदल्यात त्या बाईला वर्षाला लुगडं-चोळी देण्याचं आश्वासनही दिलं. पण याही गोष्टीस नकार मिळाला.

राहण्यास जागा झाली. पिण्यास पाणी मिळेना, अशी बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांची अवस्था झाली. तेव्हा जगदाळेमामांच्या डोक्यात एक कल्पना विजेसारखी चमकून गेली. त्यांनी ताबडतोब विद्यार्थ्यांची सभा बोलावली. पाण्याच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी संस्थेच्या शेतात स्वत:ची विहीर खणण्याचा प्रस्ताव त्यांनी विद्यार्थ्यांपुढे ठेवला. श्रमदानाची महती विशद केली. कामात राम शोधण्याचा मंत्र सांगितला. ते पुढे म्हणाले, "आपल्या अंगात खरे पाणी असेल तर लाथ मारू तेथे पाणी काढू. श्रमप्रतिष्ठा आणि स्वावलंबन जीवनात महत्त्वाचे. स्वावलंबनातून स्वाभिमान येतो. तुम्ही स्वाभिमानी असले पाहिजे. तेव्हा आपल्या शेतात विहिर घ्यायची कां?" मामांच्या आवाहनास विद्यार्थ्यांनी योग्य प्रतिसाद दिला. श्रमदानातून विहीर खणण्याचे ठरले.

२ ऑगस्ट १९४३ चा दिवस उगवला. घंटेचा निनाद झाला. सर्व मुले संस्थेच्या शेतात जमली. विहिरीची जागा ठरली. सामुदायिक राष्ट्रगीत गाईले गेले. त्या जागेवर नारळ वाढवला. मामांनी पहिली कुदळ मारली. संस्थेच्या कार्यकर्त्यांनीही कुदळ मारून शुभारंभ केला. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या कुदळी भराभर जमीन खणू लागल्या. खोरे-पाट्या भरू लागल्या. विद्यार्थी त्या पाट्या उचलून दूर टाकू लागले. शाळेतून परत आल्यावर विद्यार्थ्यांनी आपले खेळ बंद केले. विहीर खणण्याचा एक नवा खेळ सुरू झाला. सर्वजण विहिरीत राबू लागले, घाम गाळू लागले. विहीर परसभर खोल गेली आणि खडक लागला. मोठे विद्यार्थी टिकावाने खडकाला धक्का देऊ लागले. इतर विद्यार्थी रांगेने उभा राहून झेलपाटीने खरपा काढू लागले. त्यानंतर कठीण खडक लागला. अभ्यास सांभाळून साऱ्या गोष्टी झाल्या पाहिजेत ही मामांची

विचारसरणी! दिवसभर मजुराकडून विहिरीत गेबे घेऊन ते उडवायचे आणि उलथलेला मुरूम खपरे सायंकाळी मुलांनी वर काढायचे, असे त्यांनी ठरविले.

'चले जाव' चळवळीत विद्यार्थ्यांबरोबर बोर्डिंगचा नोकर श्री. नवले तुरुंगात गेलेला. त्याच्या जागेवर मामांनी श्री. नारायण बापू बोरगावकर या जेमतेम तीन फूट उंचीच्या, फेंगाडत चालणाऱ्या हरहुन्नरी माणसाला नोकरीला नेमले. कोणतेही काम करण्यात तो तरबेज. त्यालाच विहिरीचे काम गुत्त्याने दिले गेले. त्याने गडी लावून विहिरीत गोबे घेऊन ते दिवसभर उडवायचे आणि सायंकाळी विद्यार्थ्यांनी दगड-धोंडे, खपरे-खुपरे आणि मुरुममाती बाहेर काढायची असे काम चालू लागले.

थोड्याच दिवसात विहीर खोदून पूर्ण झाली. विहिरीला पाणी लागलं. मुलांनी आनंदाने विहिरीत उड्या टाकल्या. ती मनसोक्तपणे पोहू लागली. विहिरीत डुंबताना त्यांना जो आनंद झाला तो अवर्णनीय होता. अशा तऱ्हेने विद्यार्थ्यांनी आपल्या अंगातील पाणी दाखवले. स्वावलंबनाने पाणी निर्माण करून नगरपालिकेच्या अडवणुकीला चोख उत्तर दिले. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात ज्ञान आणि श्रम यांचा सुंदर संगम झाल्याची ही निशाणी. राजाराम कॉलेज, कोल्हापूरमधील इतिहासाचे व्यासंगी विद्वान प्राध्यापक पुढे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे पहिले कुलगुरू झालेले डॉ. आप्पासाहेब पवार यांना या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची शारीरिक नि बौद्धिक वाढ वरच्या दर्जाची दिसून आली. मुलांच्या तोंडावर जे पाणी झळकते ते पाहून फार समाधान वाटल्याचे त्यांनी संस्थेच्या शेरे बुकात लिहून ठेवले आहे.

मुलांनी खोदलेल्या या विहिरीच्या बांधकामासाठी बार्शी येथील दानशूर शेट शहा धारसी जीवन यांनी स्वयंस्फूर्तीने दोन हजार रुपयाची देणगी दिली. विहिरीचे बांधकामही पूर्ण झाले. ही विहिरीच फक्त विद्यार्थ्यांनी खोदली असे नाही तर त्यांनी बैलाऐवजी शिवळात स्वतःला गुंतवून मोटाही ओढला. ज्वारी, गहू आणि भाजीपाला पिकवला. जंगलाचे मंगल होऊ लागले.

'लाथ मारू तिथं पाणी काढू' ही श्रमाची स्वावलंबनाची आणि स्वाभिमानाची परंपरा जगदाळेमामांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांनी पुढेही चालू ठेवली. बार्शी येथील संस्थेच्या शेतात या पहिल्या विहिरीप्रमाणे आणखी दोन विहिरी विद्यार्थ्यांनी श्रमदानातून खोदल्या. हे कर्मवीर चेले संस्थेपुरते, स्वतःपुरते पाहणारे नव्हते. समाजासाठीही त्यांनी श्रमदान यज्ञ सतत पेटता ठेवला. बार्शी येथील संस्थेची विविध महाविद्यालये आणि वाशी येथील महिविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी खेडे दत्तक योजनेअंतर्गत दरवर्षी श्रमदानाने अनेक गावांचे चेहरेमोहरे बदलून टाकले. उपळाई (बोग्यांची) येथे गावकऱ्यांसाठी त्यांनीच विहीर खोदून दिली. येडशी येथे ७२ च्या दुष्काळात हरिजन वस्तीतल्या पाण्याचे दुर्भिक्ष दूर करण्यासाठी तेथे १६ फूट व्यासाची आणि १८ फूट खोलीची विहिर श्रमदानाने खोदून दिली. त्या विहिरीला इतके पाणी लागले की, दुष्काळात सवर्णांनीही त्यातून पाणी नेऊन आपली तहान भागविली. 'लाथ मारू तिथं पाणी काढू' या परंपरेचे मामांच्या विद्यार्थ्यांनी जपलेले ते एक आश्चर्यकारक उदाहरण झाले!

अनुक्रमणिका

# १२. काहीच साकडे पडो ने दी।

'लोकसेवा हीच खरी ईश्वरसेवा' मानून जगदाळेमामांनी ज्ञानदानाचा पवित्र यज्ञ सुरू केला. ह्या यज्ञात बहुजन समाजाच्या अंतःकरणातील जागृत परमेश्वर त्यांना सततच सहकार्य करीत असल्याचा वेळोवेळी प्रत्यय येऊ लागला म्हणूनच हा जनताजनार्दन 'काहीच साकडे पडो ने दी' या संत उक्तीनुसार मागे पुढे सांभाळीत उभा राहील. ही भावना जगदाळेमामांच्या अंतःकरणात कायमची कोरली गेली आणि ते दुप्पट उत्साहाने ध्येयधुंद होऊन त्यांच्या हितासाठी, कल्याणासाठी कुठलाही गाजावाजा न करता कामाला लागले.

बार्शी शहराच्या पश्चिमेला बोर्डिंगच्या रूपाने ज्ञानसूर्य उगवल्याची जाणीव लोकांना होऊ लागली. धिम्या पण निश्चित गतीने समाजपरिवर्तनाचे काम सुरू आहे. श्री शिवाजी मराठा बोर्डिंग हे ज्ञान, सुसंस्कार आणि समाजसुधारणेचे एक क्रांतिकेंद्र बनले. अठरापगड जातीतील मुलं तिथं एकत्र राहू लागली, एकत्र जेऊ लागली. अभ्यास करू लागली. अभ्यासाबरोबर श्रमाची पूजा बांधू लागली. त्यांच्यामुळे उभा राहणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यास जनताजनार्दन त्यांच्या पाठीमागे खंबीर उभा ऱाहू लागला.

१९४६चे साल. एप्रिल महिन्यातील एक रविवार. नेहमीप्रमाणे बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांची सभा भरलेली. सभेचा विषय होता, 'समाजातील संपत्तीचा दुरुपयोग कसा थांबवावा?' जगदाळेमामा सकाळपासूनच या विषयावर मननचिंतन करीत होते. सुचतील ते मुद्दे पाठकोऱ्या कागदावर लिहून ठेवत होते. मुलांची भाषणे झाल्यानंतर शेवटी त्यांना नेहमीच बोलावे लागे.

तिसऱ्या प्रहरी सभेची बेल झाली. सगळी मुले सभागृहात जमली. विद्यार्थ्यांची भाषणेही झाली. मुलांच्या भाषाणानंतर जगदाळेमामा बोलायला उभे राहिले. त्याचवेळी सभागृहात एका व्यक्तीने प्रवेश केला. भरदार शरीर, भरपूर उंची, पिळदार मिशा, पाणीदार डोळे, नखशिखांत साहेबी पोशाख, चालण्यात शिपाईपणा. या व्यक्तिमत्वाचे श्री. शंकरराव भाऊसाहेब राजे-निंबाळकर आत आले. कसबे तडवळे हे त्यांचे गाव. सैन्यातील नोकरीनंतर त्यांचा मुक्काम बार्शीलाच होता. बार्शीत त्यांनी पिठाची गिरणी टाकलेली. बोर्डिंगचे धान्य ते मोफत दळून देत. बार्शी नगरपालिकेतील ते सरकारी नियुक्त सभासद. जगदाळेमामांच्या मित्रमंडळींत एकरूप झालेले. मामांशी त्यांचे घनिष्ठ मैत्रीचे संबंध. सैन्यातील नोकरीनिमित्त युरोप—अमेरिका इत्यादी परदेशातून ते फिरून आलेले. परदेशातील शिक्षणाचा प्रसार त्यांनी पाहिलेला. त्यामानाने भारतातमुख्यतः ग्रामीण भागात—शिक्षणाविना पडलेल्या अंधाराची त्यांना खंत वाटायची. म्हणूनच त्यांना जगदाळेमामांच्या शिक्षणकार्याची महती पटलेली. ते नेहमी बोर्डिंगमध्ये येत. मामांच्या बरोबर तासन्तास शिक्षणप्रसाराबाबत चर्चा करीत.

रविवारच्या सभेत मुलं कशी बोलतात आणि मुख्यतः जगदाळेमामा मुलांना काय सांगतात हे ऐकायला ते मुद्दाम आले होते. मुलांनी त्यांना मामांच्या खुर्चीजवळ ठेवलेल्या आसनावर नेऊन बसवले. मामांनी त्यांना सभेचा विषय सांगितला. मुलांनी कोणते विचार मांडले, याची थोडक्यात माहिती दिली आणि त्या विषयावर बोलायची राजे—निंबाळकरांना विनंतीही केली. तेव्हा निंबाळकरांनी मामांचे भाषण झाल्यावर शेवटी बोलण्याचे आश्वासन दिले.

अनुक्रमणिका

जगदाळेमामांनी आपल्या भाषणास सुरवात केली. “...ज्या खेड्यातील जनतेकरता हे कार्य सुरू केले त्यांची मनोभूमिका अशी आहे की, गावात जर एखाद्या मारुतीच्या अथवा इतर देवाच्या देवळाची भिंत पडली तर ताबडतोब वर्गणी करून ती एकदोन महिन्यात बांधून घेतील. -----खुषीच्या सक्तीने लहानशा गावात चार–सहा हजार रुपये जमवून वर्षदोन वर्षात एखाद्या साधूची टाकीबंद समाधी अथवा एखाद्या दगडाच्या देवाचे टुमदार मंदिर बांधतील परंतु त्यांच्याच जिवंत देवाचे (मुलांचे) ज्ञानमंदिर (शाळा) लोकलबोर्ड बांधील म्हणून वाट पहात बसतील.

“क्षेत्राच्या ठिकाणी जाऊन देवाच्या पालख्या–दरवाजाची चौकट चांदीच्या पत्र्याने मढवतील आणि त्या चौकटीसमोरील वाटेत खड्डे पाडून ते खड्डेसुद्धा चांदीच्या रुपयांनी भरून काढून मोक्षसुखाची वाट पहात बसतील. परंतु घराचे दरवाजे व गावातील रस्ते अनेक वर्षे नादुरुस्त ठेवून तिकडे दुर्लक्ष करतील, तसेच घरापुढील रस्त्यावर पडलेल्या खड्डयात फुकटची माती टाकून ते साफ करणार नाहीत. पण पंढरपूर, काशीच्या यात्रा करून लाखो रुपयांचा चुराडा ऐतखाऊ पोळ पोसण्यात करतील. मात्र स्वतःचे मुलास सकस अन्न, दूध व व्यवस्थित कपडे घेणार नाहीत... दुधाच्या लोण्याचा गोळा दररोज सकाळी न खाणाऱ्या निर्जीव देवाच्या तोंडास लावून श्रम न करणारे बोके फुकट पोसतील. परंतु शिक्षणकार्यात अयोग्य काटकसर करतील. जिवंतपणी मिळणाऱ्या सुखापेक्षा मेल्यानंतरच्या सुखाकडे त्यांची ओढ असते कारण धंदेवाईक धूर्तांनी अशा तऱ्हेच्या उपदेशाचे डोस पाजून त्यांची मनोभूमिका अनेक पिढ्यांपासून तयार केलेली आहे. केवळ देवाच्या नावावर हा शुद्ध जुगार चालू आहे.

“... आता पदव्यांनी विभूषित झालेल्या...... पंडित रिक्रूटांचा तांडा लग्नाच्या आखाड्यात उतरल्यावर स्वतःचा पालकांच्या स्वार्थीवृत्तीस बळी पडून भरमसाठ हुंडा घेतात व लग्नात पाच ते दहा हजाराचा खर्च दोन दिवसांत करतात. इतकेच नव्हे तर अशा मंगलप्रसंगी लग्नाच्या मंडपात रात्रीच्या बैठका, गाणे वगैरे अमंगल करमणुकीच्या कार्याचीही हौस पूर्ण करून घेऊन आपल्या संपत्तीच्या उन्मादाचे प्रदर्शन करतात. एकीकडे हा प्रकार चालत असताना....आपलेच कोट्यवधी बांधव अन्न अन्न, वस्त्र वस्त्र आणि शिक्षण शिक्षण करून टाहो फोडतात...”

“अशा तऱ्हेने होणारा समाजाच्या संपत्तीचा हा दुरुपयोग टाळला पाहिजे. त्याऐवजी त्यांनी स्वतःचा मुलांच्या शिक्षणासाठी पैसा खर्च केला पाहिजे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे कार्य करणाऱ्या आपल्या संस्थेसारख्या शिक्षणसंस्थांना त्यांनी देणग्या देऊन हातभार लावायला पाहिजे. आपली संपत्ती सत्कारणी लावली पाहिजे.”

जगदाळेमामांच्या भाषणाने सभा भारावून गेली. शेवटी श्री. शंकरराव निंबाळकर काय बोलतात याचे औत्सुक्य वाढले. ते बोलायला उभे राहिले. “जगदाळेमामांच्या भाषणानंतर मी काय बोलणार?” निंबाळकर बोलू लागले, “मी शिपाईगडी. बोलण्यापेक्षा मला लढायला–कृती करायला आवडते. मी बरेच दिवस करतोय. जगदाळेमामांनी संस्थेचे हायस्कूल काढावे, ही माझी इच्छा आहे. त्या हायस्कूलच्या बांधकामासाठी मी आज अकरा हजार रुपये रोख देणगी संस्थेस देत आहे.” टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. मामांनाही आश्चर्याचा गोड धक्का बसला. राजे–निंबाळकर पुढे म्हणाले, “या रोख देणगीबरोबरच मी माझ्या मालकीची कसबे तडवळे येथील ५२ एकर ७ गुंठे जमीनही संस्थेला देणगीदाखल देऊन टाकतो.” पुन्हा टाळ्यांचा जोरदार कडकडाट झाला.

बोलल्याप्रमाणे शंकररावांनी अकरा हजार रुपये रोख दिले आणि तडवळे येथील आपली सर्वे नं. ३३१।३३९।२ व ४४।१ मिळूनची ५२ एका ७ गुंठे जमीन कोर्टात संस्थेला रीतसर बक्षीसपत्र करून दिली. राजे-निंबाळकरांचा हा त्याग बहुजन समाजातील कोणाही धनिकास एवढेच नव्हे तर संस्थानिकासही आदराने चकित करण्यास लावण्याइतका वरच्या दर्जाचा आहे. अशी प्रांजळ कबुली मामांनी आपल्या संस्थेच्या तिसऱ्या व चौथ्या जोडअंकात दिली.

राजे-निंबाळकरांनी देणगी दिल्यानंतर पांचसहा महिन्यांनी म्हणजे २ ऑक्टोबर १९४६ रोजी बुधवारी दुर्दैवाने त्यांना देवाज्ञा झाली. मामांना कमालीचे दुःख झाले. त्यांनी निंबाळकरांच्या कुटुंबाचा मूलगामी विचार करून संस्थेला बक्षीसपत्राने मिळालेली सारी जमीन त्यांच्या मुलाबाळांना परत केली. एवढेच नव्हे तर धनाजी आणि गमाजी या त्यांच्या मुलांना त्यांनी बोर्डिंगमध्ये मोफत प्रवेश दिला. ते त्यांचे पालक बनले.

श्री. शंकरराव राजे-निंबाळकर गेले, पण त्यांचे संस्थेचे हायस्कूल सुरू करण्याचे स्वप्न काही मामांच्या मनातून जाईना. तेव्हा मामांनी नियोजित हायस्कूलच्या इमारतीचे बांधकाम करण्याचा निश्चय केला. सादर इमारतीची कोनशिला सातारच्या क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या शुभ हस्ते ७ डिसेंबर १९४६ रोजी बसविण्याचे ठरविले. कोनशिला समारंभाचा दिवस उगवला. बार्शी तालुका आणि शेजारच्या उस्मानाबाद तालुक्यातील खेड्यापाड्यांतून शेतकरी बैलगाड्या सजवून, बैलांचा चंगाळ्या बांधून क्रांतिसिंहांना पहायला आणि त्यांचे विचार ऐकायला आले. बार्शी शहर जत्रेप्रमाणे फुलून गेलं. क्रांतिसिंहाची मामांनी एकशे एक बैलगाड्यांतून बार्शी शहरातून प्रचंड अशी अभूतपूर्व मिरवणूक काढली.

या मिरवणुकीच्या पुढे विविध वाद्ये वाजत होती. त्यामागे बोर्डिंगच्या मुलांची लेजीम पथके देहभान विसरून छळम् छळम् आवाजात लेझीम खेळत होती. चौकाचौकांत क्रांतिसिंहाच्या गळ्यात हार पडत होते. हारांचे ओझे गळ्यात वागवीत ते दोन्ही हात जोडून सुहास्य वदनाने जनतेला अभिवादन करीत होते. मिरवणूक बोर्डिंगच्या आवारात आली. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या शुभ हस्ते इमारतीची कोनशिला बसविली. क्रांतिसिंह नाना पाटील आणि जगदाळेमामांच्या जयजयकाराने वातावरण पुलकित झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगदाळेमामांनी केले. क्रांतिसिंहांची ओळखही त्यांनी थोडक्यात करून दिली. ते आपल्या प्रास्ताविकात म्हणाले, ‘साधूसंत येती घरा। तोचि दिवाळी दसरा।’ अशी आज आमची स्थिती झाली आहे. मित्रहो, आतापर्यंत आम्ही बोर्डिंगच्या माध्यमातून शिक्षणप्रसाराचे काम करतोय. नवसमाज निर्मितीसाठी आम्हाला संस्थेचे हायस्कूल सुरू करायचे आहे. कितीही काटकसर करून पैसा शिल्लक टाकला तरीही इमारत बांधण्याचे काम कठीण दिसतेय. जनतेने नदीच्या प्रवाहाप्रमाणे वाहत जाणाऱ्या आपल्या धनाच्या प्रवाहाला अडवून त्या कालव्याचा उपयोग भावी पिढ्यांच्या सुपीक जमिनीत ज्ञानाचे भरघोस पीक काढण्याच्या कामी करावा, असे नम्र आवाहान मी या प्रसंगी सर्वांना करतो. ”

त्यानंतर क्रांतिसिंह नाना पाटलांनी स्वातंत्र्य चळवळीतील भूमिगत अवस्थेतील आपल्या आठवणीचे किस्से सांगुन मनमुराद हसविले. जगदाळेमामांच्या कार्याचे तोंड भरून कौतुक केले. ते म्हणाले, “साताऱ्यात आमच्या कर्मवीर भाऊराव पाटलांनी भगीरथ प्रयत्नाने ज्ञानाची गंगा खेड्यापाड्यांतल्या झोपडीपत्तूर न्हेलीय. तसंच शिक्षणाचं काम आपलं जगदाळे मामां या दुष्काळी भागात करीत हायेत. बार्शीचं लोक खरंच लई भाग्यवान हाईत. महाभारतात शकुनीमामा व्हवून गेला पन ह्यो

अनुक्रमणिका

जगदाळेमामा शुभशकुनी हाय! सख्ख्या मामापरीस ते तुमच्या पोराबाळांवर जीव लावत्यात. ते येक नवी पिढी घडवित्यात. वेदकाळातल्या गुरुकुलातल्या ऋषीमुनीपरमानं ते तपस्याच करत्यात. ते शिक्षणपंढरीचं खरखुरं वारकरी हायेत. मी मामांचं समंद बोर्डिंग हिंडून बगीतलंय. बोर्डिंगातील पानीदार पोंर बगीतली. त्यांच्या तोंडावरचं त्येज बगीतलंय. लई लई बरं वाटलं बगा. ह्ये काम तसं सोपं न्हाय. ती ताकत तुमच्या आमच्यात न्हाय. निदान मामांच्या कामाला हातभर लावायला तरी कसूर करू नका. नुसता आमचा जयजयकार करू नका. या पुन्याच्या कामात काईतरी द्या. तेही आपल्या पोराबाळांच्या कल्यानासाठी बर का! अशी मदत करायला कोन तयार हाय बोला!" असं क्रांतिसिंहांनी आवाहन करताच एकदम चमत्कार व्हावा तसा श्रोत्यामधून भराभरा देणग्या येऊ लागल्या. तासाभरात चौदा हजाराची रक्कम जमली.

बोर्डिंगच्या मुलांसाठी जे जेवण तयार केले होते, तेच पाहुण्यांना वाढले. जेवता जेवता मामा म्हणाले, "आण्णा, भारताला स्वातंत्र्य मिळाल्याला पुन्हा एकदा तुम्ही आमच्या संस्थेला भेट द्यावी." "एकदा का म्हणून? हे माझं घर हाय. जवाजवा मी बारसीला येईन तवा माझा मुक्काम इथंच न्हाईल. पण मामा, मुलांच्या बोर्डिंगबरूबर इथं तुमी मुलींचं बी बोर्डिंग काढावं अशी माझी इनंती हाय. स्त्री शिक्षणाचं काम लईच महत्त्वाचं हाय!" मामांनी क्रांतिसिंहाची विनंती तात्काळ मान्य केली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळालं. जगदाळेमामांनी आपली संस्था नोंदणीच्या सन १८६०च्या २१ व्या कलमाप्रमाणे क्रमाक १५१९ खाली रजिस्टर केली. त्यांनी संस्थेचें श्री शिवाजी शिक्षण प्रसारण मंडळ, बार्शी असं नामकरण केलं. श्री शिवाजी मराठा बोर्डिंग, या नावातील 'मराठा' हा जातिवाचक शब्दही काढून टाकला. त्या वेळी बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांची संख्या दोनशेच्या पुढे गेली होती.

संस्थेचा वाढता व्याप लक्षात घेऊन जगदाळेमामांनी संस्थेच्या पहिल्या इमारतीजवळ हायस्कूलसाठी एक लाख रुपयाच्या दुसऱ्या इमारतीचे बांधकाम हाती घेतले. या इमारतीच्या बांधकामात मधेच पैसे कमी पडू नयेत म्हणून संस्थेला मदत मिळविण्याचा एक नावीन्यपूर्ण मार्ग त्यांनी शोधला.

खेड्यातील लोक तमाशावर आणि नाचगाण्यावर वारेमाप खर्च करतात. त्यातून समाजात दुर्गुणांची वाढ होते. जगदाळेमामांनी ३० नोव्हेंबर १९४७ रोजी कोल्हापुरातील प्रसिद्ध कुस्तीगारांच्या कुस्त्या, शाहीर निकम यांचे पोवाडे, ह.भ.प गयाबाई मनमाडकर आणि लोकसंत गाडगेमहाराज यांची कीर्तने आणि लोकांना हवेहवेसे वाटणारे क्रांतिसिंहाचे व्याख्यान असा चौरंगी कार्यक्रम आयोजित केला.

कार्यक्रमाच्या जाहिराती आणि देणगीमूल्याची पावती पुस्तके गावोगावी पोहोचविली. तिकीटांची विक्री धुमधडाक्याने झाली. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे देणगीमूल्य असलेली तिकिटे घेणाऱ्यांना करमणुकीच्या स्वार्थाबरोबर संस्थेला मदत दिल्याचा परमार्थ साधल्याचा आनंद मिळणार होता. कार्यक्रमाला अपेक्षेपेक्षा जास्त गर्दी जमली. तिसरे प्रहरी कुस्त्या आणि क्रांतिसिंहाचं व्याख्यान गाजलं. लोकांनी दोन्ही कार्यक्रम डोक्यावर घेतले. सायंकाळी शाहीर निकमाच्या पोवाड्यांनी श्रोत्यांत विरश्रीचं वार निर्माण केलं आणि रात्रीच्या ह.भ.प गयाबाई मनमाडकर आणि गाडगेमहाराजांच्या कीर्तनांनी लोकांची ब्रह्मानंदी टाळी लागली. या कार्यक्रमातून खर्च वजा जाता संस्थेला खूप रक्कम मिळाली. त्याच दिवशी संस्थेच्या इतिहासात सोनेरी अक्षरांत लिहून ठेवावी अशीही एक घटना घडली. लोकसंत गाडगेबाबांच्या शुभहस्ते 'भारतीय बालिकाश्रम' ह्या मुलींसाठी स्वतंत्र बोर्डिंगचे उद्‌घाटन झाले. मुलींचे बोर्डिंग काढण्याचा क्रांतिसिंहांना मामांनी दिलेला शब्द पाळला.

अनुक्रमणिका

या संस्थेच्या विकासात गावोगावच्या शेतकऱ्यांचे फार मोठे योगदान आहे. शेतकऱ्यांनी आपल्या कुवतीनुसार मुठीसुपानं कणाकणानं आणि मणामणानं दरवर्षी संस्थेला ज्वारीची मदत केली होती. करत आहेत. असं दान देणाऱ्या एका शेतकऱ्याचा प्रसंग तर कंठ दाटून यावा असा आहे. जगदाळेमामा एकदा ज्वारी जमा करायला एका खेड्यात गेले. त्या वर्षी पाऊस कमी झाल्याने शेती म्हणावी तशी पिकलेली नव्हती. म्हणून मामा धनिक शेतकऱ्यांच्या घरी जाऊन ज्वारीची मदत मागू लागले. ज्वारी गोळा करीत मामा व त्यांच्याबरोबर काही मुलं पोती घेऊन रस्त्यावरून चालले होते. तेथून एक अत्यंत गरीब शेतकरी एका टोपल्यात ज्वारी घेऊन जात होता. ती ज्वारी दळून आणण्यासाठी तो चालला होता. दरवर्षी तो बोर्डिंगला धान्याची मदत न चुकता करत आला होता. पण या वर्षी त्याच्या शेतात त्यांच्या मुलाबाळांना वर्षभर पुरेल इतकीही ज्वारी झालेली नव्हती. म्हणून मामा त्याच्या घरी ज्वारी मागायला गेले नव्हते. तो शेतकरी मामांपुढे येऊन उभा राहिला आणि त्याने प्रश्न केला, "यंदा बोर्डिंगला ज्वारी मागायला माह्या घरी न्हाई आलव मामा?"

"नाही आलो. या वर्षी तुमच्या शेतात पिकलेली थोडीबहुत ज्वारी तुमच्या मुलाबाळांनादेखील वर्षभर पुरायची नाही. पुढल्या वर्षी ज्वारी चांगली पिकली म्हणजे ती तुमच्याकडून घेऊ की! म्हणून तुमच्या घरी आलो नाही."

"असं कसं व्हईल मामा? बोर्डिंगला दरवर्षी ज्वारी देयाचा नेम मी मोडायचो न्हाई! माजी गरिबाची एवढी मदत घ्याच!" असं म्हणून त्यानं डोक्यावरील टोपल्यातली दळायला चालविलेली ज्वारी मामांबरोबर पोतं घेऊन फिरणाऱ्या मुलाच्या पोत्यात ओतली. मामांच्या डोळ्यातून अश्रु उभे राहिले. केवढा मोठा या शेतकऱ्याचा त्याग! ते विचार करू लागले.

"खेड्यातील हजारो शेतकऱ्यांनी एका ओंजळीपासून दोन पोत्यांपर्यतची सर्वात महत्त्वाची आणि संस्मरणीय अशी ज्वारीची मदत केली. तिचे शब्दात वर्णन करावे, असे प्रासादिक शब्दच मजजवळ नाहीत. कारण कित्येक शेतकरी असे भेटले की, स्वतःच्या मुलाबाळांना महिना–दोन महिने पुरेल इतकेसुद्धा धान्य नसताना व नवीन धान्य येण्यास दहा–अकरा महिने अवधी असतानासुद्धा त्यांनी स्वतःची होणारी उपासमार स्वखुशीने पत्करून संस्थेला धान्याची योग्य मदत केली आणि हिंदमातेच्या जिंवत संपत्तीचे संगोपन केले. त्यामुळे संस्थेच्या विद्यार्थ्यांकडे पाहिल्याबरोबर चटकन असा विचार येतो की, संस्थेतील विद्यार्थी पन्नास टक्के शेतकऱ्यांचा आहे. म्हणजे विद्यार्थ्यांची हाडे व कातडी त्यांच्या मात्यापित्यांची असून त्यांच्या शरीरातील रक्त व मांस शेतकऱ्यांच्या अन्नाचे आहे आणि अशा या शेतकऱ्यांच्या मूळ आशीर्वादानेच संस्थेच्या कार्याचा खरा अभ्युदय झाला आहे." (संस्थेचा त्रैवार्षिक अहवाल, तिसरा व चवथा)

'मागेपुढे उभा असे सांभाळीत। काहीच साकडे पडो ने दी।' या संत उक्तीचा प्रत्यय अशा तऱ्हेने जगदाळेमामांना अनेक वेळा येत होता. श्री. शंकरराव राजे–निंबाळकरांची मोठी देणगी, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्यक्रमात लोकांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त देणग्या तसेच खेड्यापाड्यांतील गोरगरीब शेतकरी-कामकरीवर्गाने दरवर्षी केलेली धान्याची मदत ही त्याची जिंवत उदाहरणे आहेत.

अनुक्रमणिका

# १३. समाजसुधारक महात्मा फुले यांचे वारसदार

हजारो वर्षे ज्ञानापासून वंचित ठेवलेल्या बहुजन समाजाला आणि स्त्रियांना मुक्तिमार्ग दाखवणाऱ्या आद्य समाजसुधारक महात्मा जोतीबा फुले आणि त्यांची पत्नी क्रांतिदर्शी सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणप्रसारातून समाजसुधारणा आणि समाजपरिवर्तनाची थोर परंपरा निर्माण केली. राजर्षी शाहूमहाराज, महर्षी वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिसिंह नाना पाटील आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ही परंपरा प्रयत्नपूर्वक जोपासली. या परंपरेतील शेवटचा तेजस्वी दुवा म्हणून जगदाळेमामांचे स्थान मानले जाते. कारण ग्रामीण भागात शिक्षण प्रसाराचे कार्य करीत करीत त्यांनी समाजसुधारणेचे मूलगामी काम करण्यातही सातत्याने हिरिरीने भाग घेतला.

अन्यायी वर्णव्यवस्थेची जीर्ण झालेली चौकट मोडून टाकण्यासाठी महात्मा फुल्यांनी एकोणिसाव्या शतकात प्रथम बंडाचा झेंडा फडकाविला. माणूस आणि परमेश्वर यांच्यामधील दलालांना—भटभिक्षूक, बडवे पुजारी इत्यादींना—त्यांनी आपल्या विचाराने आणि कृतीने जोरदार हादरा दिला होता. पण समाजव्यवस्थेतील इतर अनेक क्षेत्रांतील दलालांकडून शेतकऱ्यांची पिळणूक चालूच होती. ती बंद करण्याचा जगदाळेमामांनी प्रयत्न चालू ठेवला म्हणूनच ते महात्मा फुल्यांचे वारसदार ठरतात.

बार्शी नगरपालिकेत काम करताना जगदाळेमामांना आडत गल्लीला जावे लागे. तेथे शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकविलेल्या मालाची किंमत दलाल लिलावाने ठरवत असत. लिलाव बोलताना शेतकऱ्यांच्या मालाचा नमुना घेताना प्रत्येकजण पोत्यात निर्दयपणे टोचे खुपसत. त्यामुळे बराच माल वाया जात असे. त्याशिवाय मालाच्या प्रत्येक पोत्यामागे एक आणा शेतकऱ्याकडून घेतला जात असे. चाळणी लावून बराच माल बाद केला जात असे. त्याशिवाय हमाली, तोलाई आणि आडत ह्यांच्या रकमा वेगळ्याच! मालाच्या प्रत्येक पोत्यामागे आणखी एक आणा व्यापारी घेत. ती रक्कम गोरक्षण आणि लिंगायत बोर्डिंगला दिली जाई. शेतकऱ्यांचा हा पैसा शेतकऱ्यासाठी, शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च व्हायला हवा. आपण शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी बोर्डिंग काढलेले आहे. तो पैसा या बोर्डिंगलाच मिळायला पाहिजे, असा विचार करून जगदाळेमामा व्यापारी संघाच्या प्रमुखांकडे गेले. अशा जमा होणाऱ्या रकमेपैकी निदान निम्मी रक्कम तरी बोर्डिंगला द्यावी अशी नम्र आणि रास्त सूचना त्यांनी केली. पण ही सूचना मान्य झाली नाही. त्यावर मामांनी एक वेगळाच उपाय काढला.

श्री. कृ. ग. राऊत हे बोर्डिंगचे अध्यक्ष. त्यांच्या मालकीचे आडत दुकान होते. जगदाळेमामांनी त्यांना त्यांच्या आडत दुकानात विक्री झालेल्या मालाच्या दर पोत्याप्रमाणे जमा होणारी रक्कम आपल्या बोर्डिंगला मिळावी, अशी विनंती केली. ती मान्य झाली. तेव्हा खेड्यापाड्यांतील शेतकऱ्यांचा माल प्रामुख्याने श्री. राऊत यांच्या आडतीला यावा अशी व्यवस्था त्यांनी बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांना सांगून केली. शेतकऱ्यांचा माल श्री. राऊत यांच्या अडतीला येऊ लागला. तेथेच धर्मादाय फंडाची एक पेटी ठेवण्यात आली. शेतकरी खुशीने त्या पेटीत पोत्यामागे एक आणा टाकून संस्थेला मदत करू लागले. आपल्या मुलाबाळांच्या उद्धारासाठी शिक्षणकार्याला मदत देण्याची सवय मामांनी शेतकऱ्यांना लावली. पण त्यामुळे इतर आडत दुकानदार—दलाल नाराज होऊ लागले.

धान्यविक्रीप्रमाणे, शेतकऱ्यांचे कडबा, कापूस, भाजीपाला आणि सरपण विक्री करतानाही दलालांकडून शेतकऱ्यांना पिळण्याचे, त्यांचा माल स्वस्तात लिलाव करून त्यांचे कंबरडे मोडण्याचे आणि

नमुन्यावारी बराचसा माल हडप करण्याचे प्रकार नेहमी घडत असत. त्याशिवाय गोरक्षणासाठी व लिंगायत बोर्डिंगसाठी विक्रीला आलेल्या मालापैकी काही भाग आणि काही रक्कम खुशीची सक्ती करून वसूल केली जाई ती वेगळीच! शेतकऱ्यांवर होणाऱ्या अशा प्रकारच्या अन्यायाविरुद्ध वाचाही फुटत नव्हती. मग त्याविरुद्ध झगडणे तर दूरच! जगदाळेमामांनी मागासलेल्या तरुण शेतकरी संघाची स्थापना करून या अन्यायाविरुद्ध लढा उभा केला आणि शेतकऱ्यांना दिलासा दिला. एवढेच नाही तर भाजी मार्केटमध्ये कांदा—लसूण—भाजीपाला विक्रीचे एक दुकानही सुरू केले. ते दुकान बोर्डिंगमधील एक विद्यार्थी श्री. गव्हार चालवू लागला. त्यामुळे भाजी मंडईतील लिलाव पुकारणारे दलाल थोडे वचकून वागू लागले.

शेतकरी—कष्टकरी लोक आपली गुरेढोरे बार्शीला विकायला आणीत. तेथे शेतकऱ्यांना धड जेवायला बसायला चांगली जागा नसे. जनावरांना पाणी पिण्यासाठी हाळाची सोय नसे. ह्या गैरसोई तर राहू द्या. पण जनावरे विकली म्हणजे विक्रीच्या चिठ्ठ्या करताना त्या वेळी बार्शीचे पोलीस—पाटील आणि मुलकी पाटील प्रत्येक जनावरामागे नऊ आणे ते एक रुपयापर्यंतची रक्कम शेतकऱ्यांकडून वसूल करीत आणि तो पैसा दारूच्या गुत्त्यात गडप करीत. यावरही मामांनी एक शक्कल काढली.

जगदाळेमामा शनिवारी गुरांच्या बाजारात जनावरे विक्रीच्या चिठ्ठ्या करायला आपल्या बोर्डिंगमधील काही विद्यार्थ्यांना पाठवीत. हे विद्यार्थी आपल्यासोबत बंद केलेली 'धर्मादाय पेटी' घेऊन जात. ते जनावरे विक्रीच्या चिठ्ठ्या मोफत करीत. त्यामुळे शेतकऱ्यांची त्यांच्यामागे गर्दी होऊ लागली. चिठ्ठ्या केल्यावर धर्मादाय पेटीत खुशीने काही रक्कम टाकायची ते विनंती करीत. शेतकरीही त्यात आनंदाने आणादोन आणे टाकून बोर्डिंगला मदत करीत. रात्री ती धर्मादाय पेटी स्वतः मामा उघडीत. त्यातील जमा रकमेपैकी काही रक्कम ते विद्यार्थ्यांना शिक्षणसाहित्य वा दूध घेण्यासाठी देत आणि उरलेली रक्कम बोर्डिंगमध्ये रीतसर पावती करून घेत.

अशा तऱ्हेने जगदाळेमामांनी निरनिराळ्या क्षेत्रांतील दलाली नष्ट करण्याचा जणू चंगच बांधला. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रारंभ केला. तसेच शेतकरी—कामकरीवर्गाची गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यासाठी त्यांनी आपल्या मित्रांच्या सहकार्याने १९३७ साली 'मागासलेला तरुण शेतकरी संघ' स्थापन केला. गुरांच्या बाजारात जनावरे विक्रीच्या चिठ्ठ्या पाटलांनी करण्यापेक्षा या तरुण शेतकरी संघाने करण्याची मामांनी कलेक्टरना पत्र पाठवून परवानगीही मिळवली. या साऱ्या खटाटोपीमुळे बरेचजण जगदाळेमामांचे आणि त्यांच्या संस्थेचे शत्रू बनले. ते संस्थेला या ना त्या मार्गाने त्रास देऊ लागले.

१९४७ साली डिस्ट्रीक्ट लोकलबोर्डाने सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर असणारा लोकल फंड रुपयामागे एक आणा वाढविण्याचा विचार चालू केला होता. बार्शी नगरपालिकाही जुन्या करात वाढ करण्याचा आणि नवे कर लादण्याचा मनसुबा रचीत होती. शेतकऱ्यांच्या मालावर तर जकातीचे दर वाढविल्याचे त्यांनी जाहीर केले होते. त्याचप्रमाणे सरकारने लेव्ही वा धान्याच्या खूष खरेदीचा कायदा शेतकऱ्यांवर लादला. दरमहा धान्याच्या साठ्याची माहिती देणे बंधनकारक केले. त्यातील शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींचा आणि त्रासाचा विचारही सरकारने केला नव्हता. या अन्यायाला वाचा फोडणारे ठराव मामांनी 'मागास तरुण शेतकरी संघा'तर्फे पास करून ते कलेक्टरकडे पाठवून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे प्रयत्नही केले.

अनुक्रमणिका

शेतकऱ्यांची गरिबी दूर करण्यासाठी जगदाळेमामांनी आपल्या संस्थेच्या शेतीत निरनिराळे प्रयोग सुरू केले. शेतकऱ्यांनी शेतीबरोबर गाई–म्हशी–शेळ्या पाळून दुधाचा आणि कोंबड्या पाळून अंड्याचा जोडधंदा सुरू करावा, यासाठी संस्थेत त्यांनी धेनुसंवर्धन केंद्र आणि पोल्ट्री फार्मही सुरू केले. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात सीड प्लॉट्स करावेत म्हणून मामांनी संस्थेच्या शेतात ज्वारी, ज्वाला मिरची आणि बटाट्याचे सीड प्लॉट्सही करून दाखवले. तसेच त्यांनी संस्थेच्या शेतात मिरची, टोमॅटो, वांगी, कांदा, इत्यादी भाजी-पाल्याच्या रोपवाटिकाही लावल्या. ही रोपे दर्जेदार असल्याने शेतकरी रोपवाटिका अगोदर बुक करून ठेवायचे! जगदाळेमामा त्यांना म्हणायचे, "मी हे प्रयोग करतोय तसे प्रयोग तुम्हीही आपल्या शेतात करा. तुमची गरिबी तुम्हीच दूर करा. स्वतःचा उद्धार स्वतःच करा." हे प्रयोग पाहून अनेक शेतकरी उत्साहाने कामाला लागले.

शेतकऱ्यापेक्षाही अत्यंत वाईट अवस्था खेड्यापाड्यांतील अस्पृश्यांची आणि महिलावर्गाची आहे. त्यांच्या उद्धारासाठी पुण्यासारख्या सनातन्यांचे वर्चस्व असलेल्या शहरात महात्मा फुल्यांनी अस्पृश्य मुलामुलींसाठी प्रथम शाळा सुरू करून आपल्या मूलगामी समाजसुधारणेचा पाया घातला. शंभर–दीडशे वर्षांनंतर अस्पृश्य आणि स्त्रियांच्या स्थितीत थोडीबहुत सुधारणा झाली पण खेड्यापाड्यांतील त्यांचे हाल आजही भयंकर आहेत. अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरील एक लांछनास्पद कलंक असल्याचे आज सर्वमान्य झाले आहे. ही अस्पृश्यता नेस्तनाबूत करण्यासाठी जगदाळेमामांनी आपल्या बोर्डिंगमध्ये सुरुवातीपासून सर्व जातीजमातींची मुले घेतली. हा बोर्डिंगचा प्रयोग पाहून २७ ऑगस्ट ३९ रोजी बोर्डिंगला भेट देणाऱ्या दे. भ. श्री. केशवराव जेधे, श्री. रामकृष्ण जाजू आणि आमदार दे. भ. तुळशीदास जाधव यांनी संस्थेच्या शेरेबुकात "बहुजन समाजातील मुले बोर्डिंगात घेण्यात येतात. अशा बोर्डिंगमधून उच्च–नीच भेदाला मूठमाती मिळणार आहे" अशी नोंद केली आहे.

याशिवाय अस्पृश्यता नष्ट करण्याचे विविध मार्ग मामांनी हाताळले. समाजात अस्पृश्यांना इतरांप्रमाणे मानाने जगता यावे, ही त्यांची तळमळ! अस्पृश्य समाजातील लोकांचे केस कापण्यास बार्शीतील न्हावी त्या काळी तयार नसत. तेव्हा मामांनी पांडे चौकातील केस कापण्याच्या दुकानाचे मालक श्री. सुरवसे यांना हा भेदभाव चुकीचा असल्याचे पटवून दिले. श्री. सुरवसे यांनी मामांचे हे विचार कृतीत आणायला सुरुवात करताच साऱ्या समाजाने श्री. सुरवसे यांच्या दुकानावर बहिष्कार टाकला. त्यात त्यांचे उत्पन्न बुडू लागले. आर्थिक पेच निर्माण झाला. तेव्हा जगदाळेमामांनी आपल्या बोर्डिंगमधील साऱ्या स्पृश आणि अस्पृश्य मुलांना श्री. सुरवसे यांच्या सलूनमध्ये केस कापून घेण्यास पाठविण्यास सुरुवात केली. हळूहळू लोकांनीही बहिष्कार मागे घेतला. तेही अस्पृश्यांचे केस कापू लागले.

१९३४ साली बार्शीत गांधीप्रणीत 'हरीजन सेवक संघ' स्थापला होता. त्या संघातर्फे 'गांधी छात्रालय' चालविले जायचे. मामांचे मित्र या संघाचे अध्यक्ष तर मामा पहिली काही वर्षे उपाध्यक्ष होते. या संघाच्या हरिजनोद्धार कार्यातही जगदाळेमामांचा लक्षणीय सहभाग असे. त्या काळी अस्पृश्यांना देवळात तर प्रवेश नसायचाच पण हॉटेलातही प्रवेश बंद असे. त्याविरुद्धही मामांनी आवाज उठविला. प्रथम एका हॉटेल–मालकास त्यांनी अस्पृश्यांना हॉटेलात प्रवेश देण्याची विनंती केली. थोडे दिवस गदारोळ माजला पण पुढे बार्शीतील इतर सात हॉटेल–मालकांनीही आपली हॉटेले अस्पृश्य समाजाला खुली केली.

'वेदाच्या अभ्यासाचा शूद्रांना आणि स्त्रियांना अधिकार नाही', या आपमतलबी, कूपमंडूक प्रवृत्तीमुळे स्त्री–शूद्रांना हजारो वर्षे गुलामगिरीच्या गर्तेत गाडून राहावे लागले. सर्व वर्णातील स्त्रियांची अशी दारुण

दशा. 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हति' या मनूच्या एका वाक्याच्या फटकाऱ्याने स्त्रिया कायमच्या दास आणि भोगवस्तू बनल्या. ज्यांच्या कटीकमरेवर राष्ट्रे वाढत असतात, त्या स्त्रियांना प्रस्थापितांनी कायमचे अबला करून टाकले. स्त्री शिक्षणानेच त्यांच्यात आत्मभान आणि आत्मतेज येईल; त्यांच्यातील शक्तीच्या साहाय्याने राष्ट्र बलवान होईल, ही मामांची भावना. मामांनी तर स्वतःच्या अशिक्षित पत्नीचे कटू अनुभव सहन केले होते. स्त्री–शिक्षणासाठी ते विचार करीत. "हरिजनांप्रमाणेच किंबहुना त्याहूनही अधिक दुर्दैवी परिस्थिती देशातील कोट्यवधी भगिनीवर्गाची आहे. शहरातील काही पुंजीपती आणि पांढरपेशा बुद्धिजीवी मध्यम आणि सधनवर्गातील काही स्त्रिया 'महिला मंडळातून काम करताना दिसल्या आणि याच वर्गातील काही मुली हायस्कूल आणि कॉलेजमधून शिक्षण घेत असल्या व सरकारी नोकरीत दिसल्या तर त्यांच्यावरून समाजातील सर्व थरांतील भगिनीवर्गाच्या शैक्षणिक आणि इतर सुधारणेच्या चालू लागलेल्या वाटचालीचा तर्क करणे चुकीचे ठरेल! देशातील बहुसंख्य भगिनीवर्गाचे जीवन आर्थिक दास्यामुळे परंपरागत निरनिराळ्या सामाजिक, धार्मिक आणि रूढीप्रिय अंधश्रद्धेच्या बंधनामुळे दुःसह झालेले आहे. स्त्रियांच्या कडेवर राष्ट्रे वाढतात आणि उत्कर्ष पावतात. हे छत्रपती शिवरायांच्या, महात्मा फुल्यांच्या, सुभाष बाबूंच्या आणि महात्मा गांधींच्या व तुमच्या–आमच्या जीवनावरून सहज लक्षात येणारे आहे." ते बोर्डिंगमध्ये मोफत प्रवेश देत असत. स्त्री–शिक्षणाचा प्रसार झपाट्याने व्हावा, हीच त्यांची त्यामागील भूमिका व तळमळ होती.

मुलींची बोर्डिंगमध्ये शिकण्याची मोफत सोय करून जगदाळेमामा तिथेच थांबले नाहीत. स्त्रियांना स्वावलंबी बनविण्याचेही प्रयत्न त्यांनी केले. समाजातील विधवा, परित्यक्ता, आणि अनाथ स्त्रिया तसेच स्वातंत्र्यवीरांच्या आणि देशासाठी प्राण देणाऱ्या जवानांच्या असहाय स्त्रियांना स्वावलंबी आणि स्वाभिमानी बनविण्यासाठी त्यांनी बार्शीला 'जिजामाता स्मारक मंदिर' उभे केले. त्यासाठी एक रुपयापासून देणग्या जमा करण्यासाठी वणवण भटकंती केली. या मंदिरात अशा सर्व स्त्रियांना अनेकविध घरगुती उद्योगधंद्याच्या कला शिकवून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहाण्यास शिकवले.

लग्न हा पवित्र संस्कार. तो साधेपणाने आणि कमी खर्चात व्हावा. हे मामांचे आग्रही मत. त्यामुळेच त्यांना सत्यशोधक वा गांधी लग्नपद्धती आवडे. लग्नातील बँड, वरात, दारुकाम आणि वरातीपुढे बाया नाचविणे या पद्धतीवर ते सडकून टीका करायचे. हुंडापद्धतीचे तर ते कट्टर विरोधक. हुंडा घेणाऱ्या नवरोबाला ते बाजारातून विकत घेतलेला बैल म्हणत. हुंडा न घेता लग्न करणाऱ्यांचे ते तोंडभरून कौतुक करीत. अनेकांची हुंडा न घेता–देता लग्ने जमविण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. विधवा विवाहासही त्यांनी उत्तेजन दिले. अशा लग्नाला ते न चुकता उपस्थित राहून वधूवरांस आशीर्वाद देत.

जगदाळेमामा जरी वारकरी कुटुंबात वाढले तरी स्वतःच्या मुलाच्या शिक्षणाला पैसा न देणाऱ्या पण पंढरपूर–काशी यात्रेत पैसे उधळणाऱ्या पालकांवर ते कठोर कोरडे ओढत. देवा–धर्माच्या नावावर चाललेली निरर्थक कर्मकांडे, देवाच्या नावावर चाललेली अज्ञ जनतेची लूट याबाबींवर बोलताना त्यांचा सात्त्विक संताप शिगेला पोहचे!

समाजात तीन बोटांनी काम करणाऱ्यांइतकीच प्रतिष्ठा दहा बोटांनी काम करणाऱ्याची असली पाहिजे हा त्यांचा आग्रह! म्हणून त्यांनी आपल्या संस्थेत आदर्श शिक्षकाबरोबरच वडार, पाथरवट, गवंडी या मजुरांचे सत्कार मंत्र्यांच्या हस्ते घडवून आणले. श्रमणारा हा खरा सर्जनशील असतो. तो निर्मिक असतो. त्यांचे सत्कार हे खरे सत्कार! असे त्यांचे मत होते!

महात्मा जोतीबा फुले यांनी केलेल्या समाजसुधारणांची वाट त्यांनी जन्मभर चोखाळली. समाजसुधारणेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कारणमीमांसेच्या मुळाशी जाऊन, विचार करून मार्ग शोधले. त्यांनी सुरू केलेल्या 'जीवनसंग्राम' या साप्ताहिकाचे ध्येयवाक्य 'उजळावया आलो वाटो! खराखोटा निवाडा' हे त्यांनी लोकमतांची चाड न बाळगता, प्रस्थापितांच्या विरोधाची पर्वा न करता या साप्ताहिकातून लोकांची गाऱ्हाणी वेशीवर टांगली. गोरगरिबांवरील अन्याय निवारण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यासाठी लोकशिक्षण, जनजागरण आणि समाजसुधारणा या कार्यात मोठे योगदान दिले. महात्मा फुल्यांचा समाजसुधारणेचा वारसा त्यांनी पंढरीच्या वारकऱ्यांच्या निष्ठेने जपला. जोपासला. म्हणूनच त्यांना 'शिक्षणपंढरीचा वारकरी' असे संबोधले जाते.

अनुक्रमणिका

## १४. बहुजन समाजाचे भाग्य बचावले!

सुरुवातीच्या काळात बार्शीतील हायस्कूलचे मुख्याध्यापक जगदाळेमामांना भेटून बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांना आपल्या हायस्कूलमध्ये प्रवेश देत. बोर्डिंगच्या गरीब व होतकरू मुलांना ते शिष्यवृत्त्याही देत. पण पुढे खेड्यापाड्यांतून शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. मामांच्या बोर्डिंगमधील विद्यार्थिसंख्याही वाढू लागली. त्यामुळे हायस्कूलच्या मुख्याध्यापकांचा पूर्वीप्रमाणे बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांची गरज भासेना. मामा विचार करू लागले, "....पुष्कळशा गरीब पण हुशार विद्यार्थ्यांना हायस्कूलमध्ये नादारी मिळेनाशी झाली. कारण हायस्कूलमध्ये फक्त जास्तीतजास्त मार्कस् किती पडले, एवढीच बाब प्रामुख्याने विचारात घेतली जाते. परंतु त्यांच्या घरची गरिबी किती आहे? त्यामुळे त्यांना मानसिक स्वास्थ्य मिळू शकते का? त्यांचे बौद्धिक सामर्थ्य कोणत्या दर्जाचे आहे? त्यांच्यात राष्ट्राला उपयुक्त वा पोषक असे इतर किती गुण आहेत? ते गुण शोधून त्यांची वाढ केली तर? त्यांच्या गुणाला, त्यांच्या कर्तृत्वाला योग्य वाव दिला व थोडीशी सहानुभूती दाखविली तर तो कसा आदर्श नागरिक होऊ शकेल? याची कदरही केली जात नाही. याचा अर्थ बोर्डिंगमधील चांगल्या विद्यार्थ्यांची बुद्धी मातीमोल होऊ द्यायची नाही. त्यासाठी आपल्या संस्थेचे हायस्कूल सुरू केले पाहिजे" ह्या विचाराने मामांच्या मनात पक्के घर केले.

१९४५ सालापर्यंत जगदाळेमामांचे शिक्षणाचे कार्यक्षेत्र बार्शी शहरापुरतेच मर्यादित होते. ग्रामीण भागात ज्ञानाच्या पाणपोया उभारायला त्यांनी प्रारंभ केला तेव्हा त्यांनी स्वतःच्या चारे गावी १३ एप्रिल १९४५ रोजी ह.भ.प. शेलारमामांच्या शुभहस्ते 'महात्मा फुले विद्यार्थी वसतिगृह' सुरू केले. सदर कार्यक्रमास साताराचे कर्मवीर भाऊराव पाटील येणार होते. पण ऐनवेळी काही अडचणीमुळे ते चाऱ्याला आले नव्हते. पण काही दिवसांनी कर्मवीर भाऊराव पाटील बार्शीला मामांची संस्था पाहायला मुद्दाम आले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या पंक्तीला बसून जेवण घेतले. विद्यार्थ्यांमधील शिस्त, श्रमपूजा आणि स्वावलंबन तसेच मामांची काटकसर आणि हिशोबातील चोखपणा त्यांना आवडला. ते जगदाळेमामांना म्हणाले, "सर्व काही चांगलं चाललंय पण मामा तुमच्यात एक उणीव आहे. तुमच्या संस्थेचे स्वतःचे हायस्कूल पाहिजे. "

"आण्णा, हायस्कूल काढायचे म्हणजे त्याला इमारत, पैसा आणि माणसं आणायची कोठून?"

"मामा, तुम्ही हे सत्कार्य करीत असल्यामुळं पैसा तुमच्या पाठीशी धावत येईल. पण तुमची माणसं तुम्हालाच निर्माण करावी लागतील!"

"आण्णा, अगोदर हायस्कूलची इमारत बांधून पूर्ण करतो. त्यानंतर हायस्कूलही सुरू करतो."

जगदाळेमामांना कर्मवीर आण्णांचे मित्रवत मार्गदर्शन मिळाले. त्यांच्याकडून 'श्रमातून स्वावलंबनाच्या कार्याची सतत स्फूर्ती मिळाली व पैशाशिवाय कार्य होऊ शकते हा आत्मविश्वास वाढला.' म्हणूनच त्यांनी हायस्कूलची इमारत बांधण्याचा ध्यास घेतला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या हस्ते सदर इमारतीची कोनशिला मोठ्या धुमधडाक्यात ७ डिसेंबर १९४६ रोजी बसविली. काटकसर करून, धावाधाव करून पैसा जमा केला आणि सदर इमारतीचे बांधकामही सुरू केले. पण इमारत बांधून पूर्ण व्हायच्या अगोदरच नियतीने आपली वक्रदृष्टी जगदाळेमामांकडे फिरवली.

अनुक्रमणिका

२१ मे १९५०. रविवार सुट्टीचा दिवस. पण जगदाळेमामांना आणि इमारत बांधणाऱ्या गवंडी–मजुरांना कुठली सुट्टी? मामांनी इतर कामे बोर्डिंगच्या विद्यार्थीसेक्रेटरीवर सोपविली. तंबाखूचे दंतमंजन एका चौकोनी कागदाच्या तुकडीवर घेतले. दात घासत ते इमारतीचे बांधकाम पाहायला निघाले, तेव्हा त्यांचा आवडता मोत्या कुत्रा त्यांच्या पायात घोटाळू लागला. केविलवाणं ओरडू लागला. "अरं मोत्या बाजूला सरक." त्यांनी स्वयंपाकीणबाईला हाक मारून 'मोत्याला भाकर टाका' असे सांगून ते पुढे सटकले तरी मोत्याचं विव्हळून ओरडणं चालूच होतं.

सूर्य बराच वर आलेला. उन्हं तापू लागलेली. भिंतीला शिडी उभी. तंबाखूच्या दंतमंजनाची पुडी एका हाती घेऊन मामा शिडीवर चढले. अर्धवट बांधलेल्या अरुंद भिंतीवर उभे राहून ते मजुरांना सूचना देऊ लागले. मिश्री दाताला लावणे चालूच होते. एकदम मामांना काय होतंय तेच कळेना. सारी इमारत फिरतेय असा क्षणभर भास झाला आणि एकाएकी दहा फूट उंचीच्या भिंतीवरून ते खाली कोसळले. खालच्या दगडधोंडे–चिपांच्या ढिगावर ते पडले. हे पाहून गवंड्याने बोंब मारली, "मामा पडले. पाणी आणा" असं ओरडत तो चपळाईनं खाली उतरला. मामा बेशुद्ध पडलेले. नेमक्या एका मोठ्या अणकुचीदार दगडावरच ते आदळलेले. त्यांच्या पाठीचा मणका मोडलेला. अधःशाखा लुळ्या पडलेल्या. पायाला आणि नाकाला मार लागलेला. तोंडातून रक्त येत असलेले. बेशुद्धीतही मामा वेदनेने कण्हत असलेले. धावाधाव झाली. लोक जमले. शेजारी मोत्या कुत्रा केविलवाण्या चेहऱ्याने लाखत उभा होता.

नारायण गवंड्याने मामांच्या तोंडात पाणी घातले. रक्ताळलेले तोंड पुसले. मामा थोडे शुद्धीवर आले. ते जोराने विव्हळू लागले. किंचाळू लागले. कुणीतरी पळत जाऊन आणलेल्या सतरंजीवर मामांना उचलून ठेवले. सतरंजी अलगद उचलली. त्यांना एका खोलीत बाजेवर झोपवले. मामांची तडफड आणि कण्हणं, किंचाळणं चालूच होतं.

सुट्टी असल्यानं बोर्डिंगमध्ये मोजकीच मुलं होती. सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. रा. ज. पवार यांनी रेवडकर आण्णा, अंबादास पाटील, श्री. संभाजी बारंगुळे यांना बोलवून आणलं. श्री. नारायण जगदाळेमामांच्या सेवाशुश्रूषेला लागले. डॉ. करपेबाई आल्या. प्रथमोपचार करू लागल्या. श्री. संभाजी बारंगुळे, श्री. टी. बी. जगदाळे यांनी भाड्याची टॅक्सी करून मामांना सोलापूरला नेले. प्रथम वाडिया हॉस्पिटलमध्ये टॅक्सी नेली, पण तेथे डॉक्टर हजर नव्हते. अखेर टॅक्सी डॉ. मुळे यांच्या दवाखान्यात नेली. डॉ. मुळे पंढरपूरहून लवकरच येणार म्हणून पंढरीच्या पांडुरंगावर भरवसा ठेवून तेथेच मामांवर उपचार सुरू झाले.

डॉ. भा. वा. मुळे यांनी मामांची सख्ख्या भावाप्रमाणे देखभाल केली. चार महिने उपचार केले. या काळात सर्वश्री. शामा गाढवे, नारायण जगदाळे, मांजरे, रा. ज. पवार, पांगरे आणि भंडारी हे विद्यार्थी आळीपाळीने मामांपाशी सेवाशुश्रूषा करीत राहिले. मामांची बहीण सुभद्राआक्काच्या घरातून मामांचा जेवणाचा डबा येई. मामांना खूप अशक्तपणा आलेला. डॉक्टरांनी त्यांना अंडीमटण खायचा सल्ला दिला. मामा तर वारकरी. पण डॉक्टरांचे त्यांनी ऐकले. श्री. गायकवाड गुरूजी आणि एका फौजदाराकडून मामासाठी अधूनमधून मटणाचा डबा येऊ लागला.

चार महिन्यांनंतर जगदाळेमामांना दवाखान्यातून डिसचार्ज मिळाला. त्या वेळी मामांनी 'बिल किती झाले?' असे डॉ. मुळ्यांना विचारले. त्यावर डॉक्टर मुळे तात्काळ उद्गारले, "मामा, तुम्ही

अनुक्रमणिका

ज्ञानदानाचा पुण्यधर्म आचरताय. तोच नवीन जोमानं चालवा. त्यात माझ्या बिलाचे पैसे मला मिळाल्यासारखे होतील.” धन्य ते डॉक्टर आणि धन्य त्यांचा मानवसेवा धर्म! जगदाळेमामा बार्शीला आले. थोड्याच दिवसात हे बहुजनांचे भाग्य कुबड्यांच्या साहाय्याने हळूहळू चालू लागले.

जगदाळेमामा बरे होऊन कुबड्या घेऊन बांधकामावर देखरेख करू लागले. त्यांच्या असामान्य त्यागाचा, अविरत कष्टाचा, निरलस सेवेचा आणि ऋषितुल्य तपस्येचा गौरव करावा असे सर्वांना वाटणे साहजिक होते आजी माजी विद्यार्थी जमले. सभेत भाषणे झाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारखे श्री. जगदाळे मामा हेही कर्मवीर असल्याचा सर्वांनी उत्स्फूर्तपणे उच्चार केला. याच सभेत ‘पूज्य जगदाळेमामा सत्कार समिती’ स्थापन झाली. श्री. बेडकुते, श्री. देशमुख, श्री. मुठाळ आणि पांगरे यांच्या सहीचे २३ नोव्हेंबर १९५० रोजी एक पत्रक निघाले. त्यातील शेवटचा भाग असा. “.... (जगदाळेमामा यांच्या) कार्याच्या या जिवतपणावरून या संस्थेच्या भावी कार्याविषयी जनतेच्या मनात अनंत आशा निर्माण झालेल्या आहेत. या सर्व विधायक कार्याचे श्रेय निःस्वार्थी व निरहंकारपणे राहून कोणत्याही तऱ्हेचा सात्त्विकदेखील गाजावाजा न करता अविरतपणे धडपडणाऱ्या पूज्य जगदाळेमामांनाच आहे. पूज्य जगदाळेमामांची ज्ञानप्रसाराची व देशहिताची तळमळ आणि त्यांचा अविश्रांत उद्योग या गुणांनी मूर्त रूप धारण केले व ही संस्था अवतीर्ण झाली आणि अभ्युदय पावली. सर्वस्वाचा त्याग करून, तनमनधन समर्पण करून क्षणाक्षणाला कणाकणाने चंदनाप्रमाणे झिजून ज्ञानाचा सुगंध त्यांनी बहुजन समाजात पसरविला. दीपकांतील ज्योतीप्रमाणे स्वतःला जाळून घेऊन ज्ञानाचा प्रकाश सर्वांना दिला. (अशा) या महाभागाचे उपकार फिटतील का?

“महाराष्ट्रातील संतांचा उपदेश, शिवाजीमहाराजांनी घडविलेला उज्ज्वल इतिहास, महात्मा फुले यांची खडतर समाजसेवा, महात्मा गांधीजींची उदात्त शिकवण व कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श कर्मयोग सतत डोळ्यांपुढे ठेवून अहोरात्र झटून त्यांनी ज्ञानाची ही पावन गंगा शेकडो खेड्यापाड्यांत नेऊन हजारो लोकांची जीवने फुलविली. नदीच्या प्रवाहाप्रमाणे वाटेतील विरोधकांना चुकवीत, वळसे घेत व प्रसंगी अभेद्य असे खडक भेदूनही ध्येयसागराला जाऊन मिळण्याची धडपड त्यांनी अखंड चालू ठेवली.”

पत्रके गावोगावी वाटली गेली. कार्यकर्ते मामांच्या सत्कार निधीसाठी मदत गोळा करू लागले. १९५२—५३ च्या हिशोबाप्रमाणे ह्या सत्कार निधीत चौदाशे रुपये जमले. ज्या इमारतीवरून मामा पडले, त्या इमारत बांधकामासाठी हा निधी खर्च करण्यात आला. या सत्कार समारंभापासून जगदाळेमामांना लोक ‘कर्मवीर जगदाळेमामा’ म्हणून संबोधू लागले.

नियोजित हायस्कूलची इमारत बांधून पूर्ण झाली. हायस्कूल सुरू करायचे तर तेथेही परिस्थिती आडवी आली. १९५० साली सरकारी कायद्यानुसार धान्य वाटप (रेशनिंग) पद्धती सुरू झाली. शेतकऱ्यांनी स्वतः कष्ट करून पिकविलेली ज्वारीही त्यांना आपल्या मुलांना खाण्यासाठी बार्शीला बोर्डिंगमध्ये आणता येईना. त्यामुळे बोर्डिंगमधील विद्यार्थिसंख्या कमी होण्याची शक्यता वाढली. यातून मार्ग काढण्यासाठी खेड्यातच वसतिगृहयुक्त विद्यालये काढण्याचा विचार कर्मवीर जगदाळेमामांनी केला. पण ही शाखा कोणत्या गावी सुरू करावी? कुबड्या काखेत घेऊन चालणारे कर्मवीर जगदाळेमामा विचारात दंग झाले.

## १५. मामांना मारण्यासाठी मारेकरी आले; माफी मागून गेले!

कुठल्या खेड्यात बोर्डिंग सुरू करावे, या विचारात कर्मवीर जगदाळेमामा होते. तेव्हा येडशीचे श्री. शंकरराव रास्ते हे स्वतःच्या मुलाची बोर्डिंगची फी भरण्यासाठी मामांच्याकडे आले. बोलता बोलता मामांनी त्यांच्यापुढे रेशनिंग, महागाई आणि शिक्षणातील अडचणींचा पाढा वाचला. खेड्यातून बोर्डिंग्स सुरू करण्याचा आपला मनोदयही बोलून दाखवला. त्यावर श्री. सस्ते म्हणाले, "मामा, मग तुम्ही येडशीला का बोर्डिंग काढीत नाही? "

"येडशीलाच काय पण एखाद्या डोंगरातही मी बोर्डिंग काढीन पण त्यासाठी लोकांची सहानुभूती आणि कमीतकमी दोन एकर जागा मिळाली पाहिजे." श्री. सस्ते यांनी मामांना सहकार्य करण्याचे कबूल केले. तसेच श्री. लालासाहेब देशमुख यांनीही येडशीला जागा मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

येडशीच्या हद्दीपर्यंत बालाघाट डोंगरांच्याच रांगा. डोंगराच्या कुशीत श्रीरामलिंग मंदिर! डोंगरालगत येडशी गाव वसलेलं. हा परिसर म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील महाबळेश्वर. शिवाय ते मराठवाड्याचे प्रवेशद्वार. तेथे बोर्डिंग सुरू करण्याचा मामांनी निश्चय केला आणि १ मार्च १९५२ रोजी येडशीला 'सुभाष विद्यार्थी वसतिगृह' सुरू झाले. हे बोर्डिंग म्हणजे बार्शी येथील श्री शिवाजी बोर्डिंगची प्रतिकृतीच. सुरुवातीला ते श्री. कचरे, श्री. शिवनारायण तापडे आणि श्री. लालासाहेब देशमुख यांच्या वाड्यात होते.

येडशी रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेला असलेल्या विस्तीर्ण माळरानालगत ८ एकर ३ गुंठे जागा मामांनी खरेदी केली. ३१ जुलै १९५२ रोजी त्या जागेवर बोर्डिंगच्या नियोजित इमारतीचा कोनशिला समारंभ कोल्हापूरचे प्रसिद्ध पुढारी भाई माधवराव बागल यांच्या शुभहस्ते आणि डॉ. भा. वा. मुळे यांच्या अध्यक्षतेखाली ४ डिसेंबर १९५१ रोजी पार पडला. ३१ जुलै १९५२ रोजी त्या जागेवर उभारलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये गावातील वसतिगृह हलवले. बार्शीच्या भारतीय बालिकाश्रमातील मुलीही येडशीच्या बोर्डिंगमध्ये आणल्या. कर्मवीर मामाही तेथे येऊन राहिले. मुले—मुली एकत्र राहू लागल्या. प्राचीन गुरुकुलाची तत्त्वे परिस्थितीनुरूप बदलून कार्यवाहीत आणण्याचा प्रयोग मामांनी सुरू केला.

येडशीला हायस्कूल काढायचेही मामांनी ठरविले. त्या वेळी येडशीला फक्त मराठी सातवीपर्यंतच शाळा होती. १९५०—५१ या शैक्षणिक वर्षात सातवीच्या वार्षिक परीक्षेचा निकाल अत्यंत वाईट लागला. सातवीचा वर्ग स्थानिक रहिवाशी श्री. जगताप मास्तरांकडे होता. म्हणून गावकऱ्यांनी त्यांच्याविरुद्ध ए. ओ. कडे तक्रारी अर्ज केला. जगताप मास्तरांची येडशीहून दुसरीकडे बदली झाली. आपल्या बदलीला कर्मवीर मामाच जबाबदार असल्याचा श्री. जगतापांनी ग्रह करून घेतला.

१९५१—५२ मधील सातवीचा निकाल चांगला लागला. बोर्डिंगचा विद्यार्थी श्री. वसुदेव नरहरी इंगळे हा ७४ टक्के गुण मिळवून सोलापूर जिल्ह्यात पहिला आला तेव्हा कर्मवीर जगदाळे मामांनी त्याच वर्षारंभी येडशीला 'जनता विद्यालय' हे हायस्कूल सुरू केले. त्याचे उद्‌घाटन अक्कलकोटच्या राणी श्रीमती निर्मलाराजे भोसले यांच्या शुभहस्ते झाले. पहिल्या वर्षी ८वी आणि ९वीचे दोन वर्ग सुरू केले. एवढे चांगले काम कर्मवीर मामा करीत होते तरी श्री. जगताप मास्तरांचा त्यांच्यावरचा राग कमी झाला नव्हता.

जून १९५२ मधील दुसऱ्या आठवड्यातील एक रात्र! मृग नक्षत्र पडून धरणी थंडगार झालेली. तृणांकुर उगवू लागलेले. बोर्डिंगच्या मुलांची सायंकाळची जेवणं उरकलेली. अभ्यासानंतर ती झोपेच्या आधीन झालेली. सर्वत्र काळोख पसरलेला. कर्मवीर मामांनी नुकतेच अंथरुणावर अंग टाकलेले. श्री. रा. ज. हंगरगे (पवार) बोर्डिंगचा जमाखर्च लिहीत बसलेले. तेवढ्यात दारावर जोराने थापा पडू लागल्या. काठ्या आपटल्याचे आवाज आले. "जगदाळेमामा हाय का? " असा राकट, रागीट आवाज कानावर पडला. "काढा रं त्येला भाईर! नग त्या भानगडी करतुया. त्येचा दुसरा पाय बी मोडाया पायजी!" धमकी देणारं वाक्य! अशा अपरात्री मामांना भेटायला कोण येणार? श्री. च. बं. मुठाळांनी दार उघडलं! तर दारात पाच–सहा लोक हातात कानाइतक्या उंचीच्या काठ्या घेऊन उभे!

"तुम्ही बाहेर का उभे? आत या ना! " श्री. रा. ज. पवार.

"जगदाळेमामा हाय नव्हं आत? त्येच्याकडं जरा बगायचं हाय! "

श्री. मुठाळांच्या मनात भीतीची पाल चुकचुकली. तरीही प्रसंगावधान ठेवून ते आदबीने त्यांना म्हणाले,

"पण अगोदर आत तरी येऊन बसा." असं म्हणून त्या काठीधारी लोकांना बसायला सतरंजी अंथरली.

कर्मवीर जगदाळेमामा कॉटवर पडून हे सारे बोलणे ऐकत होते. श्री. जगताप मास्तरांच्या गैरसमजातून ह्या प्रसंगाची निर्मिती झाल्याचे त्यांनी ताडले. प्रसंग तसा बाका. पण भिऊन काय उपयोग? प्रसंगाला तोंड देण्यासाठी ते उठून बसले आणि काठीधाऱ्यांना म्हणाले, "तुम्ही मला मारायला आला आहात तर खुशाल मारा. तुमचा त्यात फायदा होत असेल तर मी मरायलाही तयार आहे. पण एवढे ध्यानी घ्या की, माझ्या स्वतःच्या मुलाबाळांच्या सुखासाठी मी हे कार्य करीत नाही. गोरगरिबांच्या मुलाबाळांसाठी करतोय. इथल्या बोर्डिंग आणि हायस्कूलमध्ये पुढे तुमचीच पोरं शिकणार आहेत. तुम्ही माझा खून केला तर माझी पोरं या इथंच माझी समाधी बांधतील आणि त्या समाधीचा प्रत्येक दगड भावी पिढ्यांना माझे विचार ऐकवतील! "

कर्मवीर जगदाळेमामांच्या निर्भय बोलण्याचा, निःस्वार्थी वृत्तीचा आणि सेवाभावी हेतूचा त्या लोकांच्या मनावर जादूसारखा परिणाम झाला. त्यांनी खाली ठेवलेल्या काठ्या उचलल्या आणि "मामा, आमचं चुकलं! आम्हाला माफ करा." असं म्हणून ते लोक निघून गेले. महात्मा जोतीबा फुल्यांनाही मारण्यासाठी त्यांच्या घरी मारेकरी पाठविले गेले होते. त्या प्रसंगाची आठवण या प्रसंगामुळे प्रकर्षाने झाल्याशिवाय राहात नाही!

१९५० साली कर्मवीर मामा इमारतीवरून पडल्यामुळे संस्थेच्या शाखा खेडोपाडी सुरू करण्यास त्यांना हालचाल करता आली नाही. पण हेही खरे की, संस्थेच्या प्रगतीची पाऊले १९५१ पासून येडशीला सुरू झालेल्या शाखांपासून पडू लागली. १९५१ हे साल संस्थेच्या इतिहासात शुभशकुनी ठरले. १९५१ ते ६१ या दशकात संस्थेच्या प्रगतीची घोडदौड जोमाने सुरू झाली.

अनुक्रमणिका

# १६. खेड्यातून वसतिगृहयुक्त विद्यालयाचे नवे पर्व!

येडशीचे 'जनता विद्यालय' हे संस्थेचे पहिले हायस्कूल. पहिल्या खरेदी केलेल्या जागेलगत कर्मवीर जगदाळेमामांनी आणखी सत्तावीस एकर सात गुंठे जमीन खरेदी केली. हे हायस्कूल शेती आणि तंत्र शिक्षणाचे केंद्र व्हावे, हा त्यामागील त्यांचा हेतू. १९६०–६१ साली हायस्कूल मल्टीपरपज हायस्कूल झाले. शेती विषयाचे ज्ञान शेतकऱ्यांच्या मुलांना मिळू लागले. वसतिगृह आणि हायस्कूलच्या इमारती उभ्या राहिल्या. बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांनी श्रमदानातून दोन–तीन विहिरी खोदल्या. शेती विषयाबरोबर तांत्रिक शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरू झाले. किमान कौशल्याचे तीन अभ्यासक्रम तसेच ज्युनिअर कॉलेजमध्ये ११वी आणि १२वीचे वर्गही चालू झाले. हे हायस्कूल शिक्षणाचे एक आदर्श केंद्र म्हणून प्रसिद्ध झाले.

येडशीप्रमाणेच इतर खेडेगावातून वसतिगृहयुक्त विद्यालये सुरू करण्याचा कर्मवीर जगदाळेमामांनी ध्यासच घेतला. १९५३ साली श्रीपत पिंपरी येथे 'लोकसेवा विद्यालय' आणि 'किसान विद्यार्थी वसतिगृह' सुरू केले. पण हे गाव आडवळणी आणि रेल्वेलाईनपासून दूर नि गैरसोयीचे असल्याने तेथील या शाखांचे दुसरीकडे स्थलांतर झाले.

१९५३ साली श्री. व्ही. बी. देसाई एज्युकेशन इन्स्पेक्टर, सोलापूर हे बार्शी येथील शाळा तपासण्यासाठी आले होते. कर्मवीर मामांच्या बार्शी येथील संस्थेच्या इमारती व परिसर पाहून त्यांनी मामांना बार्शीला हायस्कूल आणि ट्रेनिंग कॉलेज काढण्याची सूचना केली. त्याबाबत मार्गदर्शन आणि सहकार्य केले. तेव्हा मामांनी जून १९५४ पासून बार्शी येथे 'महाराष्ट्र विद्यालय' आणि 'शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय' सुरू केले.

'महाराष्ट्र विद्यालया'चे प्रथम मुख्याध्यापक आणि 'शं. निं. अध्यापक विद्यालया'चे प्राचार्य ही दोन्ही पदे श्री. च. बं. मुठाळ (शितोळे) हे पाहू लागले. अध्यापक विद्यालयास श्री. शंकरराव निंबाळकर यांचे नाव देऊन त्यांनी संस्थेला दिलेल्या भरघोस देणगीच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न केला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या हस्ते कोनशिला बसविलेली इमारतही बांधून पूर्ण केली. त्यात या शाखा सुरू झाल्या. पुढे शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाची आणि वसतिगृहाची अशा दोन मजली इमारतीही बांधून पूर्ण केल्या. संकेश्वर देवळातील जागेत बांधलेल्या इमारतीत 'महात्मा फुले विद्यामंदिर' ही प्राथमिक शाळा सुरू (१९६३) केली. ती शं. निं. अध्यापक विद्यालयाचे प्रॅक्टिसिंग स्कूल झाली. 'महाराष्ट्र विद्यालय' या हायस्कूलमध्येही शेतीचे, तंत्र शिक्षणाचे अभ्यासक्रम तसेच ज्युनिअर कॉलेजचे वर्ग आणि किमान कौशल्याचे तीन अभ्यासक्रमही शिकविले जातात. हे हायस्कूल आज बार्शीतील एक नावाजलेले मोठे हायस्कूल म्हणून ख्यातनाम झाले आहे.

१९५४ साली कर्मवीर मामांनी काटेगाव (ता.बार्शी) येथेही 'महात्मा फुले वसतिगृह' आणि 'महात्मा गांधी विद्यालय' या दोन शाखा सुरू केल्या. या दोन्ही शाखांचे उद्‌घाटन अनुक्रमे भागवतधर्म प्रचारक श्री. शेलारमामा आणि सोलापूर जिल्ह्याचे त्या वेळचे आदर्श कलेक्टर कॅप्टन श्री. शंकरराव मोहिते यांच्या शुभहस्ते करण्यात आले. संस्थेने काटेगावच्या ओढ्याच्या रम्य काठावर जागा घेऊन हायस्कूलची इमारतही पूर्ण केली आहे. या हायस्कूलच्या विकासात श्री. माधवराव जगताप, श्री नजिरोदीन सैफोद्दीन आणि गावकरी मंडळींनी मोलाची मदत केली.

अनुक्रमणिका

१९५४ हे संस्थेच्या इतिहासातील महत्त्वाचे साल. बार्शी येथे हायस्कूलसाठी बांधलेल्या स्वतंत्र इमारतीचे उद्‌घाटन त्या वेळच्या "मुंबई राज्याचे महसूलमंत्री ना. भाऊसाहेब हिरे यांचे हस्ते २८ नोव्हेंबर १९५४ रोजी झाले. सासोरे येथील सधन शेतकरी श्री. रामचंद्र रानबा करंडे यांनी संस्थेला दिलेल्या रु. २००१ देणगीबद्दल इमारतीतील एका हॉलचा नामकरण विधीही त्याचवेळी ना. हिरे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच कै. शंकरराव निंबाळकर यांनी दिलेल्या अकरा हजार रुपये देणगीबद्दल त्यांच्या स्मरणार्थ स्मारक सभागृहाचे उद्‌घाटन सोलापूर जिल्ह्याचे त्या वेळचे आदर्श शिक्षणाधिकारी श्री. व्ही. बी. देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. आणि सिरसाव येथील सधन शेतकरी श्री. नामदेव भाऊराव जाधव यांनी मंडळास ७ एकर ३९ गुंठे जमीन घेऊन देण्यास मदत दिली म्हणून कष्टकरी जनतेचे सुप्रसिद्ध पुढारी आमदार तुळशीदास जाधव यांचे हस्ते या मळ्याचा नामकरणविधी करण्यात आला." (संस्थेचा त्रैवार्षिक अहवाल, ६ व ७वा, पृ. ४ व ५). या उद्‌घाटन समारंभानिमित्त कुस्त्या आणि नाटकाचे कार्यक्रम आयोजित केले होते. शेवटी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मानसपुत्र प्राचार्य बॅ. पी. जी पाटील यांचे भाषणही रंगले.

१९५४ नंतर कर्मवीर मामांनी बार्शी तालुक्यात आणि मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात वसतिगृहयुक्त विद्यालये काढण्याचा सपाटाच लावला. जून १९५५ मध्ये कसबे तडवळे येथे 'जयहिंद विद्यालय' आणि 'जनसेवा विद्यार्थी वसतिगृह' सुरू केले. तेथे रस्त्यालगत जागा खरेदी केली. त्यावर हायस्कूलची इमारतही बांधून पूर्ण केली. श्री. शिवाजी निंबाळकर, श्रीमंत पाटील, विश्वनाथ होगले, गणपतराव पाटील या गावकऱ्यांनी ह्या हायस्कूलच्या विकासात बरीच मदत केली.

जून १९५६ मध्ये मामांनी उपळे (दुमाला) या गावी 'वखारिया विद्यालय' आणि 'महात्मा गांधी छात्रालय' सुरू केले. या हायस्कूलसाठी दानशूर श्री. दीपचंद रामचंद्र वखारिया ऊर्फ बाबुलालभाई यांनी आपली ८ एकर १० गुंठे जमीन संस्थेला दान दिली. त्यावर इमारतही बांधून पूर्ण झाली आहे. परिसरात वृक्षारोपण झाल्याने वाढलेल्या वृक्षराजीत गुरुकुलाप्रमाणे शोभणारे हे हायस्कूल आहे. सर्वश्री बोधला पासले, विठ्ठल शिंदे, माजी आमदार गोविंदराव बुरगुटे, मुरलीधर बुरगुटे, स्वातंत्र्यसैनिक श्री. लक्ष्मण बुरगुटे, बापुराव ठोंगे, यादवराव नाईकवाडी, गणपती बुरगुटे, उद्धवराव भोसले आदी ग्रामस्थांनी या विद्यालयाच्या विकासात लक्षणीय योगदान दिले.

उस्मानाबाद हे जिल्ह्याचे ठिकाण. पण तेथे पूर्वी एकच सरकारी हायस्कूल. ग्रामीण विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेना. तेव्हा कर्मवीर मामांनी तेथे जून १९५६ पासून 'भारत विद्यालय' आणि 'विद्यार्थी वसतिगृह' सुरू केले. मागासलेल्या मुस्लिम वस्तीत हे हायस्कूल चालते आहे. हायस्कूलच्या विकासात मा. आमदार उद्धवराव पाटील, खासदार नरसिंगराव देशमुख, बापुराव जगदाळे मास्तर, नगराध्यक्ष श्री. विश्वासराव पाटील आणि श्री. रा. गे. शिंदे यांनी खूप प्रयत्न केले. हल्लीचे खासदार श्री. शिवाजी बापू कांबळे यांनी वर्ग बांधण्यासाठी चार लाखाचे अनुदान दिले. त्यामुळे या हायस्कूलची इमारत पूर्णत्वास पोहचली आहे.

१९५८ साली वाशी (ता. भूम) या गावी 'छत्रपती शिवाजी विद्यालय' आणि 'ज्ञानदीप विद्यार्थी वसतिगृह' कर्मवीर मामांनी सुरू केले. या कामी गावातील शिक्षणप्रेमी श्री. बापूसाहेब देशमुख, श्री. शिवाजीराव देशमुख, श्री. शहाजीराव देशमुख आणि श्री. बाबुराव शिंदे यांचे सहकार्य मिळाले. या शाळेत ज्युनिअर सायन्सचे ११वी–१२वीचे वर्गही चालू झाले आहेत. याच साली (१९५८) आगळगाव (ता. बार्शी) येथे मामांनी 'लोकसेवा विद्यालय' सुरू केले. या हायस्कूलसाठी श्री. दगडू संभाजी नाईक यांनी संस्थेला

चार एकर जमीन दान दिली. त्यावर टुमदार इमारतही उभी आहे. या हायस्कूलच्या अडीअडचणीच्या वेळी श्री. रमेश पंढरीनाथ मोरे आणि दत्तात्रय कानडे गुरुजी यांनी मदत केली.

१९५९ साली ठोंग्याची उपळाई (ता. बार्शी) येथे मामांनी 'किसान कामगार विद्यालय' आणि 'विद्यार्थी वसतिगृह' सुरू केले. श्री. मधुकर आणि सदाशिव सदावर्ते यांनी आपली गावालगतची चार एकर जागा संस्थेला बक्षीसपत्र करून दिली. त्यावर ऐटदार इमारत बांधून पूर्ण झाली आहे. तर १९६० साली तेर (ता. जि. उस्मानाबाद) येथे मामांनी 'महाराष्ट्र संत विद्यालय' आणि 'संत गोरोबा विद्यार्थी वसतिगृह' सुरू केले. या हायस्कूलसाठी श्री. विठ्ठलराव नाईकवाडी आणि श्री. आबा नाईकवाडी यांनी जमीन दिली. त्यावर सोळा खोल्यांची दुमजली इमारत उभी आहे. तसेच सुरुवातीस हायस्कूलसाठी सोमाणी बंधूनी नाममात्र भाडेपट्ट्यावर आपला वाडा दिला होता. तो वाडाही त्यांनी संस्थेला दान दिला आहे. या शाखेच्या विकासात ना. डॉ. पद्मसिंह पाटील आणि बार्शीचे सोमणीबंधू यांचे योगदान लक्षणीय आहे.

१९६१ साली भातंबरे (ता. बार्शी) येथे मामांनी 'संत ज्ञानेश्वर विद्यालय' सुरू केले. या हायस्कूलसाठी संस्थेने पावणेदोन एकर जागा खरेदी केली. त्या जागेलगतची दोन एकर जमीन श्री. शामराव भीमा वाघमोडे यांनी संस्थेला दान दिली. या जागेवर इमारत बांधली. विहीर खोदली. या विद्यालयाच्या विकासात सर्वश्री प्रल्हाद खुने, नारायण तांबे, दादाराव तांबे, व्यंकट पाटील, आण्णा शिराळ, औदुंबर खुरेकाका या मान्यवरांच्या मार्गदर्शन व मदतीचा खूप उपयोग झाला.

१९६२ साली पानगाव (ता. बार्शी) येथे कर्मवीर मामांनी 'संत तुकाराम विद्यालय' सुरू केले. या हायस्कूलसाठी श्री. बलभीम मोरे यांनी दोन एकर जमीन संस्थेला दान दिली. तर रस्त्यालगतची गायरान जमीनही शासनाकडून मिळाली. त्यावर इमारत बांधून पूर्ण झाली आहे.

बार्शी येथील संस्थेच्या संकेश्वर मंदिरात मामांनी १९६३ साली 'महात्मा फुले विद्यामंदिर' ही प्राथमिक शाळा सुरू केली. या प्राथमिक शाळेतून ४थी व ७वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करून घेतली जाते. दरवर्षी पाच ते दहा विद्यार्थी या शिष्यवृत्या पटकावतात. एक दर्जेदार प्राथमिक शाळा म्हणून या शाळेचा दबदबा आणि नावलौकिक वाढलेला आहे.

१९६५ साली चारे गावी 'कर्मवीर विद्यालय' संस्थेने सुरू केले. या शाळेसाठी गायरानाची पडीक जमीन शासनाकडून मिळाली. तर त्या जमिनीलगत रस्त्याच्या कडेची अर्धा एकर जागा त्यातील विहिरीसह श्री. मोहन पाटील आणि टी.एन. पाटील यांनी संस्थेला दान दिली. त्यावर संस्थेने शाळेच्या इमारतीलगत कर्मवीर 'डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृती मंदीर' नुकतेच बांधून पूर्ण केले आहे. यासाठी श्री. नारायण जगदाळे यांनी सेवानिवृत्त झाल्यावर आपल्या फंडाची रक्कम देणगी म्हणून दिली होती. या हायस्कूलमध्ये ज्युनिअर कॉलेजचेही वर्ग चालू आहेत.

१९६८ साली बार्शीला कर्मवीर मामांनी बांधलेल्या जिजामाता स्मारक मंदिरात 'जिजामाता विद्यामंदिर' ही मुलींची प्राथमिक शाळा सुरू झाली. बार्शीच्या पंचायत समितीच्या इमारतीलगत या शाळेची दुमजली लक्षवेधी इमारत उभी आहे. बार्शी शहरातील एक आदर्श प्राथमिक शाळा म्हणून तिचा नावलौकिक आहे.

अनुक्रमणिका

१९८९—९० या शैक्षणिक वर्षात संस्थेने ‘जिजामाता कन्या प्रशाळा’ हे मुलींचे स्वतंत्र हायस्कूल सुरू केले आहे. १९९१—९२ साली या प्रशाळेतून मॅट्रिकच्या परीक्षेला मुलींची पहिली तुकडी बसली. या प्रशाळेचा निकाल नेहमीच ७० टक्क्यांपेक्षा जास्त लागत असतो.

प्रत्येकाला शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे. अशी संधी मिळाली नाही तर अशा “कुटुंबात कितीतरी प्रतिभाशाली बालके जन्माला येत असतील. त्यांना शिक्षण देणे आवाक्याबाहेरचे असते. अशांचा जन्म हॉटेलात कपबशा धुण्यात आणि धनिकांची गुरे राखण्यात जात आहे. त्यामुळे राष्ट्र आज अनेक कालिदासांना, रवींद्रांना व रामनांना मुकत आहेत” (संस्थेचा त्रैवार्षिक अहवाल ६वा व ७वा) असे मामांचे मत. त्या संधी सर्वांना मिळाव्यात यासाठी त्यांची धडपड. खेड्यापाड्यांतून सुरू केलेल्या वसतिगृहयुक्त विद्यालयाला त्यांनी दिलेली नावे जरी आपण बारकाईने पाहिली तरी कर्मवीर मामांची वारकरी पंथावरील डोळस श्रद्धाच दिसून येईल. म्हणून ‘शिक्षणपंढरीचा वारकरी’ या शब्दांनी त्यांच्या जीवनकार्याचे मर्म थोडक्यात सांगता येते.

अनुक्रमणिका

# १७. कळस झालेसे कार्य!

बार्शीला कॉलेज काढणं हे हत्ती पोसण्यासारखं आहे. पण आपणाला कॉलेजशिक्षणाची इच्छा असूनही ते घेता आले नाही. मग खेड्यापाड्यांतील गोरगरिबांच्या मुलांना मॅट्रिक झाल्यावर शहरात जाऊन महागडे उच्च शिक्षण घेणे कसे शक्य होईल? आपणावरून जग ओळखावे. त्यासाठी बार्शीत कॉलेज तर काढले पाहिजे, असे मामांना वाटू लागले. त्या तिरीमिरीत त्यांनी १९५८ साली संस्थेचे बार्शीला कॉलेज काढण्यासाठी पुणे विद्यापीठाकडे अर्जही केला. पण आर्थिक चणचणीमुळे त्यांनी त्या बाबीचा पाठपुरावा केला नाही. दरम्यानच्या काळात पंढरपूर, बार्शी आणि उस्मानाबाद या ठिकाणी संस्थेतर्फे महाविद्यालये काढावीत, असा विचार पुढे आला. त्यासाठी त्या त्या ठिकाणच्या स्थानिक लोकांनी नियोजित महाविद्यालयांसाठी लागणाऱ्या खर्चाच्या निम्म्या रकमेची तरतूद करावी, हा प्रस्ताव घेऊन ते स्वतः, श्री. अंबादास पाटील आणि श्री. रा. गे. शिंदेगुरुजी यांनी पंढरपूराला जाऊन कैकाडीमहाराजांची भेट घेतली. चर्चा केली. पण ही योजनाही कार्यान्वित होऊ शकली नाही.

त्यावेळी कर्मवीर मामांचे काही विद्यार्थी सातारला कर्मवीर आण्णांच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये 'कमवा आणि शिका' योजनेत राहून उच्च शिक्षण घेत होते. त्यापैकी श्री. व. न. इंगळे हा हुशार विद्यार्थी तेथे शिकत होता. तसेच कर्मवीर मामांचे भाचे श्री. प्र. ब. चव्हाण हेही त्या कॉलेजात वनस्पतीशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते. १९५९ साली सप्टेंबर महिन्यातील एके दिवशी प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील हे पुणे विद्यापीठाच्या बैठकीहून परत आले. बार्शी येथे कॉलेज काढण्यासाठी दुसऱ्याच एका संस्थेचा अर्ज विद्यापीठाकडे आला होता. मात्र कर्मवीर मामांच्या स्थानिक संस्थेचा अर्ज आला नव्हता. ही गोष्ट त्यांना खटकली. त्यांनी श्री. इंगळे आणि प्रा. चव्हाण यांना बोलावून घेतले. 'बार्शीला मामांच्या संस्थेचे कॉलेज निघाले पाहिजे.त्यासाठी मामांना अर्ज करायला सांगा' असे सांगितले. तेव्ही श्री. इंगळे यांनी संस्थेचे पदाधिकारी श्री. अंबादास पाटील यांना 'बार्शीत ज्ञानाच्या मंदिराचा पाया मामांनी भरला आहे. तेव्हा कॉलेज काढून त्यावर कळसही त्यांनीच चढवावा' अशा अर्थाचे पत्र लिहिले. प्रा. चव्हाण बार्शीला आले. त्यांना प्रथम कॉलेज काढण्याबाबत मामांकडून प्रतिसादच मिळाला नाही. पण दुसऱ्याच दिवशी येडशीच्या शिक्षकांच्या बैठकीत कॉलेज काढण्याची गरज साऱ्यांनी बोलून दाखवली आणि त्यासाठी पैसा जमा करण्याचीही तयारी दर्शविली. तेव्हा मामा म्हणाले, “तुम्ही एक हात उडी मारली तर मी चार हात उडी मारीन.” बैठकीत यासाठी प्रा. चव्हाण आणि प्रा. मुठाळ (शिंतोळे) यांची समिती नेमली. प्रा. चव्हाणांनी सातारच्या कॉलेजमधील प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला आणि ते संस्थेच्या महाराष्ट्र विद्यालयात सहशिक्षकाचे काम करीत करीत कॉलेजच्या पूर्वतयारीला लागले.

संस्थेचे बार्शीला कॉलेज काढण्यासाठी पुढे विद्यापीठाकडे अर्ज केला. पाहणी करणारी विद्यापीठाची समिती आली. त्यांच्या स्वागतास खा. सोनवणे, खा. तु. सु. जाधव, गणपतराव साठे आणि पंढरपूरचे खा. मोरे हे मामांच्या विनंतीनुसार उपस्थित राहिले. नवीन कॉलेज काढणाऱ्या संस्थेने आपल्या पासबुकात एक लाख रुपये जमा असल्याचे दाखवणे जरूर होते. कार्यकर्त्यांनी ठेवी ठेवल्या. उपाध्यक्ष श्री. टी. बी. जगदाळे यांनी आपली पन्नास हजार रुपयांची ठेव संस्थेत ठेवली होती. विद्यापीठ समितीने हे सारे पाहिले. समिती सदस्यांच्या स्वागतासाठी जमलेल्या वरील पुढाऱ्यांनी मामांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करणारी भाषणे केली. पाहणी समितीने बार्शीला कॉलेज काढायला मामांच्या संस्थेचा अर्ज पुणे विद्यापीठाकडे शिफारस करून पाठवला. विद्यापीठाने त्या शिफारशीवर शिक्कामोर्तब केले. बार्शीला १८ जून १९६० रोजी 'श्री शिवाजी महाविद्यालय' या कॉलेजचे उद्‌घाटन त्या वेळचे महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री

ना. बाळासाहेब देसाई यांचे हस्ते पार पडले. तसेच या कॉलेजच्या इमारतीचा कोनशिला समारंभही त्यांच्याच हस्ते २९ मे १९६५ रोजी पार पडला. कर्मवीर मामांनी उभारलेल्या ज्ञानमंदिरावर सोन्याचा कळस चढला.

कालांतराने हे महाविद्यालय बी.ए., बी.एस्.सी. आणि बी.कॉम. पदव्यांपर्यंत शिक्षण देणारे परिपूर्ण कॉलेज झाले. १९७२ पासून या महाविद्यालयात पदव्युतर एम.ए.चे वर्गही सुरू झाले. या महाविद्यालयात सध्या ज्युनिअर कॉलेजचे, व्होकेशनल आणि किमान कौशल्याचेही वर्ग सुरू आहेत. सुरुवातीला या महाविद्यालयात २५० विद्यार्थी होते. तर हल्ली ती संख्या पाच हजारावर गेली आहे. या कॉलेजची भव्य इमारत आणि कर्मवीर मामांचा ध्येयवाद आणि शिस्त तेथे असल्याने हे कॉलेज प्रगतीचे विविध टप्पे ओलांडून पुढे जात आहे. हे महाविद्यालय म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील ‘राजाराम कॉलेज’ बनले आहे.

बार्शी औद्योगिक शहर बनविण्यात श्री. भगवंत पंढरीनाथ ऊर्फ काकासाहेब सुलाखे यांचा मोठा वाटा होताच. त्याचबरोबर शिक्षणक्षेत्रातही ते काम करायचे. त्यांच्या ‘बार्शी एज्युकेशन सोसायटी’तर्फे चालविलेल्या ‘सुलाखे हायस्कूल’ची गणना महाराष्ट्रातील आदर्श हायस्कूलमध्ये केली जात होती. बार्शीतील मामांच्या कॉलेजचा विकास व्हावा म्हणून त्यांनी कर्मवीर मामांच्या संस्थेला ५५ हजार रुपयाची भरीव देणगी दिली. या निमित्ताने बार्शीच्या शिक्षणक्षेत्रात गुरुशुक्राची युती झाली. भावी शैक्षणिक प्रगतीची ती प्रसादचिन्हं ठरली.

१४ नोव्हेंबर १९६५ चा नेहरू जयंतीचा दिवस. त्याच दिवशी बार्शी नगरपालिकेच्या शताब्दीमहोत्सव-निमित्त आलेल्या मा. श्री. विनायक पाटील (पुढे ते महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री झाले) यांच्या अध्यक्षतेखाली त्या वेळचे पुणे विद्यापीठाचे कुलगुरु पद्मविभूषण डॉ. हरीभाऊ पाटसकर यांच्या शुभहस्ते श्री शिवाजी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेला श्री भगवंतराव पं. सुलाखे यांचे नाव देण्यात आले. तसेच कै. बाळासाहेब सुलाखे यांचे नाव महाविद्यालयातील एका वर्गास देण्याचाही कार्यक्रम श्रीमान कांतीलालभाई नानजीभाई मधवाणी यांच्या शुभहस्ते पार पडला.

सदर बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज हे वाणिज्य शाखेचे एक स्वतंत्र कॉमर्स कॉलेज म्हणून १ जून १९६९ पासून अस्तित्वात आले. या कॉमर्स कॉलेजमध्ये हल्ली ज्युनिअर कला—वाणिज्य विभाग, व्होकेशनल आणि किमान कौशल्याचे पाच अभ्यासक्रम, बी. कॉम.एम.कॉमचे वर्ग आणि ‘कर्मवीर संगणक प्रशिक्षण केंद्र’ भरभराटीला आले आहे.

कर्मवीर जगदाळेमामांनी खेड्यापाड्यांतून माध्यमिक विद्यालये सुरू केली. त्या विद्यालयात प्रशिक्षित पदवीधर मिळेनात म्हणून त्यांनी बार्शीला बी.एड्. कॉलेज जून १९६६ पासून सुरू केले. पुढे याच महाविद्यालयात बी. एड्. बरोबर बी.पी.एड्.चा अभ्यासक्रम सुरू झाला. बी.एड्-बी.पी.एड् हे दोन्ही अभ्यासक्रम एकाच महाविद्यालयात शिकवणारे हे कर्मवीर मामांचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय महाराष्टात एकमेव असे आहे. या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बी.एड्, बी.पी.एड्, एम्.एड्, एम.पी.एड्चेही वर्ग सुरू आहेत. सोलापूर जिल्ह्याची शैक्षणिक प्रयोगशाळा म्हणून या महाविद्यालयाकडे पाहिले जाते.

एखादे नवीन कॉलेज सुरू करायचे म्हणजे संस्थाचालक कमीतकमी तालुक्याच्या गावची तरी निवड करीत. पण कर्मवीर मामा हे जगावेगळे शिक्षणसंस्था चालक. त्यांनी भूम तालुक्यातील वाशी या

अनुक्रमणिका

गावाची निवड केली. (नुकतेच हे तालुक्याचे गाव झाले आहे). तेथे त्यांनी कला आणि वाणिज्य महाविद्यालय सुरू करण्याचे ठरविले. या कॉलेजला वाशीच्या ग्रामस्थांनी हट्टाने कर्मवीर मामांचे नाव दिले. जून १९७२ पासून हे कॉलेज सुरू होणार होते. संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. व. न. इंगळे यांची प्राचार्य म्हणून नेमणूक झाली. मे महिन्यात या कॉलेजसाठी गावातून देणग्या मिळविण्यासाठी ते वाशीला जायला निघण्यापूर्वी कर्मवीर मामांचे आशीर्वाद घ्यायला गेले. तेव्हा मामा जवळ बसलेल्या सद्‌गृहस्थाला म्हणाले, "या दुष्काळात आम्ही वाशीला नवे कॉलेज सुरू करीत आहोत. तेथे वादळात दिवा लावायला हा इंगळे निघाला आहे." कर्मवीरांचे हे शब्द किती सार्थ होते याचा पुढे सर्वांना अनुभव आला.

मे १९७२ च्या तिसऱ्या आठवड्यात जवळ जवळ नऊ हजार रुपयांच्या देणग्या गोळा झाल्यानंतर प्राचार्य इंगळे बार्शीला आले. प्राध्यापक आणि प्राध्यापकेतरांच्या नेमणुका झाल्या. एवढ्यात दुष्काळग्रस्त परिस्थितीच्या वादळात दुसरं वादळ उभं राहिलं. शासनाचे वाशीच्या कॉलेजला परवानगी नाकारल्याचं पत्र येऊन थडकलं. धावाधाव झाली. मराठवाड्यातील अशा बऱ्याच नव्याने सुरू होणाऱ्या महाविद्यालयाची परवानगी शासनाने नाकारली होती. तेव्हा कुलगुरू श्री. नाथ यांच्या नेतृत्वाखाली संस्थाप्रमुख आणि प्राचार्यांचं शिष्टमंडळ मा. मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांना भेटलं. अखेर ६ जून १९७२ रोजी मुख्यमंत्र्यांनी अकरा महाविद्यालयांना जून १९७२ पासून मंजुरी दिल्याची घोषणा केली.

या कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयाचा नामकरणविधी आणि उद्‌घाटन समारंभ १७ जुलै १९७२ रोजी भूमचे श्री. अमरसिंह थोरात यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे त्या वेळचे कुलगुरू श्री. रे. प. नाथ यांचे शुभहस्ते झाला.

हे महाविद्यालय बी.ए आणि बी.कॉम या पदव्या अभ्यासक्रमाचे परिपूर्ण कॉलेज झाले. या कॉलेजात ज्युनिअर कला वाणिज्य आणि किमान कौशल्याचे वर्गही सुरू झाले. पुढे बी.एस्सी. पदवी अभ्यासक्रम शिकविण्याचीही तेथे सोय झालेली आहे. हां हां म्हणता कॉलेजच्या विविध इमारती डौलाने उभ्या राहिल्या. आता हे कॉलेज खेड्यातले कॉलेज वाटत नाही. या कॉलेजमुळे वाशी हे गाव ज्ञानाचे काशीक्षेत्र झाले आहे.

'कायदा गाढव असतो' असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. त्याची माहिती असणे गरजेचे असते. म्हणून कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी १९७२ च्या दुष्काळाच्या वर्षारंभी 'राजर्षी शाहू इव्हिनिंग लॉ कॉलेज' बार्शीला सुरू केले. अशा लॉ कॉलेजला इतर महाविद्यालयांप्रमाणे सरकारी अनुदान मिळत नव्हते. विद्यार्थ्यांकडून मिळणारी फी आणि संस्थेकडून मिळणारे अर्थसाहाय्य यावर हे कॉलेज कसेबसे चालत होते.पदवीनंतर तीन वर्षाचा कायद्याचा अभ्यासक्रम येथे शिकवला जात असे. त्याच्या जोडीला बारावीनंतरचा पाच वर्षांचा कायद्याच्या अभ्यासक्रमही या कॉलेजात सुरू झालेला आहे. थोड्याच वर्षांपूर्वी अशा कायद्याच्या महाविद्यालयांना शासनाने इतर महाविद्यालयांप्रमाणे अनुदानावर आणले आहे. त्यामुळे हे कॉलेज प्रगतिपथावर मार्गक्रमण करू लागले आहे. नुकतीच या 'राजर्षी शाहू लॉ कॉलेज'ची दोन मजली इमारत संस्थेने बांधून पूर्ण केली आहे.

अशा प्रकारे विविध महाविद्यालयांच्या स्थापनेमुळे खेड्यापाड्यांतील विद्यार्थ्यांना आणि प्रामुख्याने विद्यार्थिनींना उच्च शिक्षण मिळणे सुलभ आणि सहजशक्य झाले आहे. या महाविद्यालयांच्या उभारणीमुळे कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांचे कार्य गौरवशाली झाले आहे.

अनुक्रमणिका

# १८. उद्योगाचे घरी । रिद्धी सिद्धी पाणी भरी ॥

भारत हा कृषीप्रधान देश. शेतकरी सर्व जगाचा अन्नदाता. तो तर दुःखाच्या दरीत पडलेला. दारिद्र्य, अज्ञान आणि अंधश्रद्धेत बुडालेला. त्यांच्यासाठी तर कर्मवीर मामांनी शिक्षणप्रसाराचं काम हाती घेतलेलं. शेतकरी श्रमजीवीवर्गाप्रमाणेच संस्थेची आर्थिक स्थिती! संस्थेची आर्थिक स्थिती तर सुधारली पाहिजे. त्यासाठी स्वावलंबनाची कास धरली पाहिजे, ही मामांची विचारप्रणाली.

बोर्डिंगमधील विद्यार्थी खेड्यातून आलेले. त्यांना शेतीच्या कामाची माहिती आणि आवड. पण आधुनिक पांढरपेशी परीटघडी शिक्षणपद्धतीमुळे ते श्रमापासून दूर चाललेले. ते थांबविण्यासाठी कर्मवीर मामांनी त्यांना कष्टाची कवचकुंडले दिली. स्वावलंबनाचा धडा दिला. स्वाभिमानाची अस्मिता बहाल केली. बोर्डिंगमध्ये श्रम आणि ज्ञान हातात हात घालून चालू लागले. त्यांचा 'कामात राम' शोधण्याचा मंत्र रुजावा म्हणून मामांनी संस्थेत शेतकी फार्म सुरू केले. विद्यार्थ्यांनी शेतीत श्रमदानाने विहिरी खोदल्या. ताली टाकल्या. ज्वारी—गव्हाची हिरवीगार शेती पिकविली. भाजीपाला बहरला. विविध फुले फुलली. माळरानाचे रूपांतर मळ्यात होऊ लागले.

संस्थेच्या शेतात नवनवे प्रयोग होऊ लागले. हे प्रयोग संस्थेला स्वावलंबी बनविण्यास जसे उपयोगी पडले. तसे खेड्यातील शेतकऱ्यांना आदर्शभूत ठरले. त्यांनीही असे प्रयोग करावेत ही मामांची दृष्टी. मामांनी संस्थेच्या शेतात निरनिराळ्या भाजीच्या रोपांचे वाफे लावले. मिरची, टॉमेटो, वांगी इत्यादी रोपे दर्जेदार म्हणून शेतकरी त्यावर नंबर लावून नेऊ लागले. कर्मवीर मामांनी आपल्या शेतात ज्वाला मिरची, ज्वारी, बटाटा यांचे सीड प्लॉट्स श्री. भोसले—पाटील या शेतकी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केले. हे प्रयोग पाहून शेतकऱ्यांना प्रेरणा मिळू लागली. तेही आपल्या शेतीत सीड प्लॉट्स करून आर्थिकदृष्ट्या सुधारू लागले. पुढे तर महाराष्ट्र शासनाने फळबागा लागवडीसाठी अनुदाने देण्यास सुरुवात केली. द्राक्षे, मोसंबी, बोर, डाळिंबे, चिक्कू—सीताफळीच्या बागा होऊ लागल्या. उसाबरोबरच या फळबागांनी देशात आपले वैशिष्ट्य प्रस्थापित केले.

गरीब शेतकऱ्यांना केवळ शेतीवर अवलंबून स्वावलंबी होता येणार नाही, हे मामांनी ओळखले. शेतीबरोबर शेतीला पूरक जोडधंदे शेतकऱ्यांनी सुरू केले पाहिजेत हा मामांचा आग्रह. त्यांनी संस्थेत शेती—फार्मच्या जोडीला पोल्ट्रीफार्महीं सुरू केले. बोर्डिंगमधील गरीब मुलांना पोल्ट्रीच्या प्रशिक्षणास पाठवून तयार केले. या पोल्ट्रीफार्ममधील अंड्याच्या उत्पादनाचा संस्थेच्या आर्थिक परिस्थितीला हातभार लागू लागला. पोर्ट्रीफार्ममधील कोंबड्यांची देखभाल बोर्डिंगचे विद्यार्थी करू लागले. जेथे कोंबड्यांची खुराडी असत तेथे मामांनी शेवग्याची झाडे लावली. या झाडामुळे शेवग्याच्या शेंगांची भाजी बोर्डिंगमध्ये होऊ लागली. तर कोंबड्यांची इवलीइवली पिल्ले घारी—गिधाडांच्या शिकारीपासून वाचायची. पुढे अनेकांनी मोठ्या प्रमाणावर पोल्ट्रीफार्म्स सुरू केले.

पोल्ट्रीफार्मसोबत कर्मवीर मामांनी आपल्या संस्थेत डेअरी फार्महीं सुरू केले. १९५६ साली त्याचे रूपांतर 'धेनू संवर्धन केंद्रा'त झाले. शेतकऱ्याच्या घरात वाढलेल्या मामांना गाई, बैल, म्हशी यांची जात्याच आवड आणि जिव्हाळा. बोर्डिंग सुरू करण्यापूर्वी त्यांना म्हशी पाळून दुधाचा धंदाही सुरू केला होता. संस्थेच्या या धेनू संवर्धन केंद्रात गीर आणि खिलाऱ्या जातीच्या गाईंचा भरणा जास्त होता. गाई—बैलांची उत्तम पैदास व्हावी म्हणून त्यांनी दोन वळूही खरेदी केले. या साऱ्या मुक्या मनांची देखभाल ते स्वतः

अनुक्रमणिका

करीत. मामांची जनावरांवरील माया इतकी बोलकी होती की जनावरं त्यांना पाहून हंबरत जवळ यायची. त्यांचे हात चाटायची. जगातील मग्रूर आणि मानभावी पशूवृत्ती माणसात प्रकर्षाने पसरत चाललेली पाहून मामा गाईगुरांत माणुसकीचा झरा पाहायचे. ते म्हणत, "माणसापेक्षा मला ही जनावरे अधिक आवडतात. कारण जनावरांच्या पाठीवर हात फिरवला तर ती माणसांना ओळखतात, पण माणसांच्या काळजावरून जरी हात फिरवला तरी माणूस माणसाला ओळखत नाही."

धेनू संवर्धन केंद्रातील 'सरदार–महालवार' ही जातिवंत खिल्लारी बैलजोडी. हे मामांचे वैभव होते तर 'जयश्री' ही गाय त्यांची कामधेनू होती. या गाईगुरांसाठी कर्मवीर मामांनी भव्य असा स्लॅबचा गोठा बांधला. दगडी फरशी केली. गव्हाण बांधली. जनावरांना सतत हिरवा चारा मिळावा म्हणून शेतात आलटून पालटून कडवळाचे प्लॉट्स लावण्याची परंपरा सुरू केली.

गाईबैलांप्रमाणे मामांचा बोर्डिंगमधील कुत्र्याचाही लळा लागलेला. त्या कुत्र्याला झालेली जखम धुवायला, औषध लावायला तो कुत्रा कुणालाच जवळ येऊ देत नसे. पण मामा आले म्हणजे तो गरीब गाय बने. मग मामाच त्याच्यावर उपचार करीत. म्हणूनच कवी श्री. व. न. इंगळे आपल्या 'नतमस्तक मम होते' या कवितेत उत्स्फूर्तपणे खालील ओळी लिहून जातात –

*मनकवडा हा मुक्या मनाचा*
*बालमुलांचा पिताच साचा*
*झरा अंतरी मऊ मायेचा*
*मायभूमीशी इमान राखे,*
*जडे प्रभूशी नाते... नतमस्तक मम होते*

समाजातील विविध क्षेत्रांत चाललेल्या दलाली आणि मक्तेदारी विरुद्ध मामांनी पहिल्यापासून आवाज उठवला. दलाली व मक्तेदारी नष्ट करण्याचे उपायही जारी केले. त्याचे उदाहरण म्हणजे बार्शीत त्यांनी सुरू केलेले भाजीपाल्याचे दुकान. विद्यार्थ्यांना रास्त आणि स्वस्त दरात शालेय साहित्य मिळावे म्हणून त्यांनी सन १९५४ साली बार्शीला 'श्री शिवाजी विद्यार्थी वस्तू भांडार' आणि येडशीला 'सुभाष विद्यार्थी वस्तू भांडार' विद्यार्थ्यांच्या मदतीने चालविले, तर १९५६–५७च्या महागाईच्या काळात बार्शीला दोन, येडशीला एक आणि काटेगावात एक अशी चार स्वस्त धान्याची दुकानेही चालविली. त्या काळात धान्य खपविण्याच्या बाबतीत कर्मवीर मामांच्या संस्थेतर्फे चालणाऱ्या स्वस्त धान्य दुकानाचा सोलापूर जिल्ह्यात पहिला नंबर आलेला होता.

बार्शी ही प्रसिद्ध व्यापारी पेठ. अनेक व्यापाऱ्यांच्या आडत दुकानांनी गजबजलेली. पण या आडत दुकानातून व्यापारी शेतकऱ्यांची सतत पिळणूक, अडवणूक करीत. दलालांकडून तर राजरोस अन्याय चाललेला. हे सारे थांबविण्यासाठी कर्मवीर मामांनी संस्थेचे 'विद्यार्थी ज्ञानविकास आडत दुकान' सुरू केले. व्यवहार चोख व्हावेत, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावेत म्हणून त्यांनी संस्थेच्या आडत दुकानातील नियम कडक केले. या आडत दुकानात त्यांची दररोज फेरी असे.

कर्मवीर मामांचे स्वावलंबन कमालीचे मनस्वी होते. दररोज निर्माण होणाऱ्या गरजेतून नवनवे उद्योग त्यांनी संस्थेमार्फत सुरू केले. धान्य दळण्याची पिठाची गिरणी, जनावरांसाठी कडब्याची कुटी

अनुक्रमणिका

करण्याचे यंत्र, संस्थेच्या इमारत बांधकामासाठी विटा आणि चुन्याची भट्टी, चुना मळण्याची घाणी ही त्याचीच उदाहरणे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकत शिकत कमवता येऊ लागले. पालकांवरील खर्चाचा भार कमी होऊ लागला आणि विद्यार्थी स्वावलंबी आणि स्वाभिमानी बनू लागले.

संस्थेचा व्याप वाढला तसा छपाईचा खर्चही वाढला. संस्थेची पावतीपुस्तके, कीर्द–खतावण्या, जाहिराती, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, वह्या, नियतकालिके इत्यादी बाबींवरचा भरमसाठ खर्च कमी करण्यासाठी मामांनी ५ एप्रिल १९६२ पासून बार्शीला संस्थेतर्फे 'छत्रपती मुद्रणालय' सुरू केले. या छापखान्यासाठी त्यांनी गुळओळ रस्त्यावरील आपली दोन मजली इमारत संस्थेस विनामूल्य दिली. संस्थेचे 'मकरंद' हे नियतकालिक त्यांनी सुरू केले. साप्ताहिक 'जीवनसंग्राम' याच छापखान्यातून छापून घेतले जाई. एका ट्रेडलपासून सुरू झालेल्या या छत्रपती मुद्रणालयाचा व्याप आता खूप वाढला आहे. हल्ली तेथे कॉम्प्यूटर कंपोझिंग आणि ऑफसेट प्रिंटिंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

'विना सहकार नहीं उद्धार' या वचनाचाही मामांना विसर पडला नव्हता. 'एकमेकां साह्य करूं। अवघे धरूं सुपंथ॥' हे तर त्यांनी निवडलेले संस्थेचे ब्रीद वाक्य! संस्थेतील सेवकांच्या सोयीसाठी त्यांनी २८ फेब्रुवारी १९५७ रोजी 'श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ एम्प्लॉईज को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.,बार्शी ही शाखा सुरू करण्यास प्रेरणा दिली. मदत केली. याच पद्धतीने त्यांनी संस्थेच्या सेवकांची ग्राहक सोसायटी सुरु करण्यास उत्तेजन दिले.तसेच सेवकांच्या घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी 'कर्मवीर हौसिंग–सोसायटी', बार्शी'ची स्थापना केली. त्यासाठी लागणारी जमीन खरेदी करण्यापासून ते सेवकांना घरे बांधून देण्यापर्यंत सर्व कामात त्यांनी जातीने लक्ष घातले.

संस्थेतर्फे उद्योग–व्यवसायाच्या शाखा सुरू करण्यामागील मामांचा उद्देश मोलाचा आणि मूलगामी होता. उद्योगधंद्यातील मक्तेदारी संपविणे, विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या धंद्याचे प्रशिक्षण मिळावे आणि पुढे त्यांच्यातून कारखानदार निर्माण व्हावेत, हे त्यांचे विचार. 'विद्यार्थ्यांनी कारकून होण्यापेक्षा कारखानदार बनावे' असे ते नेहमी सांगत. पुस्तकी शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना व्यवहारी आणि जीवनोपयोगी शिक्षण मिळावे, ही तर त्यांची तळमळ होती. या मामांच्या उद्दिष्टांची मोठ्या प्रमाणावर पूर्ती भारती विद्यापीठ, पुणे या संस्थेचे संस्थापक मा. ना. डॉ. पतंगरावजी कदम यांनी आपल्या संस्थेत केलेली दिसून येते.

कर्मवीर मामासाहेबांनी उद्योग–व्यवसायाच्या शाखा सुरू करून शिक्षणक्षेत्रात एक नवा प्रयोग सुरू केला. महाराष्ट्र शासनालाही या उद्योग–व्यवसाय शिक्षणाचे महत्त्व पटले. त्यांनी व्होकेशनल, किमान कौशल्याचे अभ्यासक्रम चालू करणाऱ्या संस्थांना अनुदाने देण्याचे धोरण स्वीकारले. त्यानुसार बार्शीला 'बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज'मध्ये व्यापारउद्योगाचे, 'महाराष्ट्र उच्च विद्यालया'त तंत्रज्ञानाचे आणि 'श्री शिवाजी महाविद्यालया'त पॅरामेडिकल आणि इलेक्ट्रॉनिकचे अभ्यासक्रम सुरू झाले. येडशी आणि वाशी येथील अनुक्रमे 'जनता विद्यालय' आणि 'कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात'ही असे अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. तांत्रिक शिक्षणासाठी स्वतंत्र तंत्रनिकेतन (पॉलिटेक्निक) सुरू केले आहे. विविध महाविद्यालयांतून संगणकाचे सरकारमान्य अभ्यासक्रमही चालू झाले आहेत. संगणकाच्या अत्याधुनिक शिक्षणासाठी, संगणकाचे ज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी संस्थेने 'कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी'चा मोठा पाच कोटींचा प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जन्मशताब्दी वर्षात (२००२–२००३) पूर्ण होणार आहे. एकविसाव्या शतकात खेड्यापाड्यांतील लोकांना ताठ मानेने जगता यावे त्यासाठी हा प्रकल्प प्रयत्नशील राहणार आहे.

अनुक्रमणिका

## १९. संस्थेत आदर्श शिक्षकांसोबत मजुरांचे,वीरपत्नींचे सत्कार!

पूर्वी तीन बोटांनी काम करणाऱ्यांची समाजात प्रतिष्ठा होती. आत दहा बोटांनी काम करणाऱ्यांची प्रतिष्ठा वाढली पाहिजे, हा कर्मवीर मामांचा आवडता सिद्धान्त! आज जगात सत्ता आणि संपत्तीधारकांचा सारेजण उदोउदो करतात. त्यांचे भकपेबाज सत्कारही सतत होत असतात. लोक कळसाला नमस्कार करतात, पण पायातील दगडांना विसरून जातात. अशा स्थितीत प्रामाणिकपणे काम करणाऱ्या गरीब मजुरांचे सत्कार कोण करणार? ही खंत मामांच्या मनात नेहमीच खदखदत असे. कर्मवीर मामांच्या विचारात आणि आचारात एकवाक्यता होती. त्यांनी आपल्या संस्थेत प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि तळमळीने काम करणाऱ्या गरीब मजुरांचे सत्कार करण्याची नवी जगावेगळी परंपरा निर्माण केली. वडार, पाथरवट, गवंडी ह्या श्रमजीवी लोकांबद्दल त्यांना कमालीची आस्था आणि आपुलकी होती. दिवसभरातील बराचसा वेळ ते त्यांच्यात निःसंकोचपणे मिळून मिसळून राहत. त्यांच्या श्रमाचे योग्य फळ त्यांना मिळाले पाहिजे, यावर त्यांचा भारी कटाक्ष असे. संस्थेच्या कार्यकर्त्यांचा विद्यार्थ्यांसह फोटो काढताना ते मजूर, स्वयंपाकी स्त्रियांना कधीच विसरत नसत.

केवळ पदव्यांनी माणूस मोठा होतो, यावर मामांचा मुळीच विश्वास नव्हता. ज्ञान हे केवळ चार भिंतीच्या आत मिळते, ही कल्पनाही त्यांना मान्य नव्हती. ज्ञान हे जगाच्या शाळेत मिळते, अनुभवच्या शिक्षकाकडून मिळते ही त्यांची धारणा. म्हणून उत्पादनाचे काम करणाऱ्या श्रमजीवीवर्गाचे महत्त्व त्यांना वाटे. म्हणूनच त्यांना त्यांचे सत्कार करावेसे वाटले. या संदर्भात प्राचार्य व. न. इंगळे आपल्या एका कवितेत म्हणतात,

*जीवनाला सामोरे जा...*
*क्षणाक्षणाला ज्ञानाचा नवा कोंब उगवत असलेला दिसेल*
*पण पदवीधारकच तेवढा बुद्धिवंत—विचारवंत*
*हे ढोंग कशासाठी?*
*दि लोलीएस्ट आर दि मोस्ट इन्टेलिजंट*
*दि एलिटी दि मोस्ट इग्नरंट*

असे मावोचे मत आहे. या मताचा मागोवा घेत मामांनी संस्थेत मजुरांचे सत्कार घडवून आणले.

२८ नोव्हेंबर १९५४ हा महात्मा फुले यांचा पुण्यतिथी दिवस. त्या दिवशी बार्शी येथील इमारतीचे उद्‌घाटन कर्मवीर ना. भाऊसाहेब हिरे (त्या वेळचे मुंबई राज्याचे महसूलमंत्री) यांच्या हस्ते झाले. त्याच कार्यक्रमात ना. हिरे यांच्या शुभहस्ते संस्थेच्या इमारती उभा करणाऱ्या मजुरांचे, श्री. मोकिंदा नागू जाधव (वडार) आणि श्री. नारायण बापू बोरगावकर (गवंडी) यांचे शेला—पागोटे बहाल करून सत्कार करण्यात आले. असाच मजुरांचा सत्कार १४ जानेवारी १९६४ रोजीही मामांनी घडवून आणला. मकरसंक्रांतीच्या शुभदिनी महाराष्ट्राचे त्या वेळचे मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांच्या शुभहस्ते ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतीचे उद्‌घाटन झाले. त्याच वेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री. मोकिंदा जाधव वडार, श्री. रामा पाथरूड आणि श्री. नारायण बापू बोरगावकर (गवंडी) यांना संपूर्ण पोशाखाचा आहेर करून त्यांचा सत्कार करण्यात आला. 'ज्यासि अपंगिता नाही। त्यासी धरी जो ह्रदयी। तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा' या संतोक्तीचा खरा अर्थ या प्रसंगाने स्पष्ट झाला आणि त्यातच कर्मवीर मामांचे मोठेपण सिद्ध होते.

अनुक्रमणिका

स्त्रियांच्या दुःस्थितीबद्दलही कर्मवीर मामांचे अंतकरण तीळतीळ तुटत असे. वर्षाला पगारवाढ, महागाईवाढ मागणाऱ्या प्राध्यापकांना एकदा त्यांनी सुनावले, "तुमच्या घरी धुणेभांडी करणाऱ्या मजूर स्त्रियांना तुम्ही पगार वाढ आणि महागाईवाढ देता का? तो दिला तरच तुम्हाला तो मागण्याचा नैतिक अधिकार आहे." संस्थेच्या वसतिगृहातून स्वयंपाक करणाऱ्या मुलांना त्यांनी मोफत शिक्षण देण्याचे प्रथमपासून धोरण राबविले. शिवाय अशा स्त्रियांना वरखर्चासाठी पगार देण्याची प्रथा सुरू केली. विधवा, परित्यक्ता, अनाथ स्त्रियांना स्वावलंबी बनविण्यासाठीच त्यांनी 'जिजामाता स्मारक मंदिर' उभे केले.

१९६५ साली पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले. त्यात अनेक जवानांनी प्राणाची बाजी लावून विजयश्री खेचून आणली. या युद्धाच्या लाहोर आघाडीवर लढताना बार्शी तालुक्यातील पानगाव या गावचे सुभेदार श्री. दि. ह. चव्हाण आणि जवान श्री. अ. भि. पवार या दोघांना वीरमरण आले. त्यांच्या विधवा झालेल्या श्रीमती भागीरथीबाई दि. चव्हाण आणि श्रीमती राहीबाई अ. पवार या वीरपत्नी मात्र दारिद्र्यात पिचत होत्या. तसेच सन १९३० च्या सोलापूरच्या मार्शल लॉच्या वेळी फांसावर लटकलेल्या श्री. जगन्नाथ शिंदे यांच्या पत्नी श्रीमती पारूबाई ऊर्फ राहीबाई शिंदे यांच्यावर स्वातंत्र्याच्या काळात रानात शेंगा वेचून पोट भरण्याची पाळी आली होती. या तीनही वीरपत्नींना मदत करण्याचे मामांनी ठरविले. 'श्री शिवाजी महाविद्यालया'च्या स्नेहसंमेलन प्रसंगी विविध गुणदर्शन आणि भोजनावर खर्च होणारी रक्कम संरक्षण निधीला देण्याचा विचार त्यांनी प्राचार्य आणि स्नेहसंमेलन प्रमुखांच्या गळी उतरवला. त्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे पुण्याचे मेजर शंकरराव चाफेकर यांच्या शुभहस्ते २६ फेब्रुवारी १९६६ रोजी वरील तीनही वीरपत्नींचा साडीचोळी आणि प्रत्येकी एकशे एक रुपये देऊन सत्कार गौरव करण्यात आला.

प्रमुख पाहुणे मेजर चाफेकर आपल्या भाषणात म्हणाले, "कर्मवीर मामासाहेबांनी हा जो वीरपत्नींचा सत्कार केला आहे, तो खरोखरच कुणाच्याही हृदयाला भिडणारा सत्कार आहे. जनतेपुढे आदर्श उदाहरण म्हणून ठेवावे, असा हा सत्कार आहे. तसेच कर्मवीर मामासाहेबांच्या जिजामाता स्मारक मंदिराच्या कल्पनेने तर अशा स्त्रियांच्या उद्धाराच्या मुळालाच हात घातला गेला आहे. या कल्पनेस योग्य ते खतपाणी घातले पाहिजे."

वाशी (जि. उस्मानाबाद) येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलन प्रसंगी मामांनी 'जय जवान, जय किसान' या घोषणेनुसार श्री. गोरख हुंबे (फ्लाईट लेफ्टनंट) आणि प्रगतिशील शेतकरी श्री. जगताप यांचा सत्कार घडवून आणला.

कर्मवीर मामासाहेब जगदाळे हे खरेखुरे समाजशिक्षक होते. शाळाकॉलेजातील शिक्षकांनीही समाजपरिवर्तन करण्यासाठी कटिबद्ध असले पाहिजे. चार भिंतीत राहून विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षण देऊन भागणार नाही तर चार भिंतीबाहेरील विशाल जीवनातील शेतकरी, कामकरी आणि स्त्रियांना ज्ञानाचा तिसरा डोळा देण्याचे पवित्र कामही त्यांनी करावे, असे त्यांचे आग्रही पतिपादन असे. म्हणूनच ५ फेब्रुवारी १९६६ रोजी महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कृत केलेल्या श्री. वा. ज. खेर (सुलाखे हायस्कूल बार्शी मुख्याध्यापक) आणि श्री. म. म. फडके (सांगोला शाळेचे तालुका मास्तर) या दोघांचा सत्कार मामांनी संस्थेच्या प्रांगणात घडवून आणला.

शेतकरी, कामकरी आणि ज्ञानकरी (शिक्षक, विद्यार्थी) ही क्रांती करणारी त्रिमूर्ती असल्याचे कर्मवीर मानीत. म्हणून शेतातून काम करणारे शेतकरी, शेतमजूर, गिरण्यातून कष्टणारे कामकरी आणि

शाळा–कॉलेजातून संस्कृती घडविणारे शिक्षक यांची जर पक्की एकी झाली तर भारतातही खरी क्रांती झाल्याशिवाय राहणार नाही, असे ते पुन्हा पुन्हा सांगत असत.

आजही संस्थेत दहा बोटांनी काम करणाऱ्या शेतकरी–कामकरी मजुरांचे सत्कार करण्याची परंपरा चालू आहे.

अनुक्रमणिका

# २०. परित्राणाय साधुनाम्...

कर्मवीर मामासाहेब तसे सरळ मनाचे, स्पष्टवक्ते. सात्त्विक संतापाने कधी कटूही बोलणारे. प्रसंगी शिव्याही देण्यास न कचरणारे. त्यासाठी तुकाराममहाराजांच्या अभंगांचा सतत वापर करणारे. त्यांच्या निःस्वार्थी, त्यागी आणि सेवाभावी जीवनशैलीमुळे त्यांच्या शिव्याही लोकांना ओव्या वाटत. तत्त्वाशी तडजोड करून लोकानुनय त्यांनी कधी केला नाही. राजकारण्यांच्या तोंडातील साखरपेरणी त्यांना कधी जमलीच नाही. राजकारणापेक्षा शिक्षणकार्य चांगले. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या संसारावर लाथ मारून संस्थेतर्फे अनेक गोरगरीब बहुजनाचे संसार उभे केले. संस्थेच्या विकासाठी त्यांनी लहानसहान तडजोडी केल्या पण सुरुवातीला ते राजकारणापासून चार हात दूरच राहिले.

कर्मवीर मामांनी सक्रिय राजकारण टाळले तरी ते राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त राहू शकले नाहीत. महात्मा फुले यांनी सुरू केलेली सत्यशोधक समाजाची चळवळ त्यांना आपली वाटे. गीतेतील 'परित्राणाय साधुनाम' असे राजकारण असावे; हे त्यांचे प्रामाणिक मत. 'बहुजन हिताय। बहुजन सुखाय' या तत्त्वानुसार काम करणारा ध्येयवादी उमेदवार मग तो कोणत्याही पक्षाचा असला तरी तो त्यांना जवळचा वाटायचा.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेसही सत्तेत भरकटू लागल्याचे पाहून त्यांचा इतरांप्रमाणे काँग्रेस पक्षाबद्दल भ्रमनिरास होऊ लागला. त्यामुळेच स्वातंत्र्याच्या काळात डाव्या विचारसरणीच्या पक्षांशी व त्यातल्या त्यात शेतकरी–कामकरी पक्षाशी त्यांचे सूर जमले. शे.का.पक्षातील जेधे–मोरे–जवळकर तसेच क्रांतिसिंह नाना पाटील, भाई माधवराव बागल आणि दे. भ. तुळशीदास जाधव हे त्यांना आप्तस्वकीय वाटत.

कर्मवीर मामांनी राजकारणात म्हणावा तेवढा रस दाखवला नव्हता पण संस्थेच्या विकासासाठी; सरकार दरबारी महत्त्वाची कामे करून घेण्यासाठी आपली माणसे विधिमंडळात निवडून आली तर ती त्यांना हवीच होती. म्हणून १९५२ मधील विधिमंडळाच्या निवडणुकीत बार्शी मतदारसंघातून त्यांनी त्यांचे मित्र व संस्थेचे कार्यकर्ते श्री. नरसिंगतात्या देशमुख मास्तर यांना शे.का.पक्षातर्फे निवडणुकीला उभे केले आणि निवडूनही आणले.

स्वेच्छेने गरिबी पत्करलेल्या कर्मवीर मामासाहेबांच्या जीवनाचा मोठा प्रभाव बार्शी तालुक्यात आणि उस्मानाबाद जिल्ह्यात वाढत गेला होता. बहुजन समाजातील लोक त्यांना आपल्या उद्धारकर्ता मानू लागले होते. सरकार दरबारीही त्यांचा दबदबा वाढला होता. मा. यशवंतरावजी चव्हाणांसारखे लोकनेते आवर्जून संस्थेला भेट देऊन सहकार्य करू लागले होते. त्या काळचे शिक्षणमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांनी शासनातर्फे संस्थेला मंजूर केलेल्या एक लाखाच्या अनुदानाच्या पत्रावर सही करताना एक लाखाचा आकडा बदलून दोन लाख केला होता. हा कर्मवीर मामांच्या कार्याचा परिणाम होता.

४ फेब्रुवारी १९६३ रोजी कर्मवीर मामांचा षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभ, महाराष्ट्र राज्याचे त्या वेळचे उपसभापती श्री. के. टी. गिरमे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. त्या वेळी अध्यक्षीय भाषणात मामांच्या कार्याचे कौतुक करताना श्री. गिरमे म्हणाले, "मी पुण्यातील एका बोर्डिंगचा ट्रस्टी आहे. विद्यार्थ्यांपासून दरमहा पंचवीस रुपये घेतले तरी खर्च जुळत नाही. पण मामांच्या बोर्डिंगमध्ये विद्यार्थ्यांकडून ५ ते ११ रुपये

फी घेऊन बोर्डिंगचा खर्च भागविला जातो. ही गोष्ट कशी साधता येईल याची गुरुकिल्ली मिळविण्यासाठी मी येथे कर्मवीर मामांच्या शिक्षणसंस्थेत आलो आहे.

"साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे मामांचे स्वरूप पाहून माझा त्यांच्याबद्दलचा आदर द्विगुणित झाला. विद्यार्थ्यांना देईन तेच मी व पाहुणे खातील, अशी भारतीय संस्कृतीला आर्दशभूत असलेली वृत्ती मामांच्या ठायी मला दिसली.

"कर्मवीर मामांनी शिक्षणकार्याचे प्रचंड स्वरूप बार्शी तालुक्यात आणि मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यांत उभे केले आहे. अनेक कुटुंबावर त्यांचे अनेक उपकार झाले आहेत. महाराष्ट्र सरकारने हल्ली गरिबी शिक्षणाच्या आड येऊ नये म्हणून १२०० रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षण मोफत केले आहे. जे कार्य पूर्वीच सरकारने करायला पाहिजे होते त्यापेक्षा मोठे कार्य मामासाहेबांनी केले आहे. हजारो विद्यार्थ्यांतून आदर्श नागरिक तयार करण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे.

"पारतंत्र्यात बहुजन समाजाला ज्ञानाचा ओलावा मिळत नव्हता. तो त्यांना मिळावा, त्यांची नीट प्रगती व्हावी, यासाठी पहिली ज्ञानज्योत महात्मा जोतीबा फुल्यांनी लावली. त्यानंतर राजर्षी शाहू, महर्षी वि. रा. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी तेच कार्य केले. त्यांच्याच परंपरेतील एक तेजस्वी हिरा म्हणून कर्मवीर मामांचा गौरव करावा लागेल.

"काही व्यक्ती दैवी शक्तींनी असामान्य म्हणून जन्माला येतात पण काही सामान्य लोककार्याची धुरा घेऊन असामान्यत्व मिळवतात. दुसऱ्यांचे दुःख जाणण्याची शक्ती व ध्येयाची भक्ती घेतात व यशस्वी होतात. कर्मवीर मामा हे यांचे मूर्तिमंत उदाहरण आहे."

येडशी येथील संस्थेच्या कार्यकर्त्यांनी कर्मवीर मामांची एकसष्टी १९ एप्रिल १९६४ रोजी येडशीला त्या वेळचे महाराष्ट्र राज्याचे वीज व पाटबंधारे मंत्री ना. शंकरराव चव्हाण यांच्या शुभहस्ते साजरी केली. त्यांच्याच हस्ते मामांना तीस हजार रुपयांची थैलीही अर्पण केली. ना. चव्हाणांनी त्या वेळी कर्मवीर मामांच्या कार्याची मुक्त कंठाने प्रशंसा केली. सरकारला उत्तर देताना कर्मवीर मामा नम्रपणे म्हणाले, "आज येथे जो माझा सत्कार करण्यात आला तो सत्कार माझा नसून ज्या जनतेने हे विद्यामंदिर उभे करण्यासाठी तनमनधनाने मदत केली. त्या जनतेचा हा सत्कार आहे. संत तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे, 'फोडिले भांडार। धन्याचा हा माल। मी तो हमाल। भारवाही।।" असा आहे.

१९६७ च्या विधी मंडळाच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षातर्फे बार्शी मतदारसंघाचे तिकीट सौ. प्रभाताई झाडबुके यांना देण्याचे निश्चित झाले. काँग्रेसेतर पक्षातर्फे तुल्यबळ उमेदवार म्हणून श्री. पन्नालाला सुराणांना तिकीट देण्याचे प्राथमिक वाटाघाटीत ठरले. पण सौ.प्रभाताईंशी टक्कर देऊन यशस्वी होण्याबाबत श्री. सुराणा साशंक होते. तेव्हा पुण्याच्या तिकीट—वाटपाच्या अंतिम बैठकीत संयुक्त महाराष्ट्र समितीने हे तिकीट शे.का. पक्ष पुरस्कृत उमेदवार कर्मवीर मामांना देण्याचा निर्णय घेतला. मामांना निवडणुकीत हमखास यश येईल, हा त्यांचा होरा. त्यानुसार श्री. पन्नालालनी मामांसाठी माघार घ्यावी आणि मामांनी 'किमान सहा वर्षे काँग्रेस पक्षात जाणार नाही', असा करार केला. ही बाब श्री. भाऊसाहेबांनी राजकारणी चाव्या फिरवल्या आणि श्री .पन्नालालनी मामांसाठी माघार घेण्याचे नाकारले.

काँग्रेसतर्फे वैराग भागातून संस्थेचे माजी विद्यार्थी व कायकर्ते श्री. गोविंदराव भाऊराव बुरगुटे यांना तिकीट मिळाले. त्यांना पाठिंबा द्यायचा हे मामांनी निश्चित केले. पण वैराण भागच्या काँग्रेस उमेदवाराला पांठिबा आणि बार्शीच्या काँग्रेस उमेदवाराला विरोध हे चित्र विचित्र दिसू लागले. शेवटी मामांनी काँग्रेसच्या दोन्ही उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला. कर्मवीर मामासाहेबांच्या आशीर्वादाने श्री. बुरगुटे आणि सौ. प्रभाताई झाडबुके निवडून आल्या.

१९७२ च्या विधिमंडळाच्या निवडणुकीत परिस्थिती खूपच पालटली. बार्शी शहर व तालुक्यात श्री. भाऊसाहेब झाडबुके यांनी दहशत निर्माण केली होती. बार्शी नगरपालिकेतही त्यांच्या मनमानी कारभाराने लोक त्रस्त झाले होते. श्री. भाऊसाहेब झाडबुके यांच्या कारकिर्दीची सविस्तर माहिती श्री. पन्नालाला सुराणांनी 'माणूस'च्या विशेषांकात प्रकाशित केली. हा 'माणूस'चा अंक महाराष्ट्रात त्या वेळी खूप गाजला. काँग्रेस पक्षही अडचणीत आला. काहीही झाले तरी बार्शी मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे तिकीट झाडबुक्यांना मिळू द्यायचे नाही. यासाठी स्वतः मामा आपल्या कार्यकर्त्यांसह ना. यशवंतराव चव्हाणांना भेटायला गेले. यशवंतरावांनी विचारले "कसे काय इकडे आलात? "

"तुम्ही मुद्दाम वेड घेऊन पेडगावला जाताय. आम्ही का आलोत हे तुम्ही जाणलेच आहे. हल्ली बार्शीतील चाललेलं गलिच्छ राजकारण आम्ही या पुढं चालू देणार नाही. मलाच काँग्रेस पक्षाचं तिकीट हवंय." मामा.

"मामा ,तुम्ही निवडणुकीत सहज निवडून याल, याची मला खात्री आहे. पण या राजकारणाच्या गदारोळात तुम्ही पंधरा दिवसही काम करू शकणार नाही. कुठून या घृणास्पद घाणीत येऊन पडलो, असे तुम्हाला वाटेल आणि तुम्ही लगेच राजीनामाही द्याल. तुम्हाला तिकीट नाकारायची माझी तरी हिंमत नाही पण अजून विचार करा आणि दोन—तीन दिवसांनी मला तुमचा निर्णय कळवा." यशवंतरावांनी आपले स्पष्ट सांगितले.

इकडे बार्शीला रोज शेकडो लोकांचे जथे कर्मवीर मामांना निवडणुकीला उभे राहण्याचा आग्रह करू लागले. कर्मवीर मामांची द्विधा मनःस्थिती झाली. तेव्हा संस्थेचे अध्यक्ष श्री. टी. बी ऊर्फ आबा जगदाळे मामांना म्हणाले, "निवडणुकीचं वेड लागलंय काय? हुरळली मेंढी चालली लांडग्याच्या मागे', असं झालंय तुमचं. तुम्ही निवडणुकीत निवडूनही याल. पण संस्था बरबाद होईल. चालेल का? आपण दगडाला शेंदूर फासून देव करायचं असतं!" हे विचार ऐकून निवडणुकीला उभं राहण्याचा विचार मामांनी कायमचा डोक्यातून काढला. पण बार्शीतलं बिघडलेलं राजकारण सुधारायची झिंग त्यांच्या डोक्यातून जाईना. त्यांनी प्रा. सौ. शैलजा शितोळे यांना काँग्रेस पक्षाचं तिकीट मिळवून दिलं.

बार्शीत राहून श्री. भाऊसाहेब झाडबुके यांच्याशी वैर म्हणजे पाण्यात राहून माशाशी वैर होतं. ते मामांनी 'परित्राणाय साधुनाम्' या तत्त्वासाठी स्वीकारलं. काँग्रेसतर्फे सौ. शितोळे आणि शे.का.पक्षातर्फे श्री. ज्ञानेश्वर पाटील हे दोन्ही कर्मवीर मामांचे शिष्य! निवडणूक रंगली. श्री. भाऊसाहेब झाडबुके हे काँग्रेसचे कार्यकर्ते पण त्यांनी शे.का.पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करायला सुरुवात केली. काँग्रेसचा उमेदवार अडचणीत सापडला. पण त्याच वेळी शासनाने बार्शी नगरपालिका बरखास्त करून तेथे प्रशासक नेमला. त्यामुळे भाऊसाहेबांच्या विरोधाची धार मुंडू लागली. ते काँग्रेस उमेदवाराच्या विरोधी प्रचार करतात, अशा तक्रारी काँग्रेस पक्षाकडे गेल्या. श्री. वसंतदादा पाटील स्वतः बार्शीला आले. चौकशी केली आणि त्यांनी

श्री. भाऊसाहेबांना सहा वर्षासाठी कॉंग्रेस पक्षातून काढून टाकले तेव्हा भाऊसाहेबांनी शे.का.पक्षाच्या उमेदवाराची उघड उघड बाजू घेतली. प्रचाराची रणधुमाळी माजली. पण कर्मवीर मामासाहेबांचे स्वच्छ चारित्र्य, शिक्षण प्रसाराद्वारे त्यांनी बहुजन समाजाची केलेली सेवा आणि बार्शी तालुक्यातील पूर्वीचे गलिच्छ राजकारण संपविण्याची लोकेच्छा या गोष्टींमुळे या अटीतटीच्या सामन्यात कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवार सौ. शैलाताई शितोळे निवडून आल्या.

निवडणुकीतील धावफळ, जागरणे, अवेळी खाणेपिणे आणि राजकारणातील ताणतणाव यामुळे कर्मवीर मामांची प्रकृती ढासळली. त्यांना मधुमेहाने गाठले. या शारीरिक व्याधीच्या जोडीला श्री. लालासाहेब देशमुख यांनी कर्मवीर मामासाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यावर बार्शी कोर्टात दाखल केलेली केसही मामांची मानसिक व्याधी वाढविणारी ठरली. केसची बातमी ऐकून कर्मवीर मामासाहेबांना जबरदस्त धक्का बसला. आपल्याच सहकारी कार्यकर्त्याने आपल्या विरुद्ध कोर्टात केस दाखल करावी, या गोष्टीचे त्यांना कमालीचे दुःख झाले. पण या केसला सामोरे जाण्याशिवाय मामांना दुसरा मार्गच उरला नव्हता.

अनुक्रमणिका

# २१. शिवाजीमहाराजांचा अश्वारूढ भव्य पुतळा

शिवछत्रपती हे कर्मवीर मामांचे लहानपणापासूनचे दैवत. शिक्षणप्रसाराचा प्रारंभही त्यांनी श्री शिवाजी मराठा बोर्डिंगनेच केला होता. संस्थेतर्फे दरवर्षी शिवजयंती महोत्सवही ते धुमधडाक्याने आणि विविध विधायक शैक्षणिक कामांनी साजरे करत असत. पुढे त्यांनी आपली संस्थाही श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या नावानेच रजिस्टर केली. वाशी (जि. उस्मानाबाद) येथील हायस्कूलचे नाव 'छत्रपती शिवाजी विद्यालय' असेच ठेवले. संस्थेचे पहिले कॉलेजही 'श्री शिवाजी महाविद्यालय' या नावानेच त्यांनी सुरू केले. त्यांनी आपल्या ध्येयाची प्रेरणा छत्रपती शिवाजीमहाराजांपासूनच घेतली. शिवछत्रपतींचे जीवन आणि कार्य त्यांच्या रोमारोमांत भिनले होते. म्हणूनच शिवाजीमहाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या निवडक प्रसंगांची मोठमोठी चित्रे फ्रेम करून त्यांनी संस्थेच्या आवारात लावली. शाहीर बाबासाहेब देशमुख हे शिवचरित्रावरील पोवाडे चांगले म्हणतात असे कळताच त्यांनी शाहीरांना आणि त्यांच्या साथीदारांना संस्थेत बोलावून घेतले. राहायला जागा दिली व त्यांच्या भोजनाची व्यवस्था केली. संस्थेच्या आवारात आणि बार्शी तालुक्यातील विविध ठिकाणी त्यांच्या पोवाडे गायनाचे कार्यक्रम आयोजित केले. त्यामागचा त्यांचा हेतू एकच. शिवाजीमहाराजांचा आदर्श समाजापुढे आणि मुख्यतः तरुण पिढीपुढे ठेवावा हाच होता. महाराष्ट्र हे राज्य छत्रपती शिवाजींच्या ध्येयधोरणाप्रमाणे आणि तत्त्वप्रणालीनुसार आदर्श पद्धतीने चालविण्यासाठी भावी राज्यकर्ते तयार व्हावेत, हे त्यांचे आदर्शवादी स्वप्न होते.

स्वातंत्र्य काळात शिवबाचा कित्ता आपले धुरंदर नेते गिरवतील, ह्या कर्मवीर मामांच्या आशावादाला तडे जाऊ लागल्यावर स्वातंत्र्यातील नव्या पिढीपुढे छत्रपती शिवाजीचा आदर्श ठेवण्याची त्यांना अधिकाधिक गरज वाटू लागली. म्हणून त्यांनी सन १९७१ मधील दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर अश्वारूढ शिवपुतळा आणि गोर-गरिबांच्या निरोगी-निरामय जीवनासाठी 'आरोग्य मंदिर' उभारण्याचे संकल्प सोडले. 'ही माझ्या जीवनातील शेवटची महत्त्वाची कामे आहेत' असे ते सर्वांना सांगू लागले.

एखादे काम करण्याचे निश्चित केल्यावर कर्मवीर मामा त्या कामाचा पिच्छा पुरवीत. वय सत्तरीत आलेले. शरीर थकू लागलेले. पण मन मात्र चैतन्याच्या मांदीयाळीने ओतप्रोत भरलेले. अश्वारूढ शिवपुतळा कसा असावा? तो कोठे बसवावा? तो कोणत्या शिल्पकाराकडून करून घ्यावा? याचा ते तहानभूक विसरून विचार करू लागले. धडाधड निर्णय घेऊ लागले. पुण्याचे प्रसिद्ध मूर्तीकार श्री. बी. आर. खेडकर यांना बोलावून त्यांच्यावर अश्वारूढ शिवपुतळ्याचे काम सोपवले.

हा अश्वारूढ शिवपुतळा श्री शिवाजी महाविद्यालयापुढे उभा करण्याचे ठरले. पुतळ्याभोवती बागबगीचा फुलवण्यासाठी जागेला कुंपण घालून घेतले. आवारात काळी माती आणून टाकली. पुण्याला खेडकर पुतळा तयार करू लागले तर इकडे कर्मवीर मामांनी चबुतरा आणि त्या भोवतीचा बगीचा, बगीच्यातील कारंजी बांधून घेण्याचा सपाटा सुरू केला. एक नवे चैतन्य त्यांच्यात सळसळत होते. शिवपुतळ्यासाठी देणग्या गोळा करीत होते. पण वार्धक्याने शरीर थकले होते. त्यात उन्हातान्हात गवंड्यांबरोबर आठ आठ तास राहिल्याने त्यांच्या प्रकृतीवर गंभीर परिणाम होऊ लागला. २१ जुलै १९७४ रोजी पहाटे ४ वाजता त्यांना अर्धांगवायूचा झटका आला. त्यांच्या डाव्या अंगावरून वारे गेले. डावा पाय, डावा हात लुळे पडले. चेहऱ्याचा डावा भाग कोमेजून गेला. बोलताना शब्द बोबडे येऊ लागले. त्यांना

अनुक्रमणिका

ताबडतोब सोलापूरला ससून हॉस्पिटलमध्ये दाखल केले गेले. तेथेही ते अश्वारूढ शिवपुतळ्याची चौकशी करायचे!

पुण्यात श्री. खेडकर पुतळा जलदगतीने पूर्ण करू लागले. जसाजसा पुतळा पूर्ण होऊ लागला; त्याच्या बातम्या मामांच्या कानावर येऊ लागल्या,तसतशी डॉ. कोसलगे यांच्या प्रयत्नाने कर्मवीर मामांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होऊ लागल्या. पुण्यात पुतळा पूर्ण झाला आणि सोलापुरात मामांची प्रकृती सुधारली. त्यांना हॉस्पिटलमधून मुक्त करण्यात आले. १६ ऑक्टोबर १९७४ रोजी ते बार्शीला आले. व्हिलचेअरवर बसून ते चबुतऱ्याचे आणि बगीच्याचे काम पूर्ण झाल्याचे पाहून सुखावले! कर्मवीर मामासाहेब बार्शीला आल्यानंतर तीनच दिवसांनी म्हणजे १९ ऑक्टोबर १९७४ रोजी अश्वारूढ शिवपुतळ्याचे बार्शीत आगमन झाले.

अश्वारूढ शिवपुतळा बार्शीत आल्यावर त्याची शहरातून मोठी मिरवणूक काढण्याचे मामांनी अगोदर ठरविले होते. त्यांच्या नियोजनाप्रमाणे त्याच दिवशी बार्शी शहरातून अश्वारूढ शिवपुतळ्याची 'न भूतो न भविष्यति' अशी प्रचंड मिरवणूक निघाली. मृत्यूच्या दाढेतून कर्मवीर मामा सहीसलामत परत आलेले. त्यांना आणि अश्वारूढ शिवपुतळा पहाण्यासाठी सोलापूर-उस्मानाबाद जिल्ह्यातील हजारो लोकांनी बार्शीत गर्दी केली. मोठ्या जत्रेचं स्वरूप बार्शीला आलं. संस्थेच्या खेड्यापाड्यांतील शाखातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी आपापल्या जथ्यासह ट्रक, गाड्या, टॅक्टर, मोटार सायकली व इतर वहाने फुला पानांची आणि फलकांनी सजवून मिरवणूकीत सामील झाली. गुलालाची उधळण होऊ लागली. वातावरणात आनंद, उत्साह आणि जल्लोषाचे इंद्रधनुष्य निर्माण झाले. मिरवणुकीत मुलांची पथके देहभान विसरून लेझिम खेळत होती. मुली टिपऱ्या खेळत होत्या. साऱ्यांच्या मुखातून 'शिवाजी महाराज की जय!' 'कर्मवीर मामासाहेब की जय' या घोषणा निघत होत्या. या घोषणांनी अवघी दुमदुमली भगवंताची बार्शी, अशी स्थिती झाली. अशा प्रकारे चाललेल्या ह्या जवळ जवळ दीडएक मैल लांबीच्या मिरवणुकीकडे पाहून कर्मवीर मामांचे मन तृप्त झाले. बार्शीकरांना दिवाळी-दसरा साजरा केल्याचे समाधान मिळाले.

सकाळी सुरू झालेली ही भव्य मिरवणूक बार्शी शहरातील मुख्य रस्त्याने मिळून तिसऱ्या प्रहरी संस्थेच्या प्रांगणात येऊन विसर्जित झाली. बार्शीकरांच्या जीवनातील तो दिवस अपूर्व आणि अविस्मरणीय असा होता.

या अश्वारूढ शिवपुतळ्याचा अनावरण समारंभ कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या अमृतमहोत्सवी वर्धापन दिनी ४ फेब्रुवारी १९७८ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मानसपुत्र आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे त्यावेळचे कुलगुरू बॅ. पी. जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि सातारच्या राजमाता सुमित्राराजे भोसले यांच्या शुभ हस्ते मोठ्या उत्साहाने आणि दिमाखाने पार पडला.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी बार्शीकरांना अश्वारूढ शिवपुतळ्याच्या रूपाने एक स्फूर्तीचा झरा आणि रयतराज्याचा चिरकाल टिकणारा दीपस्तंभ बहाल केला!

अनुक्रमणिका

## २२. गोरगरिबांची आरोग्यसावली

अश्वारूढ शिवपुतळ्याबरोबरच गोरगरिबांसाठी आरोग्य मंदीर उभे करण्याचा संकल्प कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी १९७१ सालच्या विजयादशमीच्या पवित्र दिवशी जाहीर केला होता. सारी रुग्णालये शहरातच. तीही महागडी. गोरगरिबांच्या खिशाला न परवडणारी. खेड्यात जाऊन दवाखाने सुरू करायलाही डॉक्टर मंडळी तयार नसत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे आरोग्यसेवेचे हाल कुत्राही खात नव्हता. अशा स्थितीत कर्मवीर डॉ. मामासाहेबांनी बार्शीला आरोग्य मंदीर बांधण्याचा संकल्प सोडलेला. या आरोग्य मंदिरात खेड्यातील गोरगरिबांची औषधपाण्याची कमी खर्चात सोय व्हावी; त्याहीपेक्षा लोकांना रोगच होऊ नयेत यासाठी त्यांना योग्य ते मार्गदर्शन लाभावे, ही मामांची आरोग्य मंदीर उभे करण्यामागची मूलभूत प्रेरणा होती.

१९७२ मधील एप्रिल महिन्यात कर्मवीर डॉ. मामासाहेब स्वतःची प्रकृती तपासून घेण्यासाठी मिरजेला वॉनलेस ह़ॉस्पिटलमध्ये गेले होते. तेथे संस्थेच्या बोर्डिंगचे आणि श्री शिवाजी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. बी. वाय. यादव एम.एस. चा अभ्यासक्रम पूर्ण करीत होते. प्रकृती तपासून घेतल्यानंतर ते डॉ. यादवांच्या खोलीत गेले. विचारांची गर्दी त्यांच्या डोक्यात झालेली. 'परदेशी लोक भारतात येऊन हॉस्पिटल उभारतात आणि आपल्या देशातील गोरगरिबांची आरोग्यसेवा जीव लावून करतात. मग आपणच आपल्या गरीब लोकांची आरोग्यसेवा कमी खर्चात करायला काय हरकत आहे? त्यासाठी आपल्या संस्थेतर्फे हॉस्पिटल सुरु केले तर काय होईल? सेवाभावी वृत्तीचे काम करणारे डॉक्टर्स आपणाला मिळतील कां?' या विचारतंद्रीतच कर्मवीर मामासाहेबांनी डॉ. यादवांना विचारले, "आपल्या संस्थेनं हॉस्पिटल सुरू केलं तर मिशनरी वृत्तीने काम करायला तू येशील का?"

डॉ. यादवांनी क्षणाचाही विलंब न करता तात्काळ होकार दिला. आणि कर्मवीर मामासाहेबांच्या मनात बार्शीला संस्थेचे हॉस्पिटल उभे करण्याचे बी रुजले. पुढे २ एप्रिल १९७३ रोजी कर्मवीर मामांचे जीवाभावाचे सन्मित्र आणि संस्थेच्या विकासात नेहमीच तत्परतेने मामांना साथ देणारे संस्थेचे त्या वेळचे अध्यक्ष श्री. संभाजीराव बारंगुळे यांचे मुंबईच्या दवाखान्यात असाध्य रोगाने दुःखद निधन झाले. हा धक्का कर्मवीर मामांना अनपेक्षित होता. बार्शीला आपले ह़ॉस्पिटल असते तर या विचाराचे बीज त्यांच्या मनात अंकुरले.

स्वतःवरून जग ओळखावे, हा कर्मवीर मामांचा स्थायीभाव. त्यामुळेच गोरगरिबांबद्दल करुणा त्यांच्या हृदयात सतत पाझरत असलेली. त्यात त्यांना २३ जुलै १९७४ रोजी अर्धांगवायूचा झटका येऊन गेला. त्यांना ताबडतोब सोलापूरच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे स्वतःच्या आजारपणात औषधोपचारासाठी होणाऱ्या मोठ्या खर्चाची त्यांना कल्पना आली. साऱ्याच गरीब लोकांना सोलापूरसारख्या शहरातील महागड्या दवाखान्यात उपचार करून घेणे केवळ अशक्य असल्याची खंत त्यांना प्रकर्षाने जाणवली. म्हणून बार्शीला संस्थेचे हॉस्पिटल सुरू करण्याचं स्वप्नं त्याही परिस्थितीत ते गोंजारू लागले. तेथे डॉ. कोसलगे आणि त्यांचे सहकारी कर्मवीर मामांची देखभाल काळजीपूर्वक करीत होते. डॉ. कोसलगे यांना तर कर्मवीर मामांसारख्या पेशंटमध्ये परमेश्वर दिसला. पैशाच्या मागे लागणारा डॉक्टर हा दैत्याचा दूत असतो तर पैशापेक्षा पेशंटला बरे करण्याच्या मागे मन लावून उपचार करणारा डॉक्टर हा देवाचा दूत असतो. असे देवदूत आपल्या संस्थेच्या दवाखान्याला मिळावेत म्हणून मामा परमेश्वराची प्रार्थना करीत.

अनुक्रमणिका

आपल्या संस्थेच्या आरोग्य मंदिराच्या इमारतीच्या स्वरूपाबद्दल, त्या हॉस्पिटलमध्ये नेमावयाच्या डॉक्टर्स आदी मंडळींबाबत आणि त्या हॉस्पिटलमध्ये करावयाच्या सोयीसुविधांबाबत कर्मवीर डॉ. मामासाहेबांनी, डॉ. कोसलगे, डॉ. प्रधान, डॉ. दुबे, डॉ. पारगावकर आणि डॉ. स्वामी यांच्याबरोबर प्रदीर्घ चर्चा केली. सोलापूरचे आर्किटेक्ट श्री वडांबे यांना बोलावून त्यांनी आपल्या नियोजित आरोग्य मंदिराचा प्लॅन व एस्टिमेट तयार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. श्री. वडांबे यांनी ते काम लगेच पूर्ण केले.

आरोग्य मंदिराच्या परिसरातच रुग्णांच्या सर्व गरजा भागाव्यात; यासाठी इमारतीच्या तळघरात औषधाचे दुकान, फळाचे दुकान असावे. डॉक्टरी सल्ल्यानुसार रुग्णांना सकस अल्पोपहार, चहापाणी आणि जेवण अल्प किमतीत पुरविण्यासाठी कॅण्टीनची सोय असावी. त्यात रुग्णांसाठी जनरल वार्ड आणि स्वतंत्र खोल्यातून कमीतकमी दीडशे रुग्णांची व्यवस्था व्हावी. रुग्णाबरोबर येणाऱ्या नातेवाईकांना राहण्यासाठी, स्वयंपाक करण्यासाठी भली मोठी धर्मशाळा असावी. आरोग्य मंदिरापुढे फुलांनी बहरलेला बागबगिचा असावा. त्यात रुग्णांनी थोडावेळ तरी फेरफटका मारावा. बगिच्याच्या प्रसन्न वातावरणात त्यांचा निम्मा रोग तरी पळून जावा. थोडक्यात, ग्रामीण भागातील गरिबांना कमीतकमी खर्चात आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, असे कर्मवीर मामांचे आरोग्य मंदिराचे स्वप्न होते.

असे आरोग्य मंदिर सुरू केले तर त्याला शासनाकडूनही अनुदान मिळावे, म्हणून कर्मवीर मामांनी त्या वेळचे ॲक्टिंग जनरल सेक्रेटरी प्रा. ॲड. ए. वाय. यादव यांना ना. यशवंतराव चव्हाण यांना भेटण्यास सांगितले. त्यानुसार ॲड. यादव हे ना. चव्हाण यांना औरंगाबाद येथे भेटले. स्वतः आजारी असताना कर्मवीर मामांनी हॉस्पिटल उभारणीचे काम हाती घेतल्याचे त्यांनी सांगितले. तेव्हा ना. यशवंतरावजी म्हणाले, “हॉस्पिटल काढणं आणि ते चालवणं हे काम फार अवघड आहे. हॉस्पिटल म्हणजे पांढरा हत्ती पोसण्यासारखं आहे. त्यापेक्षा मामांनी अजूनही जादा विद्यालये-महाविद्यालये सुरू करावीत.” मामांनी ‘ऐकावे जनाचे आणि करावे मनाचे’ या म्हणीप्रमाणे आरोग्य मंदिर उभारण्याचे काम सुरू केले.

संस्थेच्या आरोग्य मंदिराची सुरुवात १ फेब्रुवारी १९७५ रोजी झाली. डॉ. बी. वाय. यादव यांची त्याच दिवसापासून मेडिकल सुपरिटेंडेंट व प्रमुख सर्जन म्हणून नेमणूक केली. प्रारंभीच्या काळात हे आरोग्य मंदिर श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ एम्प्लॉइज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या विनामूल्य वापरण्यास दिलेल्या दोन खोल्यांत सुरू झाले.

या आरोग्य मंदिराचे उद्‌घाटन ४ फेब्रुवारी १९७५ रोजी कर्मवीर मामांच्या ७३ व्या वर्धापनदिनी सोलापूरच्या सिव्हिल हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. यू. बी. कोसलगे यांच्या शुभहस्ते आणि डॉ. व्ही. व्ही. कायरकर, उपसंचालक, महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली झाले. पुढे ही जागा फारच अपुरी पडू लागली. इनडोअर पेशंटची सोय करता येईना. तेव्हा कर्मवीर हौसिंग सोसायटीतील ज्या सभासदांना मूळची घरे होती आणि ज्यांना बांधकाम करणे शक्य नव्हते अशा सभासदांनी राजीनामे देऊन आपले सलग प्लॉट्‌स आरोग्य मंदिराच्या इमारतीसाठी दिले.

त्या जागेवर हॉस्पिटलच्या तळघराची खोदाई सुरु झाली. ‘कमवा आणि शिका’ योजनेखाली कॉलेजच्या काही गरीब विद्यार्थ्यांनी खोदाईचे काम केले. आरोग्य मंदिराचे बांधकाम सुरू करायचे तर त्यास पाणी हवे. म्हणून कर्मवीर मामांनी कर्मवीर हौसिंग सोसायटीसाठी विहीर खोदून घेतली. ती बांधूनही

अनुक्रमणिका

घेतली. जवळच उंचावर पाण्याची टाकी बांधली. बांधकामासाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न कायमचा मिटला. आता आर्किटेक्टच्या प्लॅनप्रमाणे बांधकाम करून घेण्याचे काम संस्थेचे खजीनदार श्री. अंबादास कृ. पाटील यांच्यावर सोपविले. श्री. पाटील आजारी पडलेले! पण मामांचा आदेश मिळताच त्यांचा आजार पळून गेला. संस्थेच्या जवळ जवळ साऱ्या इमारतींची बांधकामे श्री. पाटलांच्या देखरेखीखाली झालेली. त्यामुळे त्यांना संस्थेचे इंजिनिअर मानले जायचे. चार वर्षांच्या आत चार मजली पंचवीस लाखाची आरोग्य मंदिराची देखणी इमारत श्री. अंबादास पाटील यांनी दिवसाचे १२ ते १८ तास काम करून उभी केली.

पहिला मजला बांधून पूर्ण झाल्यावर संस्थेने सव्वा लाख रुपये किमतीचे एक्स-रे मशीन खरेदी केले. या एक्स-रे मशीनचे उद्घाटन ४ फेब्रुवारी १९७६ रोजी कर्मवीर मामांच्या ७४ व्या वर्धापन दिनी वानलेस हॉस्पिटल मिरजचे डॉयरेक्टर डॉ. ए. जी. फ्लेचर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे या मशीनच्या खरेदीसाठी लागणारा पैसा संस्थेच्या शेतीत केलेल्या ज्वाला मिरची, सीड प्लॉट व बटाट्याच्या प्लॉटच्या उत्पन्नातून उभा करण्यात आला होता. या आरोग्य मंदिराची कोनशिला त्या वेळचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांच्या शुभ हस्ते ७ जुलै १९७६ रोजी बसविण्यात आली.

मूळच्या 'आरोग्य मंदिर' ह्या नावाऐवजी खेड्यापाड्यांतील लोक या हॉस्पिटलला 'जगदाळेमामांचे हॉस्पिटल' या नावाने संबोधू लागले. तेव्हा संस्थेच्या कार्यकारिणीने या हॉस्पिटलचे 'जगदाळेमामा हॉस्पिटल' असे नामकरण केले. असे असले तरी हल्ली ते हॉस्पिटल 'कर्मवीर डॉ. जगदाळेमामा हॉस्पिटल' या नावानेच ओळखले जाते आहे.

९ जुलै १९७८ रोजी या हॉस्पिटलमध्ये मधुमेही रुग्णांचे शिबिर भरवले गेले. त्या वेळी मिरजेचे मेडिसीन विभागाचे प्रमुख डॉ. एस. व्ही. सोरटूर यांनी ६०० रुग्णांची तपासणी केली. त्यांना विनामूल्य आरोग्यसेवा पुरविली. या हॉस्पिटलमध्ये विविध विभाग हळूहळू सुरू होऊ लागले. कॅन्सर डिटेक्शन सेंटरचे उद्घाटन ना. डॉ. बळीराम हिरे यांनी केले, तर आर्थोपेडिक विभागाचे उद्घाटन पुणे येथील डॉ. संचेती यांच्या शुभ हस्ते झाले. या हॉस्पिटलमार्फत गोरगरीब रुग्णांसाठी अनेकविध मोफत शिबिरे दरवर्षी घेण्यात येऊ लागली. अपंगासाठी शिबिर, बाल आरोग्य निरीक्षण शिबिर, कुटुंब नियोजन शिबिर, बीसीजी कँप आणि डोळ्यांचे मोफत शिबिर दरवर्षी भरवली जाऊ लागली.

संस्थेने ऑपरेशन थिएटरचे बांधकाम पूर्ण करून दिले. या ऑपरेशन थिएटरचे उद्घाटन १५ ऑगस्ट १९७८ रोजी कर्मवीर डॉ. मामासाहेबांच्या पुण्यपावन हस्ते करण्यात आले. कर्मवीर मामांनी स्वतः आजारी असताना अश्वारूढ शिवपुतळा उभारला आणि अत्याधुनिक सोईसुविधांनी युक्त अशी हॉस्पिटलची भव्य इमारत बांधून पूर्ण केली. 'पंगू लंघयते गिरीम्' असेच लोक मामांच्या जादूभरल्या हाताला यशदायी मानत होते. या प्रसंगी बार्शीतील एक दानशूर व्यापारी श्रीमान हनुमानदासजी झंवर यांनी या ऑपरेशन थिएटरसाठी पंचवीस हजार रुपयांची देणगी दिली, तर या हॉस्पिटलच्या मदतीसाठी संस्थेचे माजी विद्यार्थी हिंदकेसरी श्री. हरिश्चंद्र बिराजदार व हिंद केसरी देऊळगावकर यांनी आपल्या कुस्तीचा कार्यक्रम बार्शी येथे केला. प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर सेवकांनीही आपापल्या कुवतीनुसार देणग्या दिल्या.

अनुक्रमणिका

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या देखरेखीखाली—व्हीलचेअरवर बसून ते इमारत बांधकामाकडे सकाळ संध्याकाळी चकरा मारत. योग्य ते मार्गदर्शनही करीत. तीस लाख रुपये खर्च करून बांधलेले तळघर आणि त्यावरील तीन मजली मुख्य इमारत आज दिमाखात उभी आहे. त्याच आवारात दक्षिणेला बाह्यरुग्ण विभागाची तीन मजली सुमारे पंचेवीस लाख रुपयाची इमारत नंतर बांधण्यात आली. त्यानंतर मुख्य इमारतीच्या पुढे पश्चिम बाजूला स्पेशल रुम्स्नी युक्त अशी तिसरी इमारत सुमारे साठ लाख रुपये खर्च करून नुकतीच पूर्ण केली आहे. या तिसऱ्या इमारतीला वाहनतळाची सुविधा ठेवली आहे. त्याचा वापर वाहने ठेवण्यासाठी तर होतोच पण त्याबरोबर रुग्णांचे नातेवाईक तिचा विश्रांती घेण्यासाठीही वापर करीत असतात. मुख्य इमारत आणि ही तिसरी तीन मजली इमारत उड्डाणपूल बांधून जोडली आहे. मुख्य इमारतीच्या उत्तर बाजूला पंधरा लाखाची डॉक्टरांच्या निवासाची तीन मजली इमारतही पूर्ण झाली आहे.

मुख्य इमारतीमध्ये हॉस्पिटल आणि हॉस्पिटल सुपरिटेंडेंटची कार्यालये सजली आहेत. त्याशिवाय त्यात ऑपरेशन थिएटर्स, प्रसूतीगृह, बालरुग्णालय, एक्सरे मशीन, सिटीस्कॅन मशीन, नाक-कान-घसा रुग्णालय, अस्थिरोग रुग्णालय, शल्य चिकित्सा आणि श्रीमती कमलाबेन मेहता अतिदक्षता विभाग असे विविध विभाग कार्यरत आहेत. अतिदक्षता विभागाचे विस्तारीकरणही पूर्णत्वास नेले आहे. या ‘श्रीमती कमलाबेन मेहता आय.सी.सी.यू.’ विस्तारित विभागाचे उद्घाटन कर्मवीर मामांच्या ९९ व्या जयंतीदिनी म्हणजे ४ फेब्रुवारी २००२ रोजी मा. अशोकभाई मेहता, मुंबई यांच्या शुभहस्ते झाले.

बाह्यरुग्ण विभागाच्या इमारतीच्या तळमजल्यात विविध विभागाच्या पंधरासोळा डॉक्टर्सना पेशंट तपासणीसाठी स्वतंत्र, सुसज्ज खोल्यांची व्यवस्था केली आहे. याच इमारतीच्या वरच्या मजल्यात अद्ययावत ‘पॅथॉलॉजी लॅबोरेटरी’ झाली आहे. उरलेल्या जागेत तीसके रुग्णांसाठी संडास-बाथरूमयुक्त खोल्यांची व्यवस्था केली आहे, तर तिसऱ्या तीन मजली इमारतीमध्ये पंचेचाळीस स्पेशल रुम्स रुग्णांसाठी तयार केल्या आहेत. या तीनही इमारतींमध्ये हल्ली एका वेळी सुमारे दोनशे रुग्णांची व्यवस्था होऊ शकते.

या हॉस्पिटलचे सुपरिटेंडेंट म्हणून डॉ. बी. वाय. यादव आणि डॉ. गुलाबराव पाटील यांनी कामे केली आहेत. हल्ली डॉ. एस. सी. माने हे सुपरिटेंडेंट म्हणून काम पाहत आहेत. या हॉस्पिटलमध्ये विविध विभागाचे वीसपेक्षा जास्त डॉक्टर्स सेवाभावी वृत्तीने काम करीत आहेत. डॉक्टर्सशिवाय शिकाऊ डॉक्टर्स, नर्सेस, वॉर्ड-बॉईज, स्वच्छता कामगार आणि क्लार्क आदी एकशे पंचवीसपेक्षा जास्त अधिक सेवक कार्यरत आहेत. हे हॉस्पिटल अत्याधुनिक यंत्रे आणि उपकरणांनी सुसज्ज असून एकविसाव्या शतकाला सामोरे जाण्यासाठी आणि व्यवस्थापनाला गती देण्यासाठी या हॉस्पिटलचे संपूर्णपणे संगणीकरण करण्याचे काम वेगाने चालू आहे.

थोडक्यात, हे ‘कर्मवीर डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल’ गोरगरिबांची खरीखुरी सावली बनले आहे.

## २३. संस्थेच्या भवितव्याच्या चिंतेपोटी

कर्मवीर डॉ. मामासाहेबांनी वयाच्या सत्तरीत प्रवेश केला. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या स्थितीत सारी हयात झगडण्यात, पुनर्निर्माणात गेलेली. शारीरिक कष्टाबरोबर मानसिक ताणात दिवस घालविल्याने शरीर थकलं होतं तरी मन मात्र बहुजन हितासाठी विधायक कार्याच्या उंच भराऱ्या मारत होतं. त्याला शरीर म्हणावी तशी साथ देईना. ते विचार करू लागले. 'सहकाऱ्यावर संस्थेचा भार सोपवून द्यावा का? आपण प्राणपणानं वाढवलेली ही संस्था ते नीट चालवितील का? पण त्यांच्यात तरी एकवाक्यता कुठे आहे? चौघांची तोंडे चारी दिशेला. आपण संस्थेचा राजीनामा दिला तर चट सारे कामाला लागतील. थोडी धुसफूस होईल पण ती का कायमची राहणार आहे?' या विचाराच्या तिरिमिरीत त्यांनी आपल्या सत्तराव्या वर्धापन दिनी आपला संस्थेच्या जनरल सेक्रेटरी पदाचा राजीनामा लिहून काढला आणि तो संस्थेकडे सुपूर्द केला. आपण आता संस्थेचा कारभार व्यवस्थितपणे सांभाळू शकणार नाही, असे वाटू लागल्याने त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात राजीनामा लिहिला होता.

त्या राजीनाम्यात त्यांनी लिहिले होते, "अलीकडे मला कामाचा ताण सहन होत नाही. अंगीकृत कार्यात परमेश्वराच्या आशीर्वादाने, आपल्या सर्वांच्या सहकार्याने, सहकाऱ्यांच्या, नोकरवर्गाच्या व विद्यार्थ्यांच्या माझ्यावरील निनान्त आदरयुक्त प्रेमामुळे मी मानवी जीवनात कृतार्थ झालो आहे. मी या जनरल सेक्रेटरी पदावरून मानवसेवा करीत असे, त्यातून मला मुक्त करावे.

"जगण्याच्या लांबीरुंदीवर आयुष्याचे थोरपण अवलंबून नाही तर त्याने स्वतःला वगळून इतरांना काय दिले यावर हे थोरपण अवलंबून आहे. मी माझ्या पदाचा राजीनामा दिला तरी पदाधिकाऱ्यांना, विद्यार्थ्यांना अनुभवाचे व सेवेचे मार्गदर्शन मी यथामती करीन. आतापर्यंत यशप्राप्ती करून दिलेल्या प्रभूचे अत्यंत विनम्रभावे आभार मानतो व आपल्या सर्वांनाही या कार्यात परमेश्वर सुबुद्धी देवो अशी प्रभुचरणी प्रार्थना करतो."

हा राजीनामा वाचून संस्थेतील कार्यकर्ते दिङ्‌मूढ झाले. आतापर्यंत संस्था म्हणजे एकखांबी द्वारका. कर्मवीर मामा बोले आणि संस्था हाले, असे होते. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे हे संस्थेचे संस्थापक, संवर्धक आणि प्रेरक शक्ती! त्यांचा राजीनामा कोण मंजूर करणार? तो मंजूरच केला गेला नाही. उलट १९७२ साली दुष्काळी परिस्थितीत वाशीसारख्या धड तालुका नसलेल्या खेडेगावात आर्टस् आणि कॉमर्स कॉलेज तसेच बार्शीला राजर्षी शाहू इव्हिनिंग लॉ-कॉलेज त्यांनी सुरू केले. त्याच सालात बार्शीचे गलिच्छ राजकारण स्वच्छ करण्याची आणि 'परित्राणाय साधुनाम्' या तत्त्वाने राजकारण करण्याची संधी त्यांना चालून आली. ते राजकारणात उतरले आणि त्यात ते यशस्वीही झाले.

तसे कर्मवीर मामा समाधानी होते. पण ज्या राजकारणात ते भल्यासाठी सहभागी झाले, तेच राजकारण त्यांच्या अंगावर उतु लागले. बार्शीच्या कोर्टात १९७३ च्या मार्च महिन्यात सार्वजनिक पैशाचा अपहार केल्याचा खोटा दावा त्यांच्यावर आणि त्यांच्या सहकार्यांवर दाखल झाला. त्याला संस्थेतील काही महत्त्वाकांक्षी लोकांनी साथ दिली. हा धक्का मामांना सहन होणारा नव्हता. पोटच्या पोराप्रमाणे ही संस्था त्यांना जीव की प्राण झालेली. तिची प्रतिष्ठा लोकमानसात आणि राजदरबारी वाढलेली. ती मलिन करण्याचा प्रयत्न या फौजदारी दाव्याने होऊ लागला. त्याला आपल्याच संस्थेतील लोकांनी का म्हणून साथ द्यावी? 'कट्टर विरोधक असलेल्या श्री. भाऊसाहेब झाडबुके यांनीही अखेरच्या काळात आपली भेट घेऊन शत्रुत्व संपविले. संस्थेच्या हॉस्पिटलला स्वतःची नसली तरी नगरपालिकेची एक लाख अकरा

अनुक्रमणिका

हजाराची देणगी दिली. आपलेच मित्र आणि भक्त असणाऱ्यांनी असा उभा दावा का बरे धरावा?' हे कोडे मामांना उलगडत नव्हते. या विचाराने ते पुरते बेचैन होऊ लागले. विचार कर करून डोके गरगरू लागले. रात्र रात्र झोप येईना. आपण जाहीर केलेले अश्वारूढ शिवपुतळा आणि आरोग्य मंदिराचे संकल्प अर्ध्यावरच कसे सोडून द्यायचे?

संस्थेतील कार्यकर्त्यांमध्ये संशयाचे वातावरण पसरलेले. त्यांच्यात हेवेदावे, द्वेष-मत्सर वाढू लागलेला. भांडणे वाढलेली. मामांना अतीव दुःख झाले. या कार्यकर्त्यांच्या गदारोळात संस्थेचे नुकसान कसे होऊ द्यायचे? कार्यकर्त्यांमधील विसंवादाने संस्थेत चांगली कामे करणारी शिक्षक आणि इतर नोकर मंडळीही बिघडायला वेळ लागणार नाही. आपण स्वतः 'इदं न मम्' या वृत्तीने काम केले. पण संस्थेतील काही कार्यकर्त्यांत स्वार्थाची लागण होऊ लागली तर काय करायचे? वेळीच त्यावर आवर घातला पाहिजे. काहीतरी जालीम उपाय योजला पाहिजे. आपला राजीनामा मंजूर होत नाही. काय करावे?

आपण तर असे आजारी. आजारी रजा घेऊन आपल्या जागी ॲक्टिंग जनरल सेक्रेटरी नेमला तर? द्वेष-मत्सरात बुडालेल्या कार्यकर्त्यांपैकी एखाद्याला अशा पदावर नेमले तर इतर त्याला सहकार्य करणार नाहीत. त्यामुळे ॲड. ए. वाय. यादव यांना बार्शीच्या लॉ कॉलेजात प्राध्यापकाची नोकरी दिली आणि त्यांनाच ॲक्टिंग जनरल सेक्रेटरीही नेमले. तरीही संस्थेच्या कारभारात म्हणावी तशी एकवाक्यता आणि प्रगती दिसेना. ॲक्टिंग जनरल सेक्रेटरी बदलून ते पद त्यांनी मंगळवेढ्याचे श्री. डी. एस. कदम गुरुजी यांना देऊन पाहिले. तरीही संस्थेतील कार्यकर्त्यांमधील धुसफूस थांबेना. संस्थेत कार्यकर्ते आणि नोकर यांच्यातील सुसंवाद कमी होऊ लागलेला. अशा परिस्थितीत संस्थेचा गाडा कुठे भरकटत जाईल, याचा पत्ता लागला नसता. आपली संस्था कर्मवीर आण्णांच्या रयत शिक्षण संस्थेला जोडून टाकली तर कार्यकर्ते आणि शिक्षक-शिक्षकेतर सेवकांच्यावर अंकुश तरी राहील. नदी सागराला मिळाली तर काय बिघडले?

कर्मवीर मामांनी आपली संस्था 'रयत शिक्षण संस्थे'ला जोडण्याचा निर्णय घेतला. त्यासंबंधी कच्चा ड्राफ्टही तयार झाला. 'रयत शिक्षण संस्थे'चे अध्वर्यू प्राचार्य एन. डी. पाटील आणि प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील आणि प्राचार्य नारायण भगरे या संदर्भात बार्शीला येऊन गेले. संस्थेत तोच विषय काही दिवस चर्चिला जात होता.

कर्मवीर मामांची संस्था 'रयत शिक्षण संस्थे'त विलीन झाली तर शिवाजीमहाराजांचे आणि कर्मवीर मामासाहेबांचे नाव कायमचे पुसले जाईल अशी भीती काहींनी व्यक्त केली. हे कळल्यावर कर्मवीर मामा म्हणाले, "रामकृष्ण आले गेले. त्यामुळे जग का ओस पडले? शिक्षणासारखे पवित्र कार्य, महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शिक्षणप्रसारातून समाजसुधारणेची गंगा अखंड वाहत राहिली म्हणजे झाले. आपल्या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी आणि नोकर-सेवकांनी रयतेमध्ये सामावून जाऊन हे पवित्र कार्य अधिक चांगल्या पद्धतीने केले म्हणजे झाले."

कर्मवीर मामासाहेबांची संस्था 'रयत शिक्षण संस्थे'ला जोडण्याच्या योजनेला प्रथम उघड उघड विरोध केला तो प्राचार्य शितोळे यांनी. त्यांनी एक चक्रमुद्रीत पत्रक काढून संस्थेच्या कार्यकर्त्यांना आणि संस्थेतील विविध शाखांना पाठवले. त्या पत्रातील मजकूर खालीलप्रमाणे होता :

अनुक्रमणिका

"व्याप तसा ताप. म्हणून संस्था वाढवायच्या नाहीत असा मामांनी निर्णय घेतला होता. चार वर्षांपूर्वीच. पण त्यानंतर वाशीला कॉलेज निघाले. शिवपुतळा व आरोग्य मंदिर झाले. संस्थेला स्वतः ची गती प्राप्त झाली आहे. व्याप वाढणारच. मात्र वार्धक्यामुळे मामांचे शारीरिक व मानसिक सामर्थ्य कमी होऊ लागले आहे. त्यातून बऱ्यावाईट सामान्य घटना घडतात व त्याने मामांचे स्वास्थ्य बिघडते....(मामांकडून) चुकांना सहजासहजी क्षमा मिळत नाही.त्यांच्या वागण्यात कर्मठपणा, हाताखालच्या माणसांना त्यांच्या गोष्टी पेलत नाहीत. अपेक्षाभंगामुळे तोंडसुख घेतात.त्याने काम करणारा भांबावतो व ते निराश होतात. व्यवहारी जगापासून (मामा) मुक्त होऊ पाहतात पण त्यांचे मन या कामकाजापासून परावृत्त होत नाही. स्वसंसारापेक्षा या सामाजिक संसाराचा त्याग त्यांना अवघड वाटतो. म्हणून ते संस्था रयतला जोडण्याच्या प्रयत्नात आहेत.

"(संस्था रयतेला जोडल्यानंतर) मामांसारखा एकमुखी कारभार राहणार नाही. बहुमताने झालेले निर्णय मामांना मानवणार का? शिवाजीचे नाव पुसले जाण्याची हळहळ नाही का वाटणार? स्वत्व गेल्याचं दुःख होणार नाही का? लहानपणापासून वढविलेला सेवकवर्ग व कार्यकर्ते मामांच्या शिव्यांना ओव्या समजतात. मामांविषयी व संस्थेविषयी अजूनही त्यांच्या मनात विकल्प नाही, हेच मामांनी आपले सद्‌भाग्य समजावे. या लोकांची कार्यपद्धती जिथे मामांना पटत नाही. तिथे रयत सेवकांची पद्धती पटणार का? 'जावईबुवा आणि अवघड जागी दुखणं' असं व्हायची भीती आहे... "

हे चक्रमुद्रित पत्र वाचून अनेकांनी अनेक प्रतिक्रिया नोंदविल्या. 'संस्था रयतेला जोडल्यावर शिताळेंना कुणी विचारणार नाही. त्यांची बदली महाराष्ट्रात लांब कुठेतरी होईल, अशी त्यांना भीती वाटते. त्यापेक्षाही आज ना उद्या आपण आपलं स्थान संस्थेत पुन्हा निर्माण करू, असा त्यांचा कयास आहे. म्हणूनच संस्था रयतला जोडण्यास त्यांचा विरोध आहे. ह्या आणि अशाच काहीबाही प्रतिक्रिया या पत्रकाबद्दल संस्थेत होऊ लागल्या. त्यामुळे संस्था रयताला जोडण्याच्या प्रक्रियेत थोडी खिळ बसली.

या सर्व बाबींतून मार्ग कोणी काढायचा? संस्थेचे अध्यक्ष श्री. टी. बी. जगदाळे उर्फ आबा यांनी याचा सोक्षमोक्ष लावायचे ठरविले.संस्थेत फक्त टी.बी.आबांशिवाय मामांना बोलण्याची, त्यांच्या मताच्या विरोधात तोंडावर काही सांगायची कुणाचीच हिंमत नव्हती.कर्मवीर मामाही टी.बी. आबांचा शब्द कधी मोडीत नसत.मामांना समजावून सांगण्याचे नैतिक सामर्थ्य त्यांच्यात भरपूर होते. ते प्रसंगी मामांना आपलेपणाने अरेतुरेंही बोलायचे. या संबंधात ते कर्मवीर मामांना स्पष्टपणे म्हणाले, "माझ्यावर विश्वास ठेव. संस्थेच्या कारभारात मी अधिक लक्ष घालीन. काहीही अनिष्ट घडू देणार नाही. तू निश्चिंत रहा."

कर्मवीर डॉ.मामासाहेब आणि संस्था यांच्यात अतूट अद्वैत निर्माण झाले होते. संस्था म्हणजे मामांचे पंचप्राण! ही संस्था चांगल्या तऱ्हेने चालविण्याची टी. बी. आबांनी दिलेली ग्वाही भिष्माप्रमाणे शरपंजरी पडलेल्या. कर्मवीर मामांना खूपच दिलासा देऊन गेली. पुन्हा मामांनी ही संस्था रयतला जोडण्याचा आग्रह धरला नाही. अशा तऱ्हेने त्या योजनेवर अखेरचा पडदा पडला.

अनुक्रमणिका

## २४. कर्मवीर मामा : एक चालतेबोलते लोकविद्यापीठ!

१, २ आणि ३ जानेवारी १९८० रोजी बार्शीला कर्मवीर मामांच्या प्रांगणात ५४वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन प्रसिद्ध विचारवंत श्री. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. कर्मवीर मामासाहेब या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. या निमित्ताने मामांच्या शिष्यगणांनी मामांच्या जीवनकार्यावर लिहिल्या गेलेल्या कवितांचा एक कवितासंग्रह 'पेरणी' या नावाने ४ फेब्रुवारी १९८० रोजी मामांच्या ७७ व्या वर्धापनदिनी प्रकाशित केला. कवी अनिल, कवी आणि 'बलुतं' कार श्री. दया पवार आणि 'मृत्युंजय' कार श्री. शिवाजी सावंत यांच्या साक्षीने या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. 'पेरणी' या काव्यसंग्रहात कवी प्राचार्य प्रभाकर बिडवे यांची 'गाणे आजचे आणि उद्याचे' या शीर्षकाची सुंदर प्रस्तावना लिहिली. त्यातील काही छोटे परिच्छेद येथे देण्याचा मोह टाळता येत नाही. ते आपल्या प्रस्तावनेत लिहितात –

"महापुरुष समाजपुरुषाच्या पावलाने चालत असतो आणि समाजपुरुषाच्या मुखाने बोलत असतो. त्याच्या हृदयात सामान्यांचे एक स्पंदन असते आणि त्याच्या डोळ्यांत क्षितिजापलीकडे असलेल्या भावी काळाचे एक रम्य स्वप्न असते. वर्तमानाला पडलेलं तो एक नितान्त रमणीय स्वप्नच असतो आणि त्याचे जीवन म्हणजे या विश्वप्रभूची अर्चना असते. त्याचे अस्तित्वच प्रार्थनारूप झालेले असते आणि प्रलयाचे नियंत्रण करणारा तो एक ओंकारच असतो. युगातून अशा पुरुषाचे येणे असते म्हणूनच त्याचे जीवन सामान्यांचे गाणे झालेले असते.

"सतत गतिमान, प्रवाहशील म्हणूनच त्याला जीवन ही संज्ञा! त्यात जसे प्रचंड उत्पात तसे निरायम चांदणेही. यांचे संतुलन करणारी एखादी मानवी शक्ती जेव्हा अस्तित्वरूप होते तेव्हा एखादी नवी दिशा प्रकाशमान होते. जीवनाला एक नवा अर्थ येतो. ज्ञानदेव, तुकाराम, सिद्धार्थ, येशू, महात्माजी यांनी हेच लोकोत्तर कार्य केले. महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचीही वाट याहून काही वेगळी नव्हती. ज्यांनी त्यांनी त्यांचा युगधर्म सांगितला आणि लोकजीवन गतिमान ठेवले. माणसांचे माणूसपण एखाद्या वादळातल्या दीपकळीसारखे जिवंत ठेवले. स्वतः अनिकेत राहिले पण दुसऱ्यांचे संसार उभे केले. कर्मवीर मामासाहेब जगदाळे अशांचेच एक चालतेबोलते प्रतीक!

"...माणसू घडविणे हा कर्मवीर मामांसारख्यांचा युगधर्म असतो. तो फलित झाला म्हणजे गौतम बुद्धाच्या, येशुख्रिस्ताच्या, महात्मा फुल्यांच्या, महात्मा गांधींच्या इच्छा-आकांक्षांचे पारणे फिटते. हे काम अर्थातच तसे सामान्य नाही. त्यासाठी प्रसंगी स्वतःला होरपळून घ्यावे लागते. जीवनाचाच यज्ञ मांडावा लागतो आणि यज्ञातल्या समिधेचे जळणेही स्वतःकडेच घ्यावे लागते.

"माणसे पेरून माणुसकीचे पीक उभे करणाऱ्या, युगधर्म ओळखून नवी संस्कृती घडविणाऱ्या, विज्ञानाच्या स्पर्धेतही श्रमाची प्रतिष्ठा सांगणाऱ्या एका महामानवाच्या जीवनाचे गाणे 'पेरणी'मध्ये आलेले आहे. जमिनीवर उभे राहून आकाशासी प्रस्थान ठेवणाऱ्या आणि विश्व सावरून धरण्याच्या प्रयत्नात चिरंतनाच्या यात्रेत निघालेल्या महायात्रीच्या सफलतेचे हे जयगान आहे. ते आजच्यांसाठी आहे तसेच उद्याच्यांसाठीही आहे."

आपला युगधर्म फलित करण्यासाठीच कर्मवीर मामासाहेबांनी खेड्यापाड्यांतून शाळा-विद्यालये आणि महाविद्यालये सुरू केली. पण शाळा-कॉलेजातून मिळणारे शिक्षण कुचकामी असल्याचे त्यांना कळू

अनुक्रमणिका

लागले. हे शिक्षण घेऊन पदवीधर केवळ पोशाखी बनू लागले. कारकून बनण्यात धन्यता मानू लागले. श्रमाची त्यांना लाज वाटू लागली. गरिबांच्या अज्ञानाचा ते स्वार्थासाठी फायदा उठवू लागले. त्यांना पिळू लागले. त्यामुळे मामांना पदव्यांतील फोलपणा कळून आला. 'पदव्यांनी माणूस मोठा होतो हे सांगितले कुणी? ज्ञानोबाराया तुकोबाराया कोणत्या विद्यापीठात शिकले?' असे प्रश्न ते विचारू लागले. शाळा-कॉलेजच्या चार भिंतीआड जीवनोपयोगी शिक्षण मिळत नाही. या विचारावर ते ठाम होते. कारण खरे शिक्षण जगाच्या विशाल शाळेत मिळत असते. अनुभव या शिक्षकाकडून ते घ्यावे लागते. चार भिंतींच्याआड मिळणारे शिक्षण केवळ पोपटपंची. चार भिंतींबाहेर अनुभवातून मिळणारे शिक्षण हे खरे शिक्षण. ह्या जीवन शिक्षणाचे धडे ते क्षणाक्षणाला विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, शिक्षित-अशिक्षित स्त्रियांना आणि समाजाला देत असत. त्या अर्थाने कर्मवीर हे सामाजशिक्षक होते. क्रांतीसिंह नाना पाटील, लोकसंत गाडगेमहाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याप्रमाणे ते समाजाला संधी मिळेल तसे शिकवीत होते. ते एका अर्थी चालतेबोलते लोकविद्यापीठ होते.

कर्मवीर मामांच्या शैक्षणिक कार्याची सुरुवात बोर्डिंगपासून झाली आणि बोर्डिंगमधील मुलांना खरे नागरिक आणि माणूस बनविण्याचा त्यांचा अट्टाहास. त्यासाठी ते संधी मिळेल त्या त्या प्रसंगी मुलांना अनौपचारिक पद्धतीने सुसंस्कारित करीत. बोर्डिंगमधील मुलांची दैनंदिनी म्हणजे मामांच्या अनौपचारिक शिक्षणाचा अभ्यासक्रम. पहाटे लवकर उठणे, दात घासणे, आंघोळ करणे, व्यायाम करणे, प्रार्थना म्हणणे, वर्तमानपत्र वाचन-श्रवण करणे, बेताची न्याहरी करणे, या बाबी मुलांना सक्तीच्या होत्या. त्यातील एखाद्याही गोष्टीत चूक झाली तर त्यांना शिक्षा ठरलेली. व्यायाम केला नाहीतर न्याहरी नाही. पक्षीणसुद्धा आपल्या पिलांना आकाशात उडण्याचे शिक्षण देताना त्यांना काही वेळा उपाशी ठेवते. अगदी तस्सं. मुंग्यांचं शिस्तबद्ध, कष्टाचं जगणं आणि मधमाशांची मध गोळा करण्याची चिकाटी ही उदाहरणं देऊन मामा मुलांना कष्टाचं आणि शिस्तीचं महत्त्व सांगत. जेवतानाही 'वदनी कवळ घेता' म्हणून शांत आणि प्रसन्न चित्ताने घास चावून चावून खाण्याचा नियम. लागेल तेवढंच ताटात मागून घेण्याची पद्धत. ताटात उष्टं ठेवण्यावर बंदी. हौदाचं पाणी वापरताना नळ सोडून बसण्यास प्रतिबंध. या साऱ्या बाबतीत मामा सतत जागरूक. विद्यार्थ्यांनी वेळच्यावेळी अभ्यास करावा, शाळेत जाण्यापूर्वीचं जेवण भुकेपेक्षा एकदोन घास कमी करावे म्हणजे शिक्षक शिकविताना गुंगी येणार नाही. शाळेत समजल्या नसलेल्या विषयाबाबत शिक्षकांना न भिता, न लाजता मुलांनी प्रश्न विचारून शंकानिरसन करून घेतलेच पाहिजे, यावर त्यांचा भर. केवळ अभ्यास आणि अभ्यास यामुळे मुलांची एकांगी वाढ होण्याची शक्यता. म्हणून शाळा सुटल्यावर प्रत्येक मुलाने मोकळ्या हवेत खेळले पाहिजे किंवा श्रमदान केले पाहिजे. हाही त्यांचा नियम. श्रमदानाने मातीशी मुलांचे नाते दृढ होते. कष्ट केल्याने चांगली भूक लागते आणि खाल्लेले व्यवस्थित पचते. चांगले अंगी लागते. ही त्यांची शिकवण. श्रमदानातील नवनिर्मितीचा आनंद काही औरच असतो हेही ते मुलांच्या लक्षात आणून देत. श्रमाचे महत्त्व सांगताना ते 'कामात राम' असल्याचे त्यांच्या मनावर ठसवीत. श्रमपूजेने माणूस निरोगी होतो, स्वावलंबी बनतो. स्वावलंबनातून स्वाभिमान निर्माण होतो. त्यातूनच स्वाध्यायाची गोडी वाढते. स्वातंत्र्याची प्रेरणा मिळते. गोरगरिबांच्या कष्टाची किंमत कळते. या जाणिवेमुळे पुढे शिकून मोठे झाल्यावर गरीबांवर अन्याय करण्याची वृत्तीच उरत नाही. हे एक मोठे सामाजिक भान त्यातून निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असे.

बोर्डिंगमधून शिकून बाहेर पडणारा विद्यार्थी हा चौकोनी चिऱ्यासारखा कुठेही फीट बसणारा झाला पाहिजे, ही त्यांची दृष्टी. म्हणूनच त्यांच्या संस्थेत श्रम आणि ज्ञान यांचा सुरेख संगम झालेला असे. विद्यार्थ्यांत वत्कृत्व कलेची चांगली जोपासना करण्यासाठी दर रविवारच्या सभेत दिलेल्या विषयावर

अनुक्रमणिका

सर्वांनी बोलले पाहिजे हा त्यांचा आग्रह. विद्यार्थ्यांत नेतृत्व गुणांची वाढ व्हावी म्हणून ते बोर्डिंगच्या व्यवस्थापनातील गेम सेक्रेटरी, भोजन सेक्रेटरी, ग्रंथालय सेक्रेटरी ह्या पदावर निवडणूक घेऊन निवडून आलेल्या मुलावर तो भार टाकीत. अशा प्रयोगातून उद्याची लोकशाही योग्य तऱ्हेने चालविणारे नेतृत्व तयार होईल, ही त्यांची दृढ धारणा.

मुलांच्या साध्या साध्या चुका दाखवतानाही कर्मवीर मामांचे हे अनौपचारिक शिक्षण चाललेले असे. एखादा विद्यार्थी बेंचच्या पुस्तके ठेवायच्या फळीवर वा टेबलावर बसला की त्याला छडीचा मार बसे. ते म्हणत, "बेंचवर बसण्यासाठी स्वतंत्र फळी असताना वह्या-पुस्तके ठेवण्याच्या फळीवर बसून त्या फळीचे वा टेबलाचे आयुष्य कमी का करता?" बेंचवर काहीबाही लिहिणाऱ्यांना ते बजावत, "लिहायला पाटी व कागद कशाला केले आहेत?बेंच घाण का करता?" हॉटेलमध्ये खाणे वर्ज्य. चहा बंद. दूध प्या. स्वच्छ कपडे वापरा. पण छानछोकीपणा नको. छानछोकीपेक्षा बलदंड शरीर आणि निरोगी नि सतेज मनबुद्धी महत्त्वाची असल्याचे ते मुलांना वारंवार बजावायचे. चोरून सिनेमा पाहायला जाणाऱ्या मुलांना शिक्षा ठरलेली. अशा मुलांना ते रागावून म्हणायचे, "तुमच्या आईबापांच्या अंगावर सतरा खिडक्या झालेले आणि रंगीबेरंगी ठिगळ लावलेले कपडे असताना सिनेमावर पैसे खर्च करताना तुम्हाला लाज कशी वाटत नाही?" असे असले तरी 'श्यामची आई', 'महात्मा फुले', 'संत तुकाराम', 'शेवग्याच्या शेंगा' अशा चित्रपटांना मात्र ते विद्यार्थ्यांना सोबत घेऊन जायचे.

कर्मवीर मामांच्या अशा अनौपचारिक शिक्षणापासून शिक्षक-प्राध्यापकही चुकत नसत. शिक्षकांनी वर्गात पाऊल टाकण्यापूर्वी विषयाची पूर्ण तयारी केली पाहिजे. वेळेवर वर्गात गेले पाहिजे. मन लावून शिकविले पाहिजे. तास संपल्यानंतरच वर्ग सोडला पाहिजे. याबद्दल ते कमालीचे आग्रही. शाळा कॉलेजात उशिरा जाणाऱ्या शिक्षक-प्राध्यापकांची ते कडक शब्दांत हजेरी घेत. अशा गळंम-टळंम करणाऱ्या शिक्षकाला ज्ञान मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी भंडावून सोडले पाहिजे असा ते सल्ला देत. शिक्षकांनी नीटनेटके तर राहायला पाहिजेच पण त्यापेक्षाही त्यांनी आपले चारित्र्य धुतल्या तांदळासारखे ठेवले पाहिजे. शिक्षकांच्या चारित्र्यावर त्यांचा फार मोठा भर असे. ज्ञानात शिक्षक एकवेळ कमी पडला तरी चालेल पण तो शुद्ध चारित्र्याचा असला पाहिजे. निष्कलंक चारित्र्य हा शिक्षकांचा सर्वात मोठा दागिना असल्याचे ते पुन्हा पुन्हा बजावून सांगत. म्हणून खाजगी शिकवण्या घेणाऱ्या आणि वर्गात वेळ मारून नेणाऱ्या शिक्षकांचा त्यांना तिटकारा वाटे. अशा शिक्षकांना ते नोकरीवरून कमी करण्यासही मागेपुढे पाहत नसत. शिक्षकांची पुस्तकाबरोबर विद्यार्थ्यांची मनेही वाचण्याचा ते सल्ला देत. विद्यार्थ्यांमध्ये श्रमाचे महत्त्व रुजविण्यासाठी शिक्षकांनीही विद्यार्थ्यांबरोबर श्रमदान केले पाहिजे, ही त्यांची रास्त अपेक्षा. चीनप्रमाणे विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी मळणीच्या काळात, दीर्घ सुट्ट्यांत ग्रामीण भागात जाऊन शेतकऱ्यांना सहकार्य करावे असे ते सांगत. म्हणूनच त्यांना महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे राबविल्या जाणाऱ्या दत्तक खेडे योजनेचे कौतुक वाटे. अशा कार्यक्रमाला ते आवर्जून जात. तेथील चाललेल्या विधायक कामावर देखरेख करीत. प्रसंगी योग्य त्या सूचना करीत. हे सारे अनौपचारिक शिक्षणाचे प्रकार होत.

शिक्षकाने आपल्या ज्ञानाचा उपयोग उत्पादकता आणि नवनिर्माणासाठी केला पाहिजे. ज्ञान केवळ पुस्तकांतील वाचण्यासाठी आणि व्याख्यानात सांगण्यासाठी नको. त्यांच्या कार्यालयातील एक खुर्ची मोडली होती. ती दुरुस्त करण्यासाठी कार्पेंटर शिक्षकाला त्यांनी बोलावून ती दुरुस्त करायला सांगितले. तेव्हा 'हे आमच्या अभ्यासक्रमात नाही' असे सांगणाऱ्या शिक्षकाची त्यांनी चांगलीच हजेरी घेतली होती. शेती शिक्षकाने विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन शेतीत नवनवे प्रयोग करावेत. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे ही

त्यांची अपेक्षा. तांत्रिक शिक्षकांनी संस्थेसाठी लागणारे लोखंडी फर्निचर करायला काय हरकत? हा त्यांचा सवाल असे. शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांचा शिल्पकार नसून तो समाजाचाही शिल्पकार व्हावा, ही त्यांची धडपड.

उन्हातान्हात, पाऊसवाऱ्यात, कष्ट करणारे शेतकरी-मजूर यांची उदाहरणे देऊन कर्मवीर मामासाहेब सावलीत बसून काम करणाऱ्या शिक्षकांना अंतर्मुख करीत. कष्टकऱ्यांपेक्षा कितीतरी पटीने अधिक पगार घेणाऱ्या शिक्षकांची जबाबदारीही तितकीच मोठी असल्याचे ते सांगत. एकदा एक प्राध्यापक दरवर्षीची पगारवाढ आणि वाढीव महागाईभत्ता मिळावा, यासाठी मामांना विनंती करायला आला. तेव्हा कर्मवीर मामा म्हणाले, “तुमच्या घरी धुणंभांडी करणाऱ्या बाईला तुम्ही किती पगार देता? त्यांना वाढीव महागाईची रक्कम देता का? त्यांना महागाई छळत नाही का?”

शुद्ध चारित्र्याबरोबरच शिक्षकांत अभ्यासवृत्ती, निर्भयीपणा, सत्याचा आग्रहीपणा आणि अन्यायाविरुद्ध दंड थोपटून उभे राहण्याची कुवत असली पाहिजे. म्हणजे ते गुण ते विद्यार्थ्यांत सहजपणे संक्रमित करू शकतील. ह्याबाबत बोलताना ते म्हणत, “शिक्षक-विद्यार्थ्यांनी जीवनाचा रंगमहाल बनविण्याऐवजी आपल्या जीवनाचे मंगल मंदिर बनविले पाहिजे. असे झाले तरच ते खरी क्रांती करू शकतील!”

स्त्री-शिक्षणावर कर्मवीर मामांचा जोर जास्त असे. वसतिगृहातील मुलींना ते नेहमीच अनौपचारिक शिक्षण देत. स्त्रियांनी निरर्थक कर्मकांडात अडकून न राहता शिक्षण घ्यावे, पुरुषांच्या बरोबरीने समाज आणि राष्ट्रकार्यात सहभागी व्हावे, हा त्यांचा आग्रह. त्यांनी अंधश्रद्धा फेकून दिल्या पाहिजेत तरच भावी पिढी विज्ञाननिष्ठ बनेल, ही त्यांची भावना. दारुड्या नवऱ्यासाठी वडाच्या झाडाला प्रदक्षिणा घालून हाच नवरा सातजन्म मिळावा, हे थोतांड कशाला? एखाद्या तरी नवरोबाने एखाद्या वृक्षाला एक तरी फेरी मारून हीच पत्नी मला पुढच्या एका जन्मी तरी मिळावी, अशी प्रार्थना केली आहे का? नवरा मेल्यानंतर बायकोने सती काय म्हणून जायचे? पत्नी वारल्यानंतर एखादा तरी पतीराज तिच्याबरोबर सती गेला आहे का? असे प्रश्न ते मुलींपुढे उभे करीत. बायकोने सीता व्हावे अशी अपेक्षा बाळगणाऱ्या एका तरी पुरुषाने राम बनण्याचा प्रयत्न केला आहे का? रोज नवनवीन स्त्रीपात्रं शोधणाऱ्या स्त्री-लंपट पुरुषांबद्दल त्यांच्या मनात कमालीची घृणा असे.

वडारी बाया उन्हातान्हात दगड फोडतात. झोपड्यात राहतात. कदान्न खातात. मुलाला जन्म देताच दुसऱ्या दिवशी कामाला लागतात. तरी त्या जीवन जगतच असतात. हा दाखला ते स्त्री-शिक्षिका आणि भगिनी मंडळातील तथाकथित महिलांना सांगून “अशा कष्टकरी स्त्रियांच्या उद्धारासाठी तुम्ही काय करता? भगिनी मंडळाच्या बैठकीत शिरापोहे खाऊन स्त्री-सुधारणेच्या पोकळ गप्पा मारून काय साधणार?” असा प्रश्न ते त्यांच्या तोंडावर फेकत असत. विधवांनी कुंकू का लावायचे नाही? त्यांनी पुनर्विवाह केला तर आकाश कोसळणार आहे का? पत्नी मरण पावल्यावर एखादा विधूर मात्र पंधरा दिवसांत मुलगी शोभेल अशा तरुणीबरोबर विवाहबद्ध होतो. मग विधवांवरच का म्हणून अन्याय? ही सारी त्यांच्या अनौपचारिकपणे दिलेल्या शिक्षणाची उदाहरणे! अशी बरीच उदाहरणे देता येतील.

महात्मा जोतीबा फुले, राजर्षी शाहूमहाराज, महर्षी वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील आणि कर्मवीर डॉ. पंजाबराव देशमुख या समाजसुधारकांच्या परंपरेतील शेवटचा

अनुक्रमणिका

दुवा म्हणून कर्मवीर मामांचा उल्लेख महाराष्ट्रात होतो. ते खऱ्या अर्थाने समाजशिक्षक आणि समाजसुधारक होते. अज्ञान आणि अंधश्रद्धेत बुडालेल्या बहुजन समाजाला वर काढण्याचा त्यांनी शिक्षणप्रसारातून प्रयत्न केला.बहुजन समाजातील दुष्ट रूढींना चूड लावली. खोट्या प्रतिष्ठेच्या त्यांच्या कल्पना—सावकाराचे कर्ज काढून डामडौलात लग्न करणे, सावकाराच्या व्याजावरील व्याजाने भूमिहीन होणे, लग्नात वरातीपुढे नायकिणी नाचवणे,हुंडा देणे-घेणे,यात्रा-जत्राला विनाकारण वेळ आणि पैसा वाया घालवणे, स्वतःच्या मुलाबाळांना उपाशी ठेवून दगडाच्या देवाची मंदिरे उभी करून त्या निर्जीव देवाच्या तोंडाला लोण्याचा गोळा लावणे, बाप जिवंत असता त्याची नीट देखभाल न करता वागविणे आणि तो मेल्यावर मात्र दशक्रिया आणि पिंडदान ह्या कार्यक्रमाचे स्तोम माजवून भटजींच्या झोळ्या भरणे इत्यादी पूर्वापार चालत आलेल्या निरर्थक परंपरांवर कर्मवीर मामासाहेब आपल्या भाषणातून आसुडाचे फटके मारीत. आपल्या अनौपचारिक मार्गाने लोकजागरण करीत असत.

खेड्यापाड्यांतील गोरगरीब माणसांच्या अडीअडणीच्या काळात धावून जाण्याचा कर्मवीर मामांचा जणू धर्मच झाला होता. १९७२च्या दुष्काळात बहुजन समाजाची वाताहात होऊ लागलेली त्यांना पाहावेना. अन्नाविना माणसे तडफडू लागली. जनावरे मरू लागली. तेव्हा मामांनी जनावरांसाठी कडबा आणि गवताच्या गाठी मागवून जनावरे वाचविली.उपाशी माणसांसाठी अन्नदानाचा यज्ञ सुरू केला. दुष्काळात गरिबांना कामे मिळावीत म्हणून संस्थेच्या विहिरी खोदण्याची कामे काढली. लोकांसाठी एक पाण्याचा हौद आणि जनावरांसाठी हाळ बांधून तो सर्वांना खुला केला. महात्मा फुल्यांनी हरिजनांसाठी आपला पाण्याचा हौद मोकळा करून दिल्याची येथे आठवण होते.

हल्लीच्या शिक्षणपद्धतीत अनेक दोष आहेत. ते शिक्षणतज्ज्ञांना आणि विचारवंतांना पटतातही पण ते दोष काढून टाकण्याचे कोणी नाव घेत नाही. ते दोष कमी करण्याचे मूलगामी प्रयत्न मामांनी आपल्या संस्थेच्या शाखाशाखांतून मोठ्या जिद्दीने केले आणि समाजाला खरे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला.म्हणून ते कृतिशील शिक्षणतज्ज्ञ होत.

खऱ्या शिक्षणाची कर्मवीर मामांची व्याख्या फार उदात्त आहे. “मानवाच्या सुप्त शक्तीचा जे विकास करते आणि त्यांचे जीवन सुखी व समृद्ध करते तेच खरे शिक्षण. नवभारत भाग्यशाली करण्यासाठी जे शिक्षण राष्ट्रवीर आणि देशभक्त निर्माण करते तेच खरे शिक्षण. सत्यं शिवं सुंदरम्‌ची पूजा करायला लावते तेच खरे शिक्षण. जे शिक्षण मानवातील वर्णाच्या जातीजातींच्या भेदांना मूठमाती देण्याची आणि सामाजिक विषमता नष्ट करण्याची सत्प्रवृत्ती व कृती निर्माण करते आणि समतेचे कमळ ममतेच्या अमृताने फुलविते, तेच खरे शिक्षण! गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकून स्वातंत्र्याचा आणि समतेचा झेंडा फडकविण्यास प्रेरणा देते तेच खरे शिक्षण. अन्यायाला गाडून न्यायाला खतपाणी घालते तेच खरे शिक्षण. शिवरायासम निष्कलंक चारित्र्य आणि रयतेच्या सुखाचं राज्य निर्माण करते, तेच खरे शिक्षण. जे शिक्षण माणसाला माणसाशी माणुसकीच्या नात्याने वागायला शिकवते,तेच खरे शिक्षण.” (संस्थेचा त्रैवार्षिक अहवाल, ५वा आणि ६वा, ७वा मधील कर्मवीर मामांच्या विचाराच्या आधाराने).

असं हे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचं शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसुधारक म्हणून असलेलं विलक्षण व्यक्तिमत्त्व. मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बी. आर. भोसले मामांना डी.लिट्. देण्याच्या निमित्ताने बार्शीला आले असता मामांची संस्था हे एक स्वयंपूर्ण विद्यापीठ असल्याचे जाणवले.

अनुक्रमणिका

खरे तर कर्मवीर मामा हेच एक चालतेबोलते लोकविद्यापीठ होते. कवी प्राचार्य व.न.**इं**गळे यांनी हे व्यक्तिमत्त्व आपल्या ‘आम्हाला माणूस व्हायचंय?’ या कवितेत शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

> कर्मवीर मामांचं व्यक्तिमत्त्व फणसासारखं
> वरवर काटेरी... आत तर मायेचे गोड गोड गरेच गरे!
> मामांचं व्यक्तिमत्त्व खडकासारखं ओबडधोबड
> आत मात्र गोड्या पाण्याचे झरेच झरे!
> या व्यक्तिमत्त्वात देवपण आहे, माणूसपण आहेच आहे
> कदाचित किंचित दानवपणही कुणाला दिसण्याची शक्यता आहे.
> दानवपण ते देवपणाचा हा प्रवास तसा खरंच खडतर
> पण या त्यांच्या प्रवासात मामांचं माणूसपण एवढं मोठं
> एवढं मोठं नि लोभस होतं, की देवसुद्धा म्हणतील,
> ‘आम्हाला माणूस व्हायचंय, खरंच माणूस व्हायचंय!!’

असे हे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचं आगळंवेगळं व्यक्तिमत्त्व. ते बहुजन समाजाचे एक चालतेबोलते लोकविद्यापीठच होत.

अनुक्रमणिका

# २५. मामांची मृत्यूशी झुंज आणि महानिर्वाण

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची प्रकृती लहानपणापासून निरोगी आणि ठणठणीत. आजारपण कसले ते त्यांना माहीत नव्हते. 'शरीरमाद्यं खलू धर्म साधनम्' चे ते खंदे पुरस्कर्ते.त्यांचे व्यक्तिमत्त्वही भारदस्त. भरपूर उंची. व्यायाम करून कमावलेले शरीर.गोल चेहरा, गोरा रंग, टोकदार नाक, कमरेला पायजमा, अंगात खादीचा नेहरू शर्ट, त्यावर जाकीट आणि डोकीला डौलदार पांढरा पटका, डोळे मोठे आणि पाणीदार, बोलणे स्पष्ट आणि खणखणीत. अशा व्यक्तिमत्त्वाची छाप कुणावरही पडे. लहानपणासून आरोग्याची ते काळजी घेत. बोर्डिंग सुरू केल्यानंतर आपल्या बोर्डिंगमधील मुलांचे मन,मनगट आणि मेंदू खंबीर,दणकट आणि तेजस्वी व्हावेत म्हणून कडक नियम त्यांनी केले होते.अशी माणसे निसर्गनियमाप्रमाणे शंभर वर्षे जगायला हवीत.

कर्मवीर मामा पहिल्यांदा दवाखान्यात गेले ते आजारी पडले म्हणून नव्हे तर संस्थेच्या इमारतीवर देखरेख करताना खाली पडल्यामुळे! मे १९५० मध्ये. त्यात त्यांचा उजवा पाय,अधू झाला. पाठीचा मणका मोडला. अधःशाखा कुळ्या पडल्या.त्यांना सोलापूरला दवाखान्यात दाखल केले. डॉ. भा. वा.मुळे यांनी त्यांना बरे केले. त्यांना काही दिवस कुबड्या घेऊन चालावे लागले. पण डॉक्टरी सल्ल्यानुसार योग्य व्यायाम आणि आहार घेतल्याने पुढे ते सायकलीवर बसून हिंडू-फिरू लागले. रोज पहाटे फिरायलाही जाऊ लागले. या अपघातानंतर वीसेक वर्षे त्यांना कसलाही आजार झाला नव्हता. यावरून ते आपल्या आरोग्याची काळजी सदैव घेत असत, हेच सिद्ध होते.

संस्थेचा व्याप वाढतच होता. त्यानुसार मामांचा तापही वाढत होता. त्यातून त्यांना प्रथम मधुमेहाने गाठले. पण नियमित आहार-विहार-औषधे यांच्या साहाय्याने त्यांनी त्यास काबूत ठेवले होते. पण १९७२ च्या विधिमंडळाच्या निवडणुकीत ते राजकारणात उतरले. प्रचारासाठी खेडोपाडी फिरले. खाण्यात अनियमितपणा आला. राजकारणातील ताणतणावाची त्यात भर पडली आणि मार्च १९७३ मध्ये त्यांच्यावर आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांवर संस्थेच्या एका सदस्यानेच बार्शी कोर्टात फौजदारी दावा दाखल केला. तो धक्का नाही म्हटले तरी मोठा होता. दृष्टी अधू होऊ लागल्याचे कळताच त्यांनी मिरजेच्या वानलेस हॉस्पिटलमध्ये डोळ्यांवरील शस्त्रक्रिया करून घेतली.

वयोमानाप्रमाणे शरीर थकत चाललेले. त्यांच्या उत्साही मनाला ते म्हणावी तशी साथ देत नसे. तरीही त्यांनी १९७१ मधील दसऱ्याच्या दिवशी संस्थेच्या प्रांगणात अश्वारूढ शिवपुतळा आणि आरोग्य मंदिर उभारण्याचा संकल्प सोडला. संकल्पपूर्तीसाठी धावाधाव सुरू झाली. त्यातच कोर्टातील दाव्याचे काय होते, याची काळजी मनाला पोखरू लागली. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. कर्मवीर मामांना २१ जुलै १९७४ रोजी अर्धांगवायूचा पहिला झटका आला. त्यामुळे त्यांचा डावा पाय, डावा हात,डावे अंग आणि चेहऱ्याचेही डावे अंग सुकून गेले.ताबडतोब त्यांना सोलापूरच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे डॉ. कोसलगे यांनी आपले कौशल्य पणाला लावून त्यांना अर्धेअधिक बरे केले. अश्वारूढ शिवपुतळ्याच्या बार्शीतील जंगी मिरवणुकीत ते सामील होऊ शकले. आरोग्य मंदिराच्या दुसऱ्या संकल्पपूर्तीसाठी ते धडपडू लागले. पंगू माणसाने पर्वत चढावा तशी त्यांची जबरदस्त इच्छाशक्ती.आरोग्य मंदिराची इमारत उभी राहू लागली.

अनुक्रमणिका

त्याच दरम्यान सोलापूरमध्ये मराठा सेवा मंडळाने छत्रपती शिवाजी प्रशालेत कर्मवीर मामांचा सत्कार ठेवला.तेथे त्यांना दाढदुखीच्या वेदना छळू लागल्या.दात काढायचे त्यांनी ठरविले.त्यांना मधुमेह असल्याने दात काढणे धोक्याचे असल्याचे डॉ. प्रधानांनी सांगितले. पण दात काढायचेच हा हट्ट मामा मागे घेईनात. अखेर डॉ. प्रधानांनी आपले कौशल्य वापरून दात अलगदपणे काढून टाकले. कर्मवीर मामा व्हीलचेअरवर बसून आरोग्य मंदिराच्या बांधकामावर देखरेख करू लागले आणि १९७५ साली त्यांना अर्धांगवायूचा दुसरा तीव्र झटका आला. ते भिष्माप्रमाणे शरपंजरी पडले. १९७५ ते १९८१ या सहा वर्षाच्या काळात ते अक्षरशः अंथरुणाला खिळून होते. मृत्यूशी निकराने झुंज देत होते. त्याच काळात ४ फेब्रुवारी १९७८ रोजी त्यांचा अमृत महोत्सव उत्साहाने साजरा झाला. पण जानेवारी १९८० रोजी तिसरे प्रहरी ४ वाजून ३ मिनिटांनी आलेल्या तिसऱ्या झटक्याने त्यांची वाचा बंद झाली. शुद्ध हरपली. अशाही स्थितीत संस्थेतील सेवक त्यांची मनोभावे सेवा करीत होते.

अशा परिस्थितीत त्या वेळचे मराठवाडा विद्यापीठाने (औरंगाबाद) कर्मवीर मामांना डी.लिट्. ही शिक्षणक्षेत्रातील अत्युच्च मानाची पदवी देण्याचे जाहीर केले. पण पदवीदान समारंभात मामांना उपस्थित राहणे अशक्य कोटीतील गोष्ट.म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू आणि कार्यकरिणीच्या काही सदस्यांनी ही डी. लिट्.ची पदवी बार्शीत येऊन २१ जानेवारी १९८० रोजी समारंभपूर्वक प्रदान केली. त्यानंतर महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ.दत्ताजी साळुंखे यांनीही कर्मवीर मामांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी देण्याचे जाहीर केले. पण ती पदवी स्वीकारायला मामा दुदैवाने हयात नव्हते.तेव्हा ती मरणोत्तर पदवी संस्थेचे अध्यक्ष श्री. टी. बी. जगदाळे यांनी अहमदनगर येथे झालेल्या पदवीदान समारंभात स्वीकारली.

या वर्षात दिनांक १, २ आणि ३ फेब्रुवारी १९८० रोजी बार्शीला कर्मवीर मामांच्या संस्थेच्या प्रांगणात ५४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन श्री. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षतेखाली भरले. कर्मवीर मामा हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. तीनही दिवशी ते व्यासपीठावर ठेवलेल्या व्हीलचेअरवर बसून राहायचे. बोलणे बंद झालेले. केवळ त्यांचे डोळे आणि त्या डोळ्यांतून अधूनमधून वाहणारे अश्रू खूप काही सांगून जात होते.

कर्मवीर मामांची प्रकृती वरचेवर जास्तच ढासळत चाललेली.तेव्हा मुंबईचे प्रसिद्ध न्यूरोफिजिशियन, जसलोक हॉस्पिटलचे डॉ. कात्रक यांना महत्प्रयासाने बार्शीला आणले. "यातून मामा बरे होणे बरेच अवघड आहे. ते कसे जगतात हेच आश्चर्य आहे. त्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि सेवकांची निरलस सेवाशुश्रूषा यामुळेच ते जगत आहेत." असे त्यांनी साश्चर्य उद्‌गार काढले.

१९८१ सालात पुन्हा मामांची प्रकृती ढासळली. बोलणे तर बंद झालेले. पाणीही म्हणावे तसे पोटात जाईना. तेव्हा डॉ.नेने यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांना नारळाचे पाणी सुरू केले. त्यांच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून त्यांचे शिष्य परमेश्वराची प्रार्थना करू लागले. अखेर ३० मे १९८१ चा दुःखाचा दिवस उगवला. खरे तर भागवत एकादशीचा तो पुण्यपावन दिवस. सकाळी दहाचा सुमार. मामांच्या घशातून घरघर ऐकू येऊ लागली. सारे बावरले.मामांची दिनरात्र सेवा करणारे श्री. जयराम बोधले, भागवत चव्हाण, पांडुरंग कदम, संदीपान शिंदे हे सेवक, श्री. नारायण जगदाळे आणि डॉ. गुलाबराव पाटील एकत्र जमले. अर्धांगवायूच्या सहा झटक्यांनी मामांचे जीर्ण शरीर कमालीचे पिचलेले. महानिर्वाण जवळ आल्याच्या खुणा दिसू लागल्या.डॉ. पाटील, श्री. नारायण जगदाळे आणि जयराम बोधले यांनी मामांना

नळीवाटे एकेक चमचा नारळाचे पाणी दिले. ते मामांनी घेतले. श्री. नारायणरावांनी चवथा चमचा नळीवाटे टाकला पण ते पाणी मामांच्या शरीराने स्वीकारले नाही. ते परत आले. सकाळी १० वाजून २५ मिनिटांनी कर्मवीर मामांनी अखेरचा श्वास घेतला. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शिक्षणप्रसाराचे ऐतिहासिक काम केलेला ऋषितुल्य तपस्वी आणि महामानव याने भागवत एकादशीचा मुहूर्त शांतपणे साधला.

कर्मवीर मामांचं कुटुंब वारकरी पंथाचं. महिन्याची पंढरीची पायी वारी त्यांच्या घरात कधी चुकली नाही. कर्मवीर मामा रूढ अर्थाने पंढरीच्या वारीला कधी गेले नाहीत. पण शिक्षणपंढरीची वारी मात्र त्यांनी जीवनाच्या अंतापर्यंत सोडली नाही. कर्मवीर मामा हे खऱ्या अर्थाने शिक्षणपंढरीचे वारकरी होते.

अनुक्रमणिका

# संदर्भ सूची


**पुस्तके**

१. ‘तपस्या’, कर्मवीर मामांचे पहिले चरित्र, प्रा. व. न. इंगळे प्रकाशन, १९६८.
२. ‘त्यागमूर्ती’, प्रा. व. न. इंगळे.
३. ‘अमृतकुंभ’, प्राचार्य. व. न. इंगळे.(संपादन)
४. ‘कर्मयोगी’, प्रा. डॉ. कुन्दा. जगदाळे (संपादन)
५. ‘असे आपले मामा’ : प्राचार्य चंद्रकांत मोरे आणि प्रा. बबन रोडे प्रकाशन, १९९५

**अहवाल, मासिके, स्मरणिका आणि नियतकालिके**

१. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे त्रैवार्षिक अहवाल १ ते ७.
२. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे ‘मकरंद’ वार्षिक अंक १ ते ५.
३. साप्ताहिक ‘सूर्यदर्शन’चे अंक : संपादक प्राचार्य व. न. इंगळे.
४. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ’, बार्शीच्या साप्ताहिक ‘जीवनसंग्राम’चे अंक.
५. ‘शिवयुग’, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शीच्या वार्षिक नियतकालिकाचे अंक.
६. ‘कर्मवीर’, कर्मवीर मामसाहेब जगदाळे महाविद्यालय, बार्शीच्या वार्षिक नियतकालिकाचे अंक.
७. ‘सुवर्ण कळस’, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीची अमृत महोत्सवी स्मरणिका, प्रमुख संपादक : प्राचार्य व. न. इंगळे, प्रकाशन १९८५..


अनुक्रमणिका

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई मंडळाची नवीन प्रकाशने

१. महाराष्ट्राचा इतिहास (प्रागैतिहासिक महाराष्ट्र, खंड पहिला भाग १)
लेखक : शां. भा. देव /पाषाणयुगापासून ते लोहयुगापर्यन्तचा महाराष्ट्राचा इतिहास
शब्दबद्ध करणारा ग्रंथ. पृष्ठसंख्या : १८५ / किंमत रु.१२७/-

२. महाराष्ट्राचा इतिहास,(मध्ययुगीन कालखंड भाग १)
संपादक : गो. त्र्यं.कुलकर्णी / इ.स.१२९६ते १६३६ पर्यन्तचा महाराष्ट्राचा इतिहास
शब्दबद्ध करणारा ग्रंथ.पृष्ठसंख्या: १८८ / किंमत रु.१४५/-

३. समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह – भाग पहिला
अनुवादक : हेमकांत बळकुंदी / मूळ फ्रेंच लेखक रेगंड ऑरॉ
इंग्रजी भाषांतर रीचर्ड हॉवर्ड आणि हेलन रीव्हर
पृष्ठसंख्या : २४४ / किंमत रु.२९५/-

४. प्रासादमंडन/ लेखक: डॉ. र.ए.कुलकर्णी
प्रासादाच्या (प्राचीन मंदिराच्या) वास्तूसंबंधी माहिती देणारा अनुवादित ग्रंथ.
पृष्ठसंख्या : १५४ / किंमत रु.११४/-

५. एक होता गंधर्व
लेखक : डॉ. राम म्हैसाळकर/ बालगंधर्वांच्या आयुष्यातील चढउतार शब्दबद्ध करणारी
ललितरम्य जीवनकथा. पृष्ठसंख्या : ११२ / किंमत रु.९३/-

६. गजाआडच्या कविता / संपादक : श्री.उत्तम कांबळे
महाराष्ट्रातील वेगवेगळ्या तुरुंगात सध्या शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांनी लिहिलेल्या
कवितांचा संग्रह.पृष्ठसंख्या : ४५ / किंमत रु. ३०/-

७. महाराष्ट्राचे शिल्पकार या चरित्रमालेअंतर्गत प्रसिद्ध झालेले चरित्रग्रंथ
१.साने गुरुजी, लेखक :श्री. राजा मंगळवेढेकर / पृष्ठसंख्या १०२ / किंमत रु. ४०/-
२.दादा धर्माधिकारी, लेखक : श्रीमती तारा धर्माधिकारी
पृष्ठसंख्या १०० / किंमत रु. ४०/-
३.डॉ. विठ्ठलराव विखेपाटील, लेखक :श्री. शिवाजी सावंत
पृष्ठसंख्या ७८ / किंमत रु. ३५/-
४.क्रांतिसिंह नाना पाटील, लेखक: श्री.भारत पाटणकर
पृष्ठसंख्या ९४ / किंमत रु. ३५/-
५.एस. एम.जोशी, लेखक : श्री.ग.प्र.प्रधान / पृष्ठसंख्या : ११० / किंमत रु. ४०/-
६.शंकरराव किर्लोस्कर,लेखक : श्रीमती शांता किर्लोस्कर
पृष्ठसंख्या : १०४ / किंमत रु. ४०/-

**मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे**

सर्व शासकीय ग्रंथ भांडार, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते.

**अधिक माहिती/चौकशीसाठी**

सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,तिसरा मजला, दादर (पूर्व),मुंबई – १४
दूरध्वनी : ४१४ ४०२१, ४१४ ६००५

अनुक्रमणिका



हल्लीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील जवळे (दुमाला) या खेड्यात वारकरी पंथाच्या शेतकरी कुटुंबात जन्म. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे (बार्शी) आणि कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या संस्थांतून 'कमवा व शिका' योजनेत श्रम करून स्वावलंबनाने शिक्षण. कर्मवीर मामांच्या संस्थेच्या विविध महाविद्यालयांत दहा वर्षे इंग्रजीचे प्राध्यापक आणि चोवीस वर्षे प्राचार्य. प्राचार्य संघटनेच्या वार्षिक परिषदांत सक्रिय सहभाग. ऑस्ट्रियातील आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या साल्झबर्ग सेमिनारमध्ये फेलो म्हणून निवड व सहभाग (१९८८). तसेच १९९२ साली आशियायी मुक्त विद्यापीठाच्या सेऊल (साऊथ कोरिया) येथे भरलेल्या वार्षिक परिषदेत सहभाग. 'निबंधवाचन' या परदेश प्रवासवर्णनपर पुस्तकांचे लेखन चालू.

लेखन आणि पत्रकारितेची विद्यार्थिदशेपासून आवड. विद्यार्थिदशेत 'समता' हस्तलिखिताचे संपादक. सातारा येथे महाविद्यालयीन काळात सातारात 'दि शिवाजीराज' या चक्रिमुद्रित अनियतकालिकाचे संपादक. प्राध्यापक-प्राचार्य म्हणून काम करताना बार्शीला 'जीवनसंग्राम' आणि 'सूर्यदर्शन' साप्ताहिकाचे संपादक.

'अभिरुची' (मुंबई), 'वीणा' (मुंबई), 'सुदर्शन'(पुणे) आणि 'रुद्रवाणी' (पुणे) मधून कथालेखन. महाविद्यालयीन विद्यार्थिदशेत 'शिक्षण गंगेचा भगीरथ' ही कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्यावरील पुस्तिका प्रकाशित. 'तपस्या' हा कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जीवनावरील चरित्रग्रंथ. 'पेरणी' हा विविध कवींच्या कवितांचा कवितासंग्रह संपादित.'अमृतकुंभ' हा कर्मवीर मामांच्यावरील विविध लेखकांचा लेखसंग्रह संपादित. मथ्यू अरनोल्ड यांच्या 'सोहराब अँड रूस्तम' या काव्यग्रंथाच्या संपादनात सहभाग. 'दि आर्ट ऑफ इफेक्टिव रीडिंग अँड रायटिंग' या इंग्रजी ग्रंथाच्या संपादनात प्रमुख सहभाग. विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्ली यांच्या अनुदानातून प्रकाशित.

'दरिद्री नारायण' ही ग्रामीण जीवनावरील कादंबरी. (२००१). सदर कादंबरीस शिवगिरिजा प्रतिष्ठान, कुर्डूवाडीचा 'कै.सदाशिव नारायण कदम गुरुजी वाङ्मय पुरस्कार' प्राप्त. तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्याकडून २००१ मधील उत्कृष्ट कादंबरी म्हणून वा. म. जोशी पुरस्कार प्राप्त. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी 'इंग्रजी भाषेतील काळ' आणि 'इंग्रजी भाषा शिक्षक' ही पुस्तके प्रकाशित.

व्हर्नाक्यूलर सातवीच्या परीक्षेत जिल्ह्यात प्रथम (१९५२). त्याप्रीत्यर्थ गावकऱ्यांकडून गौरव. सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजात 'आदर्श विद्यार्थी' म्हणून गौरव. मराठी साहित्य मंडळ, बार्शीच्या रौप्य महोत्सवी वर्षात 'मृत्युंजय' कार श्री. शिवाजी सावंत यांच्या हस्ते शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरव (१९९०). सेवा निवृत्तीच्या काळात वाचन, लेखन आणि भाषण ह्या वाक्‌यज्ञात दंग.

अनुक्रमणिका